
# महाभारत

## खंड १६ : वनपर्व ८

मराठी अनुवाद : श्री. अशोक कोठारे



# महाभारत

## महाभारत खंड सोळावा (वनपर्व)

अशोक कोठारे

**ई साहित्य प्रतिष्ठान**

# महाभारत

मराठी अनुवादक : श्री. अशोक कोठारे
ashokkothare@gmail.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क अनुवादकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी अनुवादकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

**ई साहित्य प्रतिष्ठान**
G1102, Eternity, Eleventh floor
Eastern Express Highway. Thane, 400604
**www.esahity.com**
**esahity@gmail.com**
©esahity Pratishthan®2018

• विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.

• आपले वाचून झाल्यावर आपण हे फॉरवर्ड करू शकता.

• हे पुस्तक वेबसायटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापूर्वी साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

**प्रकाशन : १० मे २०१९**

## – अनुवादकाचे दोन शब्द –

हिंदू मान्यतेत ज्या कांहीं रचना सर्वमान्य आहेत त्यातील एक महाभारत आहे. हिंदूंच्या सगळ्या परंपरा, चालीरिती, संस्कार ह्यांची मुळं महाभारतात आहेत. चौकस हिंदू व्यक्तिला बर्याच वेळा अमुक प्रथा कां प्रचारात आली असा प्रश्न पडतो परंतु, त्याचे समाधानकारक उत्तर मात्र त्याला मिळत नाही. चार जण चार कल्पना सांगतात व त्याचा गोंधळ उडतो. ते होऊ नये व त्या वहिवाटी, प्रथा ह्यांचे मूळ कोठे आहे ते लक्षात यावे ह्यासाठी हा प्रयत्न आहे, हा अनुवाद वाचला कीं, त्या प्रश्नांची समाधानकारक उत्तरं मिळतील अशी माझी अपेक्षा आहे. म्हणून, मी महाभारत ह्या महाकाव्याचा मराठीत अनुवाद करण्याचे ठरवले. आता पर्यंत महाभारतावर बरेच लिहीले गेले आहे व ह्यापुढेसुद्धा पुष्कळ लिहीले जाईल पण महाभारत, जसें आहे तसें, एक शैक्षणिक माध्यम म्हणून वाचकांना मिळणे आवश्यक आहे व ते ह्या भाषांतराने मी वाचकांना देत आहे.

महाभारत हे एक महाकाव्य आहे. असें म्हणतात, हा सर्वात मोठा ग्रंथ आहे. मी मात्र अनुवाद करतांना तो गद्यात केला आहे कारण, मला कवितेचे अंग नाही. महाभारताच्या उपलब्ध प्रतिंत कांहीं भेद आढळतात. त्यासाठी सगळे भेद भाषांतरात घेतले आहेत म्हणजे, कांहीं राहून जावू नये. त्या शिवाय, सामान्य वाचकांना कथाभाग अधिक चांगल्या प्रकारे समजावा म्हणून कांहीं टीपा दिल्या आहेत.

माझे वाचक साधे मराठी आहेत ज्यांचे ज्ञान मोजके आहे असें गृहीत धरून मी अनुवादाची भाषा बाळबोध मराठी ठेवली आहे, त्यामुळें कोणालाही ते सहजपणे वाचता येईल व समजेल. कांहीं लेखक अशा ग्रंथाचे अनुवाद करतांना प्राचीनतेचा अनुभव यावा म्हणून मुद्दाम प्राचीन (Archaic) शब्दप्रयोग वापरतात परंतु, माझा असा अनुभव आहे किं, बहुतेक वाचकांना ते वाचण्यास त्रास होतो. म्हणून भाषा आपली नेहमीचीच ओघवती ठेवली आहे.

महाभारताचे अठरा पर्व आहेत व त्या आधीचा असा आदिपर्व म्हणून एक जोडला आहे. आदिपर्वामुळे महाभारतातील मुख्य कथाभागाचा पूर्वेतिहास वाचकांना समजेल. आदिपर्वात हिंदूंच्या अनेक पुराणांच्या मुळसुत्राची कल्पना येते. म्हणून तो माझ्यामते फार महत्वाचा आहे. मी मात्र अनुवाद करण्याच्या सोयीसाठी संपूर्ण महाभारत चाळीसापेक्षां

जास्त खंडांत विभागून दिले आहे. त्यामुळें इंटरनेटवर चढवतांना व उतरवतांना सोपे जाईल अशी अपेक्षा आहे. त्यातील हा सोळावा खंड आपण आता वाचणार अहात, त्यात द्रौपदी हरण पर्व आपण पहाणार आहोत.

महाभारत कधी लिहीले गेले असा प्रश्न नेहमी ते वाचणार्याच्या मनात डोकावतो म्हणून त्याबद्दल थोडे लिहीत आहे. महावीर व गौतम बुद्ध आपल्याला माहीत आहेत, साधारणपणे इसवीसन पूर्व ५५० वर्षे ते दोघे महानुभाव होऊन गेले. जर महाभारताची रचना त्या आधीची असती तर त्याचा उल्लेख त्या काळातील जैन व बुद्ध साहित्यात निश्चितच आला असता. बुद्धाला सांख्यमुनी असें संबोधतात. कारण, त्याचे तत्त्वज्ञान सांख्य विचारावर आधारीत आहे. व्यासांची भगवत गीता वेदांताचे तत्त्वज्ञान मांडते जे तुलनेने अर्वाचीन आहे व सांख्य विचार हा हिंदू तत्त्वज्ञानातील पहिला म्हणजे, सर्वात जास्त जुना समजला जातो. जर ते बुद्धाच्या आधीचे असते तर निश्चितच त्याचा प्रभाव बुद्धाच्या विचारांवर झालेला दिसला असता. विशेष करून हे दोघे राजघराण्याचे होते म्हणजे त्यांचे शिक्षण त्या काळातील सर्वोत्तम असणारच मग त्याच्या अभ्यासात गीता, कृष्ण हे आले असते. विशेषकरून जर ते दोघे धर्मावर काम करत होते तर हे अपेक्षित आहे. परंतु, प्रत्यक्ष असें दिसते किं, त्या दोघाच्याही तत्कालिन साहित्यात तो उल्लेख आढळत नाही. ह्याचा अर्थ महाभारत त्या नंतरच्या काळात रचले गेले असावे. दुसरा अंदाज असा कीं, वेदांत तत्त्वज्ञान लिहीणारे व्यास व महाभारतकार व्यास एकच व्यक्ति होती असें साधार मानले जात आहे. वेदांताचा सार महाभारतातील गीतेत आहे. वेदांत तत्त्वज्ञानाचा उगम त्याच सुमारास झाला हे सर्वमान्य आहे. महाभारत लिहीणारे व्यास सांगतात, वेदांचा विसर पडत चालला आहे तरी ते ज्ञान सोप्या भाषेत सामान्यानां समजावे म्हणून कथारुपातून ते उपलब्ध व्हावे ह्यासाठी त्यांनी महाभारत ही काल्पनिक रचना केली आहे. असें सर्व पहाता आपण अंदाज करू शकतो किं, महाभारत इसवीसन पूर्व ४००च्या सुमारास म्हणजे, सम्राट अशोकाच्या आधी लिहीले गेले असावे.

महाभारतात स्वतः व्यास एक पात्र अशी भूमिका करतांना दिसते. त्याप्रमाणे कृष्ण म्हणून जे पात्र आहे त्याचे सगळे कर्तव्य पहाता व्यास ज्यांचे खरे नांव कृष्ण द्वैपायन आहे, तेंच करीत आहेत असे वाटते. म्हणजे महाभारतकार व्यास त्यांच्या रचनेत दोन भूमिका

करतांत असें म्हणावे लागेल. त्यामुळें असे समजण्यास हरकत नसावी कीं, महाभारत त्यांच्या कल्पनांचाच एक भाग आहे. कदाचित असें म्हणता येईल कीं, महाभारत हा एक दंतकथांचा संग्रह आहे व त्याद्वारा नैतिकमुल्ये शिकवण्याचा प्रयत्न झाला आहे.

माझ्या मते, अशा चर्चेत वेळ व्यर्थ न घालवतां हिंदूंनी महाभारतातील कथांतून काय सांगावयाचे आहे ते पहावे. एक ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून महाभारत उपयोगी येईल असें वाटत नाही. महाभारतातील कथा पहाता, त्यातील अतिरंजित प्रसंग हेंच सांगतात किं हे सगळे कपोलकल्पित आहे. परंतु, त्यांतून जे शिकवण्याचा प्रयत्न झाला आहे तो अप्रतिम आहे.

आपल्याकडे इंग्रजांनी सांप्रतची शिक्षण पद्धती आणली त्या आधी हिंदूंतील द्विज, पाठशाळांतून प्राथमिक शिक्षण घेत असतं. त्यात प्रथम, अक्षर ओळख नंतर गणित व महाभारत शिकवले जाई (पुरोहित ब्राह्मणांच्या पाठशाळांतून त्याशिवाय कर्मकांडाच्या पोथ्या शिकवल्या जात) हे लक्षात घेतले पाहिजे. कारण, महाभारतातून माणसाला जीवन कसे जगावे त्याबद्दलचे मार्गदर्शन मिळते. महाभारत हे एक शैक्षणिक माध्यम म्हणून वापरात होते. आपल्या शिवाजी राज्यांचे शिक्षण महाभारतातूनच झाले होते. त्यातून जे नितीशास्त्र शिकवले आहे तेंच आपले शिक्षण होते. माझ्यामते, हांच उद्देश वाचकांनी डोळ्यासमोर घेऊन महाभारत वाचावे, धार्मिक ग्रंथ समजून भाबडेपणे वाचू नये कारण तो धार्मिक ग्रंथ नाही असे माझे मत आहे. महाभारतात अनेक बौद्धीकं आहेत जसें भगवत गीता, विदूर गीता, कणिक गीता, व्याध गीता वगैरे. ते सगळे जीवनाचे ज्ञान आहे म्हणून प्रत्येक शहाणा हिंदू, महाभारत वाचण्यात ठेवेल तर त्याचे भले होईल. त्यांना ते सहजपणे मिळावे म्हणून हा प्रपंच आरंभला आहे. ई–साहित्य त्याचे विनामुल्य वितरण करणार आहेत म्हणून त्यांना शतशः

धन्यवाद.

अशोक कोठारे



माझा ई-मेल –
ashokkothare@gmail.com
ashokkothare@yahoo.co.in
ह्या वरून आपण माझ्याशी संपर्क करू शकता.

ह्या पुस्तकाचे मुद्रण करण्यासाठी अनुवादकाची आधी परवानगी घेणे आवश्यक आहे. न घेतल्यास तो गुन्हा ठरेल व त्यावर योग्य कारवाई होईल.

ह्या ई–पुस्तकाचे विनामुल्य वितरण ई–साहित्य करणार आहेत परंतु, हे ई–पुस्तक कोणीही कोणालाही विनामुल्य भेट देऊ शकतो.

**माझे ब्लॉग –**

Ashok Kothare, http://ashokkotharesblog.blogspot.com/ for stories

I reckon, http://kotharesviews.blogspot.com/ for philosophy

Ideas and tips on any subject, http://kotharay.blogspot.in/ for intelligent discussions.

Freedom of Expression, http://kothare-thinks.blogspot.in/

My Marathi Blog, http://kothare-marathi.blogspot.in/ मला असे वाटते

## - वनपर्व पुढे चालू -

## - महाभारत खंड सोळावा –

ह्या सोळाव्या खंडात तुम्ही द्रौपदी हरण पर्व वाचणार अहात.

# द्रौपदी हरण पर्व सुरू

## भाग पहिला

वैशंपायन बोलतात, एके दिवशी जसे दुर्योधनाने सांगितले होते तसें दुर्वास ऋषी त्याचे दहा हजार शिष्य घेऊन पांडवांच्या ठिकाणी जातात जेव्हां पांचही पांडव वामकुक्षी करत होते व त्यांची पत्नी जेवणाचे सगळे आटोपून आराम करत होती त्या अरण्यात जेथे पांडवांनी वस्ती केली होती. युधिष्ठीर त्या सगळ्यांना त्यांच्या कडे येत असलेले पहातो. तो त्याच्या भांवांना उठवतो व ते सगळे दुर्वासांचे स्वागत करण्यासाठी पुढे होतात. हात जोडून ते सगळे त्यांचे स्वागत करतात व त्यांना बसण्यासाठी आसन देतात. त्या ऋषींचे ते यथोचित आदरतीथ्य करतात. युधिष्ठीर त्यांना हातपाय धुण्यासाठी विनंती करतो. दुर्वास समजत नाहीत कीं, हे पांडव त्या सगळ्यांचे कसे जेवणाचे करणार त्या वनात. तरी तो व त्याचे शिष्य हातपाय धुण्याचा कार्यक्रम उरकण्यासाठी निघतात. तो मुनी जवळच असलेल्या झर्याकडे मुखमार्जन करण्यासाठी जातो. त्यावेळी त्यांची पत्नी विचारात पडते कीं, एवढ्यांसाठी कोठून अन्न आणावयाचे. बराच विचार केल्यानंतर तिला एकच आशेचा किरण दिसतो व तो म्हणजे श्री कृष्ण. ती जनार्दनाची प्रार्थना करू लागते. ती त्या प्रार्थनेत कृष्णाला सांगते कीं, तुझ्या अफाट सामर्थ्याने तू तुझा भक्तांची लाज राख. तू जगनियंता आहेस. निष्पाप्यांचा त्राता आहेस. तू सर्वश्रेष्ठ आहेस, तू स्वयंभू आहेस, तुला समजणे सामान्यांना व महान ऋषींनासुद्धा अशक्य आहे. अशा तुला मी विनंती करते कीं, ह्या प्रसंगातून मला फक्त तू आणि तूंच वाचवू शकतोस. अरे माझ्या देवा, कृपाळू दामोदरा, ज्यांना कोणी नाही त्यांना तू आधार असतोस. तू कृष्ण वर्णी व तुझे नेत्र रक्तवर्णी, तुझ्या अंगावर पितांबर असा तू माझ्या मदतीला ये. तू ह्या सृष्टीचा कर्ता व विघाता आहेस, तू विघ्नहर्ता आहेस. तू माझी लाज आधी एकदा राखली होतीस तशी आज राख कारण ऋषी दुर्वास आमच्याकडे अतिथी म्हणून आले आहेत.

ती कृष्णाची काकुळतीने केलेली प्रार्थना ऐकल्यावर दामोदर तेथे अवतरतो व तिला बोलतो कीं, त्याला सपाटून भूक लागली आहे. ते ऐकून द्रौपदी आणखीनच गोंधळून जाते. ती त्याला घाबरत घाबरत सांगते कीं, ती शेवटी जेवते व त्यानंतर ती सगळी भांडी स्वच्छ करून ठेवते. आता कोठून आणू तुझ्यासाठी खाणे? त्यावर कृष्ण तिला भांडे आणावयास सांगतो. ती ते भांडे आणते. जनार्दन त्या भांड्यात शोध घेतो व अखेरीस त्याला त्या भांड्याच्या कडेला एक भाताचे शीत व कणभर भाजी चिकटलेली दिसते. त्याबरोबर तो ते कण बोटांने काढतो व चाटून खातो. त्यानंतर तो पोट भरल्यासारखा ढेकर देतो. हे सगळे द्रौपदी अचंबित होऊन पहात असते. कृष्ण तिला बोलतो ह्या अन्नाने हरीचे पोट भरले आहे. त्यामुळें तो यज्ञात अर्घ्य घेणारा देव तुझ्यावर प्रसन्न हो. त्यानंतर तो तिला सांगतो कीं, आता तुझ्या अतिथींना जेवायला बोलाव. ह्या भांड्यातून त्यांचे जेवण निघेल, ते त्याना परोस. ते ऐकल्यावर अतिशय आनंदात ती पांचाल कन्या त्या ऋषी व त्याच्या शिष्यांना जेवणास येण्यासाठी हांक मारते. परंतु, सन्यासी तेथे असलेल्या नितळ पाणी असलेल्या झर्यात डुबक्या मारक असतांना त्यांना असें वाटू लागले किं, त्याची पोट भरलेली आहे आणि त्यावर जास्त खाणे योग्य होणार नाही, असें विचार त्या सगळ्यांच्या मनात येत होते. ते सगळे संन्यासी त्यांच्या गुरूला सांगतात कीं, ते आंघोळ करत असतांना त्यांची पोट भरल्यासारखे वाटू लागले व आता जास्त खाणे जमणार नाही. ते जेवण त्या माऊलीने तयार केले आहे ते कसे आपण खाणार? त्यावर राजर्षी दुर्वास त्यांना बोलतात, "जर तुम्ही त्यांनी केलेले जेवण भक्षण केले नाही तर तो मोठा अपराध होईल. त्यांनी एवढ्या प्रेमाने तयार केलेले जेवण जर आपण खाल्ले नाही तर ते त्यांच्या तपोसामर्थाने आपला नाश करू शकतात. कारण अशारीतीने वाढलेले जेवण न खाणे हा यजमानांचा अपमान करण्यासारखा गुन्हा आहे. मला माहीत आहे कीं, युधिष्ठीर हा एक राजर्षी आहे व त्याच्या शब्दात फार मोठी शक्ती आहे. अरे शिष्यानो, जो हरीचा भक्त आहे त्याच्या वाटेला न जाणे हेंच केव्हांही उचित असते. पांडव वासुदेवाचे भक्त आहेत. ते मोठे तपस्वी आहेत, त्यांच्या तत्त्वशिलतेत कांहीं कमी नसते. ते व्रतस्थ असतात. ते मर्यादा तत्त्वाचे पालन काटेकोरपणे करतात. त्यांचा राग आपल्याला परवडणारा नाही. पहा त्यांची पत्नी पांचाली आपल्याला वारंवार बोलावत आहे जेवणासाठी. म्हणून तुम्ही माझ्या आज्ञेने

येथून लवकर पसार व्हा ताबडतोब, पाठी वळूनसुद्धा पाहू नका. बाकी त्यांना कसे शात करावयाचे ते मी पाहून घेतो". त्यांच्या पाठोपठ दुर्वाससुद्धा अदृष्य होतात. ते थेट ब्रह्माकडे पोहोचतात. तेथे ते ब्रह्माला तो विलक्षण अनुभव सांगतात तेव्हां ब्रह्मदेव त्याच्याकडे पहात स्मित करत बोलतात, "असंगाशी संग म्हणजे प्राणाशी गांठ", अशी म्हण आहे त्याचा प्रत्यय तुला आला आहे. प्रथम तू एक ब्रह्मर्षी असूनही त्या असुरांकडे (दुर्योधन) कां गेलांस? तेथे त्याचा पाहूणचार घेतलास तेव्हां तुला लाज कशी नाही वाटली? त्याचा फायदा घेऊन त्यांनी तुला अडकवले व तू विवेकशून्य झालेला त्यात फसलास. हे एका ब्रह्मर्षीला शोभणारे नव्हते. तुला तुझ्या सिद्धीचा गर्व झाला आहे म्हणून हे तुला सावध करण्यासाठी योजले होते. आता तू मेरू पर्वतावर जाऊन तपश्चर्या कर आणि हरवलेले श्रेय पुन्हा प्राप्त करावे नाहीतर तुझा आणखीन र्हास होईल". ते ब्रह्मदेवांचे ऐकल्यावर दुर्वास तेथून तडक मेरू पर्वताकडे निघून जातात.

वैशंपायन नंतर सांगतात, ते सगळे ब्राह्मण दुर्वासाच्या सांगण्यावरून तेथून पांडवांबद्दल भलताच धसका घेतात व धुमठोकत पळून जातात. द्रौपदी त्या ब्राह्मणांना शोधत त्या झर्याकडे येते. तिला तेथे कोणीही दिसत नाही. तेथे वस्तीला असलेले मुनी तिला सांगतात कीं, ते अतिथी अचानकपणे झपाट्याने निघून गेले. ती त्यांच्या कुटीत येते व युधिष्ठीराला ते सांगते. परंतु, ते प्रामाणिक पांडव त्यांच्या त्या अतिथींची वाट पहात रहातात. रात्र झाली तरी ते येत नाहीत म्हणून शेवटी युधिष्ठीर समजतो कीं, त्या ब्राह्मणांनी आपल्याला फसवले. ते त्या ब्राह्मणांची वाट पहात रहातात. पांडव त्यांच्या ध्यानात जातात कीं, हे कसे झाले ते समजावे. त्यावेळी श्रीकृष्ण तेथे अचानक अवतरतो व त्यांना बोलतो, "तुम्हाला त्या रागीट ऋषीपासून धोका होणार असें तुमच्या द्रौपदीला वाटले म्हणून तिने माझा धावा केला. म्हणून मी वेगांने येथे आलो. परंतु, आता तुम्हाला दुर्वासाची भिती बाळगण्याची कांहीं आवश्यकता नाही. कारण तो दुर्वास तुमच्या तपोसामर्थ्याने घाबरून पळून गेला आहे. वनवासात तुम्ही जे पवित्र जीवन जगलात त्यामुळें तुम्ही फार शक्तिमान झाला अहात. खरे गुणी कधीही अशा दुर्वासा सारख्या योग्यांना घाबरत नाहीत. तुम्ही पांडव धन्य झाला अहात. आता मी परत जातो".

वैशंपायन पुढे सांगतात, कृष्णाचे ते आश्वासक उद्गार ऐकून ते पांडव आणि त्यांची बायको सुटकेचा श्वास घेतात. ते त्या त्यांच्या सख्याला बोलतात, जसे बुडत्याला होडी वाचवते तसे तू आम्हाला आज वाचवले आहेस. त्यानंतर कृष्ण अंतर्धान पावतो. त्यानंतर त्या अनुभवाने ते स्वताला जास्त सुरक्षित समजू लागतात. असे ते, त्या अरण्यात पुन्हा त्यांची भटकंती चालू ठेवतात. अरे जनमेजया, मी तुला ती कथा सांगितली जिच्या बद्दल तू विचारणा करत होतास कीं, कौरव पांडवांना सतावण्यासाठी कोणते उद्योग करत होते. अशारितीने त्या कौरव चांडाळ चौकडीचा आणखीन एक डाव फुकट गेला.

अशारितीने द्रौपदी हरण पर्वाचा पहिला भाग संपला.

# द्रौपदी हरण पर्व

## भाग दुसरा

वैशंपायन सांगत असतात, भरतवंशाचे ते योद्धे त्या कम्यक अरण्यात भटकत होते. शिकार करणे व तेथील वनश्री अनुभवणे असे त्यांचे दिवस जात होते. ते पंडुचे मुलगे जे साक्षात इंद्र होते तेथे आपला समय व्यतीत करत होते. त्यांच्या बरोबर असणार्या ब्राह्मणांना खाद्य मिळावे म्हणून ते सर्वत्र मृगया करत होते. त्याकाळात त्यांची बायको द्रौपदी एकटीच त्यांच्या कुटीत रहात असें. तिच्या बरोबर महान विरक्त त्रिनाविंदू असतं. त्यांच्यासह पांडवांचे पुरोहित धौम्यसुद्धा होते.

त्या सुमारास, सिंधचा राजा वृधाक्षत्र त्याच्या मुलांसाठी मुलगी पहाण्यासाठी त्याच्या जामानिम्यासह त्या कम्यक वनातून जात होता. त्याला सल्वाच्या राज्यात त्या कारणांने जावयाचे होते. कम्यक वनात ते त्यांचा डेरा टाकतात. तेथे त्या निबीड रानात त्यांना पांडवांची कुटी दिसते व त्याच सुमारास द्रौपदी त्या कुटीच्या बाहेर दरवाजात उभी होती. तिचे सौंदर्य पाहून त्या राजपुत्रांना आश्चर्य वाटते. त्यांना शंका येते कीं, हि कोणी देवता, अप्सरा, नाहीतर कोणी मायावी राक्षशिण आहे कां?

तिच्या अप्रतिम सौंदर्यावर ते राजपुत्र लुब्ध झालेले असतात. ते तिच्याकडे एकटक पहात रहातात. सिंधच्या राजाचा मुलगा जयद्रथ तिला पहात रहातो व त्याच्या मनांत विचार येतो कीं, जर आपण ह्या सुंदरीला आपल्या बरोबर नेले तर आणखीन कोणी मुलगी पहाण्याची आवश्यकता रहाणार नाही. तिचे निष्पाप लावण्य तो विसरू शकत नाही. तो त्याच्या पित्यास, वृधाक्षत्रास त्याचा उद्देश सांगतो. तो त्यानंतर त्याच्या कोटीक नांवाच्या एका साथीदाराला जवळ बोलावतो व सांगतो, "अरे कोटीका, त्या सुंदरीकडे जाऊन तिच्याबद्दल कांही माहीती मिळवण्याचा प्रयत्न कर. ती कोण आहे, येथे काय करते, कोठून आली, तिचे आई बाप कोण, तिचे पतीबद्दल सुद्धा चौकशी कर, असे सगळे विचारून ते आम्हाला सांग". त्याला आणखीन सांगतो किं, ती कोणी मायावी राक्षशिण आहे कां त्याचा सुद्धा अंदाज घेऊन ये.

अशारितीने द्रौपदी हरण पर्वाचा दुसरा भाग संपला.

# द्रौपदी हरण पर्व

## भाग तिसरा

कोटीक त्या प्रमाणें द्रौपदीकडे जातो व तिला तिच्याबद्दल विचारणा करतो. तो तिला बोलतो, "अहो सुंदरी ह्या वनात आपण एकट्या अशा कां उभ्या अहात, आपण कोणी मनुष्य अहात कां अप्सरा अहात? आपल्याला अशा भयंकर वनात असें एकटे असतांना भिती वाटत नाही कां"?  कदाचित आपण कोणी देवता अहात कां? कां कोणी दैत्य स्त्री अहात? कदाचित आपण नाग लोकांतील असाल, कां आपण वरुणदेवाच्या कोणी अहात? किंवा यमाच्या किंवा सोमाच्या किंवा कुबेराच्या नाहीतर कोणा मानवाच्या अहात? अशा सुनसान प्रदेशांत आपण असा कां उभ्या अहात व ही कुटी कोणाची आहे? कदाचित मानव रुपात आपण कोणी यक्षिणी तर नाहींना"? कदाचित आपण धात्रा नाहीतर विधात्राच्या कोणी असाल, नाहीतर सवितृच्या किंवा विभूच्या नाहीतर शक्रच्या कोणी असला पाहिजेत असें मला वाटते. मी आपल्याला सन्मानपूर्वकपणे हे विचारत आहे. कारण आमच्या राजाचा तळ येथे जवळच पडला आहे त्यांनी तुमच्याबद्दल चौकशी करण्यासाठी मला धाडले आहे. आपली माहीती त्यांना हवी आहे. आमची माहिती अशी आहे, मी राजा सुरथाचा मुलगा आहे, माझे नांव कोटीक आहे. त्यानंतर तो कोटीक त्यांच्या तळाकडे इशारा करत सांगतो, तेथे मोठ्या डोळ्याचा जो बसला आहे सोन्याच्या रथात तो राजा क्षेमंकर असून, तो त्रिगर्तचा राजा आहे. त्याच्या पाठल्या बाजून जो दिसतो तो पुलिंदच्या राजाचा मुलगा आहे, तो आता आपल्याकडे पहात आहे. तो नेहमी शस्त्र सज्ज असतो व पहाडांच्या शिखरांवर फिरत असतो. तेथे तलावा जवळ जो उभा दिसतो तो देखणा शत्रुघ्न सुवलाचा मुलगा आहे. आपण कधी जयद्रथाचे नांव ऐकले आहे कां? तो त्याचे सैन्य घेऊन जात आहे. तो सौविरचा राजा आहे. त्याच्या बरोबर त्याचे बारा सहायक आहेत. त्यांची नांव आहेत, अंगारक, कुंज्जर , गुप्तक, शत्रूंजय, श्रींजय, सुप्रबुद्ध, प्रभाकर, भ्रमर, रवी, सुर, प्रताप, आणि कुहण. ते सगळे त्यांच्या रथात बसलेले आहेत. ते रथ खेचणारे घोडे उमदे तपकीरी रंगाचे आहेत. ते सगळे त्याचे भाऊ आहेत. त्यांच्या बरोबर सामर्थ्यवान वलहक, अनिक, विदारण आणि आणखीन त्याच्या बरोबर

आहेत. ते सौविर सैन्याचे आहेत. आमचे राजे प्रवासास निघाले आहेत, जसें इंद्राभोवती मरुत, अग्नीदेव, असतात तसे ते त्याच्या भोवती असतात. आता मी आमची माहीती सांगितली, आता जर आपला परिचय दिला तर बरं होईल.

अशारितीने द्रौपदी हरण पर्वाचा तिसरा भाग संपला.

# द्रौपदी हरण पर्व
## भाग चौथा

वैशंपायन सांगत असतात, अशाप्रकारे द्रौपदीला त्या सिवी घराण्याच्या राजपुत्राने विचारल्यानंतर ती कदंब वृक्षावरील आपला हात काढत व त्याच्याकडे शांतपणे पहात त्याला बोलते, "हे पहा राजपुत्र, अशारितीने कोणत्याही परपुरुषा बरोबर बोलण्याची आमच्यात पद्धत नाही व माझे पतीसुद्धा येथे उपस्थित नाहीत. तसेंच तुझ्या प्रश्नाची उत्तरे देण्यास मी बांधलेलीसुद्धा नाही. तरी तुम्ही राजघराण्याचे अहात म्हणून सांगते, मी सैव्यांचे ऐकले आहे. आणि आपण सांगता किं, स्वतः सुरथाचे चिरंजीव अहात. आपले नांव कोटीक आहे, तेव्हा मी सांगते माझ्या नातेवाईकांची माहिती. मी राजा द्रुपदाची एकमेव कन्या यज्ञसेना आहे. मला कृष्णा म्हणून सुद्धा बोलतात. मी पांच भावांशी लग्न केली आहेत. कदाचित तू त्यांच्या बद्दल ऐकले असेल. ते खंडवप्रस्थाचे धनी होते. त्या पांच पुरूषांची नांवं आहेत, युधिष्ठीर, भिमसेन, अर्जुन, नकुल व सहदेव. त्यातील पहिले तीन पंडुराजा व त्याची पहिली पत्नी कुंती हिचे आहेत व दुसरे दोघे पंडुच्या द्वितीय पत्नी माद्रीचे आहेत. सध्या माझे पती शिकार करण्यासाठी चारही दिशा फिरत आहेत, आत मध्ये कुटीत आमचे पुरोहित धौम्य आणि ऋषी त्रिनाविंदू आहेत. युधिष्ठीर पूर्वेकडे मृगया शोधत आहेत, भिम दक्षिणेकडे, अर्जुन पश्चिमेकडे आणि उत्तरेकडे नकुल व सहदेव गेले आहेत. ते आल्यावर तुमचे यथायोग्य आदरातीथ्य करतील. त्यांच्या येण्याची आपल्याला वाट पहावी लागेल. आमचे राजपुरोहित धौम्यऋषी अतिथींची फार चांगली बडदास्त ठेवण्यासाठी प्रसिद्ध आहेत. असें उत्तर दिल्यानंतर ती पांचाली आपल्या पतींचे स्मरण करत तिच्या कुटीत जाते.

अशारितीने द्रौपदी हरण पर्वाचा चौथा भाग संपला.

# द्रौपदी हरण पर्व

## भाग पांचवा

वैशंपायन पुढे सांगत असतात, द्रौपदीशी जे बोलणे झाले ते तो राजपुत्र कोटीक त्याच्या कंपूतील राजपुत्रांना जाऊन सांगतो. ते ऐकल्यावर जयद्रथ उतावीळ झाल्यासारखा बोलतो कीं, "त्या स्त्रीचे बोलणे ऐकून माझा धीर सुटत आहे. ती स्त्रीजातीचे एक विलक्षण रत्न आहे. आपण महाबली आहोत, एकदा ही स्त्री पाहिली कीं, दुसर्या कोणाही बाईकडे मी पाहू शकणार नाही. त्या सगळ्या मला माकडीणी सारख्या वाटू लागल्या आहेत. मी तिच्याकडे एकदा पाहिले आहे, मला आता कांहीं सुचत नाही. तो सैव्य कोटिकाला विचारतो, "मला सांग ती मानव आहे कां, कोणी अप्सरा"? कोटिक सांगतो ती प्रसिद्ध द्रुपद राजाची कन्या यज्ञसेना आहे जिचा विवाह पांच पांडवांशी झाला आहे. ती पृथाच्या पांच मुलांची पतिव्रता पत्नी आहे. तिला उचलून सौवीराकडे जावे कां"?

वैशंपायन पुढे सांगतात, अशाप्रकारे बोलल्यानंतर तो पापबुद्धी जयद्रथ बोलतो, मी तिला पहाणारच. ते बोलल्यानंतर तो व त्याचे इतर सहा मित्र असे जमून त्या कुटीमध्ये प्रवेश करतात. जसें सिंहाच्या गुहेत कोल्हे शिरावेत. तेथे शिरल्यावर तो द्रौपदीला संभावितपणे बोलतो, "आपले पती कसे आहेत, त्याच प्रमाणे तुमच्या कडे असलेल्यांचे क्षेमकुशल कसे आहे"? त्या विचारण्यानंतर द्रौपदी त्याला निष्पाप मनाने उत्तर देते कीं तिचे पती आणि इतर सगळे विधात्याच्या कृपेने कुशल आहेत. त्यानंतर ती त्या राजाच्या राज्याबद्दल चौकशी करते एकरिवाज असल्यानुसार. आपले सैन्य, आपले राज्य कसे आहे? आपण आपल्या राज्याची प्रजा कशी आहे? तिची देखभाल आपण व्यवस्थितपणे करतांना? आपण सैव्य, सिनी आणि सिंध एकछत्राखाली आणले आहे असें समजले. त्यानंतर ती त्यांना मुखमार्जनासाठी पाणी देते. त्यांना बसण्यासाठी आसन दाखवते. त्यानंतर ती त्यांना सांगते आता राजे युधिष्ठीर येतील त्यांच्या बरोबर मृगयेत रानडुक्कर, नांकू हरणं, अस्वलं, नीलगाई, सांबार, हरीण, सरभ, ससे, भाजलेले हरणाचे मांस, लहान डुक्करं अशा प्राण्यांचे मांस जेवणासाठी मिळू शकेल. त्यासाठी त्यांना येण्याची वाट मी पहात आहे. ते ऐकल्यावर तो राजा तीला बोलतो, " आपल्या बोलण्यानेच आम्हाला ते सगळे

पोहोचले आहे". त्यानंतर तो मूर्ख बुद्धी राजा तिला सांगतो कीं, "तू माझ्या रथात चढावे व जीवनाचे सुख मिळवावे. त्या दुर्दैवी पांडवांबरोबर तू तुझे आयुष्य वाया घालवत आहेस. ज्यांचे राज्य गेले आहे, ज्याच्या सगळ्या बुद्धी भ्रष्ट झाल्या आहेत, ज्याच्या कडे भाग्याने दुर्लक्ष केले आहे, जे वैभव घालवून बसले आहेत अशांच्या बरोबर रहाणे तुझ्या सारख्या राजकन्येला शोभत नाही. तुझ्या सारख्या स्त्रीने अशा निकम्या लोकांबरोबर आपले लाखमोलाचे आयुष्य घालवणे मूर्खपणाचे आहे. तुझ्या योग्यतेच्या बाईने नवरा जोवर संमृद्ध आहे तोवर त्याची साथ द्यावी व जेव्हां त्याते भाग्य फिरते तेव्हां त्याला सोडून द्यावयाचे असते. ह्यातच खरे शहाणपण आहे. त्याच्या दुर्भाग्यास ते स्वतः कारण आहेत. त्यांच्या अयोग्य निर्णयामुळें ते ह्या अवस्थेत आज पडले आहेत हे सगळे राजे जाणतात. परंतु, आपले कांहींच चुकला नाही असे समजणे व त्यावर मोठ्या नैतिकतेच्या गोष्टी आपल्या चुकांचे समर्थन करण्यासाठी सांगण्याचा मूर्खपणा करणार्या माणसांबरोबर रहाण्यात काय शहाणपणा आहे? माझ्या बरोबर ये व सिंध आणि सौवीराची राणी बन असें मी तुला सुचवत आहे कारण, त्यातच तुला खरा न्याय मिळणार आहे. अशा दुर्भाग्यवंताच्या पतिव्रता रहाण्यात काय अर्थ आहे"? स्त्रीने पातिव्रत्य पाळण्याच्या योग्यतेचे ते पांचही जण नाहीत. बाईने पातिव्रत्य अशारितीने फुका घालवणे स्त्रीजातीला शोभणारे नाही".

ते त्या सिंधच्या राजाचे ते भयंकर बोलणे ऐकल्यावर द्रौपदी त्या ठिकाणातून बाहेर निघते कांहीं न बोलता. तिचा चेहरा रांगांने लालेलाल झाला होता. कपाळावर आठ्या पडल्या होत्या. डोळे बारीक झाले होते. त्याच्या बोलण्याकडे दुर्लक्ष करत ती त्याला सुनवते, "अशारितीने बोलणे तुम्हाला शोभत नाही. अशाप्रकारचे बोलावयाचे असेल तर तुम्ही येथून निघून जा. माझ्या जागेत येऊन मला हे सगळे सांगण्याची लाज आपल्याला वाटली पाहिजे". ती समजते कीं, तिचे पति केव्हाही येण्याची वेळ झाली आहे. तेव्हां त्यांना थांबून ठेवण्याच्या उद्देशाने ती त्यांच्याशी बोलणे वाढवत असते.

अशारितीने द्रौपदी हरण पर्वाचा पांचवा भाग संपला.

# द्रौपदी हरण पर्व

## भाग सहावा

वैशंपायन सांगतात, द्रुपदाची कन्या जरी स्वभावतः देखणी होती तरी तिच्या चेहर्यावर जी क्रोधामुळें लाली आली होती ती स्पष्टपणे दिसत होती. तिचे डोळे रांगाने लाल झाले होते. ती त्याला दम देते कीं, "तुला अशी मला मागणी घालण्याची हिम्मत कशी झाली? असे एका विवाहितेशी बोलण्याची तुमची संस्कृती आहे कां? अरे मूर्खा, तुला माझ्या तेजस्वी पतींबद्दल असें बोलण्याची हिम्मत कशी झाली. तुला माहीत आहे ते कसे शूरवीर योद्धे आहेत. ते प्रत्येक प्रती इंद्र आहेत. ते त्यांच्या कर्तव्याबाबत दक्ष असतात, सत्यासाठी ते राक्षसांशी व यक्षांशीसुद्धा दोन हात करत असतात, अशांच्या बायकोपुढे असें बेशरमपणे बोलतांना तुमची जिभ कशी झडली नाही. अरे सौवीरा, चांगली माणसे अशा गोष्टी करत नाहीत. जे विद्वान आहेत व तपस्या करत आहेत अशांबद्दल बोलतांना जरा विचार करावा. ते त्यांच्या प्राक्तनाप्रमाणे वनात रहात आहेत त्यामुळें काय बिघडते? अशी भाषा फक्त नीच प्रवृत्तीचे तुझ्यासारखे लोक करू शकतात. मला सांगावेसे वाटते कीं, येथे असलेला एकही क्षत्रिय त्यांच्या समोर उभा राहू शकणार नाही. जर ते आता आले व त्यांना समजले कीं तू अशा गोष्टी माझ्याशी करत होतास तर तुझे काय होईल ते कोणी कल्पना करू शकणार नाही. तुम्ही अशा गोष्टी करून तुमच्यासाठी एक मोठा खड्डा खोदत अहात. युधिष्ठीराशी तुमची बरोबरी होत नाही. एकाद्या मस्त हत्तीला आव्हान देण्यासारखे ते करत अहात तुम्ही. माझा दुसरा नवरा सिंहासारखा आहे, त्याला तुम्ही उठवण्याची घोडचूक करत अहात. तू जेव्हां माझ्या भिमाला पहाशिल तेव्हां तुमची भितीने गाळण होईल. माझे चौथे व पांचवे पती असे आहेत कीं, एकाद्या सापावर पाय पडावा असें तुमचे होईल. त्यांच्यापासून कोणीही तुम्हाला वाचवू शकणार नाही. जेव्हां मृत्यू येतो तेव्हांच बांबू, वेत आणि केळी ह्यांना फुल फुटतात. तसे तुमचे होत आहे. तुमचा विनाश जवळ आला असावा म्हणून अशी मागणी तुम्ही माझ्याकडे केली आहे. तुम्ही जर मला हात लावला तर तुम्हाला त्यांच्या रागाशी सामना करावा लागेल हे ध्यानात असू द्या".

ते तिचे ऐकल्यावर जयद्रथ तिला बोलतो, "मला तुझ्या सगळ्या पतींची माहिती आहे. मला त्यांच्या सामर्थ्याची सुद्धा पूर्ण कल्पना आहे. परंतु, आता तू आम्हाला त्यांची भिती दाखवण्याचा प्रयत्न करू नकोस, त्याचा कांहीं परिणाम आमच्यावर होणार नाही. एक लक्षात घे कीं, मी सुद्धा त्या सतरा उच्च क्षत्रिय कुळांतीलच आहोत. आमच्यात ते सहा उत्तम गुण सुद्धा आहेत. म्हणून आमच्या दृष्टीने तुझे पांचही पती हलक्या दर्जाचे ठरतात. म्हणून शहाणपणा करशिल व त्या हत्तीवर अथवा त्या रथात निपूटपणे जाऊन बसशिल कारण तुझ्या बडबडीचा माझ्यावर यत्किंचितही परिणाम होणार नाही. थोडक्यात सांगावयाचे म्हणजे तू आमच्या आश्रयाला यावे बर्या बोलाने, हे सौवीर तुझ्यावर कृपा करण्यासाठी सज्ज आहेत".

ते ऐकल्यावर कृष्णा त्याला बोलते, "अरे सौवीराच्या राजा, तू मला इतकी कमजोर कां समजतोस कारण माझे पती आत्ता माझ्या जवळ नाहीत? तसे असेल तर तू एक मूर्ख माणूस आहेस, कारण, जेव्हां त्यांना समजेल कीं, तू माझे हरण केले आहेस ते तुझ्यावर त्यांच्या सगळ्या शस्त्रानिशी चाल करून येतील. त्याशिवाय जिला दामोदराचे संरक्षण आहे तिला कोणालाही भिण्याची आवश्यकता नाही. ते त्यांच्या रथातून माझ्यासाठी तुमच्यावर चाल करून येतील व तुमचा नाश करतील ते पहावयाला मला आवडेल. तुमच्या फौजांच्या फळ्या फोडत ते तुझ्या पर्यंत पोहोचतील व तुझा नाश करतील तेव्हां तुला समजेल तू कोणती चूक करत आहेस. त्यांच्या हल्ल्याने तुझ्या सगळ्या सैन्यात घबराट पसरेल ते पहावयाला मला आवडेल. त्याशिवाय आमचे शूर मित्र अंधक, वृश्नी त्यांच्या फौजा आणून तुमचा फडशा पाडतील त्यात ते तुझे निरपराध सैनिक मारले जातील त्याचे मात्र मला वाईट वाटेल. धनंजयाच्या गांडीवापुढे भले भले पळून जातात त्यापुढे तुझी काय बिशाद असेल. माझ्या कैकेयी जमातीच्या टोळ्या तुमच्या सैन्याचा नाश करतील व त्यात तुझासुद्धा नाश होईल. ह्या सगळ्या नंतर घडणार्या गोष्टीचा विचार तू केला पाहिजेस. ते घडल्यानंतर पश्चात्ताप करूनही कांही उपयोग होणार नाही. खर्या खानदानी क्षत्रियांचे गुण मी तुला सांगते कारण, तुझ्या ह्या वागण्याचा अर्थ असा मी समजते कीं, तुला तुझ्या उच्च घराण्याच्या कर्तव्यांचा विसर पडला आहे. खरे क्षत्रिय विनाकारण शांतता बिघडवत नाहीत, विनाकारण युद्ध छेडत नाहीत, विनाकारण धमक्या देत नाहीत, ते निष्पाप्यांचे

संरक्षण करतात. कोणत्याही स्त्रीस छेडत नाहीत. सगळ्या निरपराध्याना संरक्षण देतात. तुझे हे वागणे ह्याच्या विपरीत आहे आणि तू त्या उच्च कुळाच्या वारसाच्या गोष्टी करत आहेस हे त्या कुळांच्या पितरांना आवडणारे नाही. मी माझ्या सौभाग्याची कधीही प्रतारणा केलेली नाही अगदी मनातसुद्धा, त्यामुळें माझे नैतिक बळ मला साथ देणार आहे. म्हणून जेव्हां माझे पती तुला व तुझ्या सवंगड्यांना शिक्षा करतील तेव्हां ते मी मोठ्या मजेने पहाणार आहे. तुमचा सगळ्या भ्रष्ट क्षत्रियांचा नाश करून ते माझे पुण्यप्रतापी पती मला पुन्हा आमच्या कम्यक अरण्यातील ह्या आश्रमात सुरक्षितपणे आणतील ह्याची मला खात्री आहे".

वैशंपायन सांगतात, ते ती बोलत असतांना तो वासनांध जयद्रथ तिचा हात पकडतो व तिला खेचण्यास सुरूवात करतो. ती त्याला जोरांने हिसका देते त्या फटक्याने तो जमिनीवर कोसळतो. त्यातून ते पुन्हा उठतो व पुन्हा तिला पकडतो. द्रौपदी त्यांच्या पुरोहितांना मोठ्यानो ओरडून हांका मारू लागते. त्यामुळें धौम्य तेथे येतात व जयद्रथाला सांगतात कीं, प्राचीन नियमानुसार विवाहीतेचे हरण करण्यासाठी त्याला प्रथम तिच्या पतींचा पराभव करावा लागेल त्याशिवाय तो तिला हात लावू शकत नाही. त्याप्रमाणे न करण्याचे भयंकर परिणाम त्याला व त्याच्या कुळाला भोगावे लागणार आहेत.

वैशंपायन पुढे बोलतात, असें बोलून ते त्या जयद्रथाच्या सैन्यात घुसतात. जयद्रथ द्रौपदीला घेऊन पळून जाऊ लागतो.

अशारितीने द्रौपदी हरण पर्वाचा सहावा भाग संपला.

# द्रौपदी हरण पर्व
## भाग सात

वैशंपायन पुढे सांगत असतात, ते होत असतांना तिचे शूरवीर पती त्यांच्या शिकारी घेऊन परतत होते ते वाटेत एका ठिकाणी एकत्र भेटतात. त्या घनदाट अरण्यात असंख्य हिंस्त्र पशु वावरत होते. त्यांच्या ओरडण्याने ते जंगल दुमदुमत होते. तेथील पक्षी एका विशिष्ट दिशेकडे ओरडत जात होते ते पाहून युधिष्ठीर इतर भावांना सांगतो, ह्या पक्षांच्या हालचाली वरून असे वाटते कीं. ह्या जंगलात कांहीं पाप शक्तींचा प्रवेश झाला आहे व कांहीतरी अघटीत घटना घटत आहे. कदाचित त्याचा संबंध आपल्याशी असू शकतो म्हणून आपण लवकर आपल्या आश्रमाकडे निघू. त्याप्रमाणें ते त्यांच्या शिकारी घेऊन त्यांच्या आश्रमाकडे निघतात. तो पुढे त्यांना सांगतो त्याला विचित्र बेचैनी वाटत आहे जसे कोणी आपल्याला आपल्या आश्रमाकडे बोलावत आहे. कदाचित कृष्णा आपल्याला हांक मारत असावी. हे कम्यक वन मला भकास झाल्यासारखे वाटत आहे. जसें समुद्र पाण्याशिवाय, गरुड सापाशिवाय, असें वाटते तेव्हां आपण लवकर आपल्या घरी पोहोचू. त्याबरोबर त्यांचे रथ सगळे शिकार केलेले प्राणी घेऊन वार्याच्या वेगानी त्यांच्या आश्रमाच्या दिशेने धावू लागले. वाटेत त्यांना बरीच अशुभ लक्षणं दिसतात, त्यात एका ठिकाणी कोल्हेकुई त्यांना ऐकू येते. ते अवलक्षण आहे असे  धनंजय त्यांना बोलतो. त्याला त्या कोल्ह्यांची वाणी समजते व तो कोल्हां सांगत आहे की, कौरवांनी आणखीन कांहीं गंडांतर आपल्या विरुद्ध रचलेले आहे. त्यानंतर ते कांहीं न बोलता त्यांच्या शिवारात येतात जेथे त्यांची कुटी आहे. तेथे पोहोचल्यावर त्यांना द्रौपदीची दासी, धात्रेयिका रडत असलेली दिसते. ते तिला असें विचारतात कीं, ती रडते कां? ते तिच्या जवळ जाऊन विचारतात कीं, ती जमिनीवर पडून गडबडा लोळू लागते, त्यांचे त्यांना आश्चर्य वाटते व ते सगळे पांडव तिला परोपरीने विचारत रहातात कीं, असें रडायला काय झाले? तुझा चेहरा असा निस्तेज कां झाला आहे? कोणी बदमाषाने आमच्या द्रौपदीला कांहीं केले नाही नां? कोणी कौरवांपैकी येऊन कांहीं आगळीक करत होते कां"? आमच्या सोन्यासारख्या बायकोला कोणी कांहीं केले कां? तिला कोठे नेले असेल तेथे जाऊन आम्ही तिला सप्त

पाताळातून सुद्धा घेऊन येऊ, असें ते बोलत होते. त्यांना समजले कीं, त्यांच्या सुस्वरुप पत्नीला कांहीं धोका झाला आहे. असा कोणी महामूर्ख असू शकतो जो अशी आगळीक करेल? आमच्या जीवापेक्षा जास्त प्रिय असलेल्या द्रौपदीला कोणी काय केले ते सांग, ते त्या दासीला विचारत होते. आम्हाला समजत नाही असे कोण असू शकतात जे असें धाडस करू शकतात"? कृपया रडणे थांबव आणि आम्हाला काय प्रकार आहे ते त्वरित सांगून टाक. आम्ही तिला आजच्या आजच परत आपल्या घरी घेऊन येऊ आणि आम्ही सगळे पुन्हा एकत्र असू. धात्रेयिका तिचे डोळे पुसत सांगते जे त्या ठिकाणी घडले त्या पांडवांच्या जाण्यानंतर. सौवीराचा राजा जयद्रथ बळजबरीने तिला घेऊन गेला व त्या प्रसंगी द्रौपदी व त्याच्यात जे संभाषण झाले ते सगळे धात्रेयिका सविस्तरपणे निवेदन करते. त्या संवादात तो जयद्रथ पांडवांचा कसा अपमान करतो ते सुद्धा ती त्यांना सांगते, जणू त्याने एकापरीने पांडवांना आव्हानच दिले होते हे ते समजतात. त्यांच्या जाण्याच्या खूणा स्पष्ट दिसत होत्या. त्यांना जाऊन फार काळ झालेला नाही हे सुद्धा धात्रेयिका सांगते. ती आणखीन सांगते कीं, धौम्यसुद्धा त्यांच्या बरोबर गेले आहेत ज्यांनी त्या क्षत्रियाला ताकीद दिली होती की, प्राचीन नियमांनुसार पतींचा पराभव करून मगच कोणी एकाद्याची पत्नी पळवून नेऊ शकतो एरव्ही नाही असें ते सांगत असतांना ते द्रौपदीला घेऊन गेले असें सगळे ती दासी त्यांना सागत होती. ती पुढे सांगते कीं, द्रौपदी सारख्या स्त्रीला कोणी स्पर्श करणे म्हणजे एकाद्या कुत्र्याने यज्ञातील लोणी चाटावे असें होत आहे. ते ऐकल्यावर संतापलेले पांडव तिला ताकीद देतात कीं, धात्रेयिके, तू फार चांगली सेविका आहेस तू असे विचारसुद्धा मनात आणू नकोस तुझ्या मालकिणाच्या मुखाचा स्वाद कोणालाही घेता येणार नाही. असें होण्या आधीच आम्ही तिला त्या नराधमाच्या तावडीतून सोडवून आणू. त्या दिशेने ते पांचही पांडव त्यांच्या मागें पाठलाग करू लागतात. त्यांच्या सोबत मोठा फौजफाटा आहे हे सुद्धा ती सांगते ह्याचा अर्थ ते फार वेगांने जाऊ शकत नाहीत हे पांडवांच्या ध्यानात येते. पांडव त्यांची खास आयुध घेतात. तेथे द्रौपदी त्या धक्क्याने जयद्रथाच्या रथात बेहोष होऊन पडलेली असते. सोमरसाचे प्राशन कोणी कुत्रा करेल ते सहन करतां येण्यासारखे नाही असा विचार करत ते पांडव त्यांच्या घुश्श्यात वेगांने जयद्रथाच्या फौजेचा पाठलाग करू लागतात. तिला हरण

करणार्याला बरबाद करूनच आम्ही तिला घेऊन परत येणार आहोत. असे विचार ते करत असतात.

वैशंपायन पुढे सांगत असतात, पांडव धात्रेयिकेला तेथे सोडून जयद्रथाच्या सैन्याचा पाठलाग करू लागतात. थोड्याच वेळात त्यांना आकाशात घोड्यांच्या टापांमुळें उडणार्या धुळीचे ढग दिसतात. त्याशिवाय सैनिकांच्या ओरडण्याचा आवाज ऐकू येऊ लागतो. धौम्य त्यांच्या मायावी सिद्धीने त्या जयद्रथाच्या सैन्याबरोबर हवेतून उडत जात असतात, ते पांडवांना पहातात व त्यांना येण्याच्या सुचना देऊ लागतात. पांडव त्यांच्या रथाचा वेग वाढवतात. भिम धौम्यांना हात करतो व सांगतो महामुनी आपण सुरक्षितपणे आश्रमाकडे जा. आता आम्ही त्यांना शिक्षा करणार आहोत. ते पांच इंद्र त्यांच्या रागाची सीमा नव्हती वेगांने जयद्रथाच्या सैन्यात घुसतात. युधिष्ठीर जयद्रथाला थांबण्याचा आदेश देतो. पांडव खरोखरच आपल्या मागे आले आहेत हे समजल्यावर त्यांच्या सैन्यात एकच गोंधळ उडतो. ते त्यांच्या दिशा हरवतात व ते सैन्य चौफेर पळू लागते.

अशारितीने द्रौपदी हरण पर्वाचा सातवा भाग संपला.

# द्रौपदी हरण पर्व

## भाग आठ

वैशंपायन पुढे सांगतात, भिमसेन आणि अर्जुनाला पाहिल्यावर ते शत्रूचे सैन्य त्या अरण्यात मोठी आरोळी ठोकू लागतात. पांडवांनी त्याला घेरले आहे ते जयद्रथ ओळखतो, त्याचे सैन्य इतस्तथा पळून गेलेले असते, त्याचा त्याला आता उपयोग होणार नाही हे तो लुच्चा राजा ओळखतो व त्याच्या रथात निपचित पडलेल्या कृष्णाकडे पहात बोलतो, ते तुझे पांच पती वेगांने माझ्या रथाकडे येत आहेत त्यांच्या पैकी कोण कोण ते तू मला सांगितले पाहिजेस. कोणत्या रथात कोण आहे ते मला समजले पाहिजे. द्रौपदी त्याला बोलते, "अरे मूर्खा, एवढा मोठा गुन्हा केल्यानंतर तुला ते कोण आहेत हे समजून तरी काय उपयोग आहे"? तुझा अंतकाळ समीप आला आहे. म्हणून मी तुझी इच्छा पूर्ण करते". असें बोलून ती कोणत्या रथात कोणता नवरा उभा आहे ते सांगू लागते. "अशारितीने तुला, माझ्या हरणकर्त्याला, ती माहिती देते कारण तसा रिवाज सुद्धा आहे. माझे पती माझ्या फार जवळ आले आहेत, तेव्हां मला तुझी बिलकूल धास्ती वाटत नाही. अरे सौवीराच्या मूर्ख राजा ऐक मी काय सांगते ते, आता पहा, ते रथाच्या ध्वजाजवळ आहेत ते माझे दोन छोटे पती आहेत, जसें प्राचीन काळी नंद व उपनंद होते. त्याच्या सौंदर्या पुढे गंधर्व फिके पडतात. ते अश्विनीकुमारांचे मुलगे आहेत. त्यांच्या पुढे जो देखणा योद्धा आहे ज्याचे नांक लांबसडक व तुरतुरीत आहे, डोळे मोठे आहेत, तो माझा सर्वात ज्येष्ठ पती, त्याला युधिष्ठीर म्हणतात, तो यमदेवाचा मुलगा आहे. तो माझा पती शरण जाणार्या शत्रूला जीवनदान करण्यासाठी ख्यातनाम आहे. म्हणून अरे मूर्खा, आत्ताच तुझी आयुध खाली टाकून तू त्याला शरण गेलास तर तुला जीवनदान मिळेल. लढलास तर नाहक मरशिल. तो मोठ्या शरीराचा ज्याचे हात लांब आहेत व जो एकाद्या सालवृक्षासारखा प्रचंड दिसतो तो माझा दुसर्या क्रमांकाचा पती आहे वृकोदर. त्याला बरेच लोक भिम म्हणून ओळखतात. त्याच्या पेक्षा जास्त ताकद असलेला इसम पुर्या जगात नाही. तो वायुदेवाचा मुलगा आहे. त्यांने अनेक राक्षस त्याच्या हाताने मारले आहेत. त्याच्याशी मुकाबला करणारा निश्चितपणे ठार मारला जातो कारण तो आगळिक

करणार्याला कदापीही क्षमा करत नाही. त्याच्या बाजूला आहेत ते माझे तिसरे पती आहेत त्यांची जगातील सर्वश्रेष्ठ धनुर्धारी म्हणून ख्याती आहे. तो साक्षात इंद्रदेवाचा मुलगा आहे. त्याचे गुण मी काय वर्णावे? त्याचे सौंदर्य गंधर्वांना लाजवणारे आहे. माझे पती कधी आगळिक करत नाहीत व दुसर्याला अशी करू देत नाहीत. त्यांच्या क्रौर्य नाही पण सत्यासाठी ते रक्ताचे पाट वाहतील, एका कुलिन क्षत्रियाला शोभेल असें त्यांचे वागणे असते. माझ्या सगळ्या नवर्यांचे समान गुण काय ते सांगते, ते अन्याय कधी करत नाहीत व अन्याय सहन करत नाहीत. त्यांच्या उपस्थितीत कोणी मर्यादा ओलांडत असेल तर ते त्याला अटकाव करतात. त्यांच्या सानिध्यात सर्व निरपराध लोक सुरक्षित असतात. माझे पती देवांना प्रिय आहेत व म्हणून ते त्यांचे संरक्षण करत असतात. माझे धाकटे पती नकुल त्यांच्या दूरदृष्टीसाठी जाणले जातात. सहदेव त्यांच्या तलवारबाजीसाठी आणि व्यवस्थापन विद्येसाठी प्रसिद्ध आहेत. त्याशिवाय त्यांच्यात ते सगळे उत्तम गुण आहेत जे एका आदर्श नवर्यात असले पाहिजेत. तुला मूर्खाला त्यांचे कसब पहावयाला मिळेल आता ह्या युद्धात. माझे सगळे पती बुद्धीमान, बोलण्यात चतूर, संयमी असें आहेत. आणखीन काय तुला त्यांच्या बद्दल माझ्या  कडून ऐकावयाचे आहे ते सांग. माझे धाकटे दोन पती त्यांच्या आईचे म्हणजे माझ्या सासुबाईचे खास आहेत. सत्या साठी ते त्यांच्या जीवाची पर्वा न करता लढणार्यांपैकी आहेत. तुझ्या सैन्याचा नाश केल्यानंतर ते त्यांना असें फेकून देतील जसें समुद्रात बुडणार्या जहाजाच्या नाविकांचे होते. तुझ्या एकट्याच्या प्रमादासाठी ते नाहक मराणार हे मला योग्य वाटत नाही म्हणून तू त्यांना आत्ताच शरण जाऊन तुझ्या सैनिकांचे प्राण वाचव".

वैशंपायन पुढे सांगतात, ते पृथाचे पांच मुलगे रागात त्या सैन्यावर बाणांचा असा वर्षाव करतात जसें बाणांचा पाऊस पडत आहे. त्या माराला ते सैनिक तोंड न देता अरण्याच्या घनदाट झाडीत आश्रय शोधत असतांना ते पांडव जयद्रथाच्या दिशेने चाल करतात.

अशारितीने द्रौपदी हरण पर्वाचा आठावा भाग संपला.

# द्रोपदी हरण पर्व

## भाग नववा

वैशंपायन पुढे सांगतात, पांडवांचा हल्ला होत असतांना सिंधचा राजा त्याच्या लष्कराला लढण्याबद्दलच्या सुचना देत होता. तेवढ्याच त्याची नजर अर्जुन आणि भिमावर पडते. त्यांच्या बरोबर नकुल व सहदेव आणि युधिष्ठीर होते ते तो पहातो. त्याना जवळ येतांना पाहून ते सैनिक जोराने युद्धाच्या आरोळ्या ठोकू लागतात. सिवी, सौवीर आणि सिंधू देशाचे लढवय्ये त्या संतापलेले असल्यामुळे भयंकर दिसणार्या पांडवांना पाहून घाबरलेले असतात कारण त्या सैनिकांना माहीत असते की त्यांच्या राजाने आगळिक केली आहे म्हणून त्यांच्याच लढण्याचे नैतिक बळ नसते. परंतु, राजाच्या आज्ञेपुढे त्यांचे काय चालणार? भिमाच्या हातात सैक्य लोहापासून बनवलेली गदा होती व त्यावर सोन्याचा मुलामा केलेला होता. तो सिंधच्या राजाच्याकडे वेगांने सरकतो. त्याच वेळी कोटीकाख्यच्या फौजा त्यांच्या रथाने भिमाला वेढा देतात. त्यानी भिमाला सिंधच्या राजापासून वेगळे ठेवण्याचा प्रयत्न करण्यास सुरूवात केली. शत्रूच्या विविध शस्त्रांच्या माराला झेलत भिम त्यांच्याशी मुकाबला करत होता. भिम त्याच्या गदेच्या प्रहाराने एक मोठा हत्ती व त्याचा माउत आणि त्यांच्या बरोबर असलेले चौदा सैनिक ठार मारतो. ते जयद्रथाला संरक्षण देत होते तेंच मारले गेले होते. अर्जुन त्याच्या बाणांच्या वर्षावाने सौवीराचे शेकडो सैनिक घायाळ करतो. तो सुद्धा जयद्रथाच्या रथाकडेच सरकत असतो. ते होत असतांना युधिष्ठीर कांहीं शंभर सैनिक मारतो. इतर सैन्य त्या रणांगणातून दूर गेलेले होते पांडवांच्या भयाने कारण त्यांना माहित होते कीं, त्या युद्धात सौवीर राजा पराभूत होणार आहे. ते त्यांचा जीव जास्त प्यारा समजून त्या निरर्थक समरापासून दूर रहाणे जास्त शहाणपणाचे आहे हे समजून होते. नकुल त्याच्या रथातून उडी मारून खाली उतरतो व तेथे असलेल्या पाईक सैन्यावर हल्ला करतो. सहदेव त्याच्या रथातूनच त्याचे परत फिरणारे भाले फेकून मारू लागतो. त्यात कित्येक हत्ती जायबंद होतात. त्या हत्तींवर बसलेले योद्धे झाडावरून पाने कशी पडतात तसे पडत होते. त्रिगर्ताचा राजा त्याच्या रथातूनच युधिष्ठीराचे चारही घोडे बाणांने घायाळ करतो. युधिष्ठीर त्याला जवळ येत आहे

असे हेरतो व त्याला बाणांने मारतो. त्याच्या छातीत ते बाण घुसतात. तो पडतो. त्रिगर्ताचा राजा रक्त ओकू लागतो. तो युधिष्ठीराच्या बाजूला तसा पडलेला असतो. युधिष्ठीराचे घोडे कामातून गेलेले असल्यामुळें तो संधी साधून सहदेवाच्या रथात चढतो. त्याच वेळी दोन शूरयोद्धे, क्षेमंकर व महामुख नकुलाला घेरतात व त्याच्यावर बाणांचा वर्षाव करू लागतात. माद्रीचा मुलगा, दोन लांबलचक भाले फेकून त्यांचा बळी घेतो. सुरथ त्रिगर्तचा राजा ज्याला हत्तींचे सैन्य हातळण्याचा अनुभव होता तो नकुलावर हत्तीतून वार करण्यासाठी सरसावतो. परंतु, नकुल त्याची अपेक्षा असावी अशाप्रकारे मोठ्या तयारीने स्वताचे संरक्षण करतो. सुरथाचा मोठ्या आकाराचा हत्ती नकुलावर चाल करतो त्याची सोंड त्यांने उंच घरलेली होती. असे वाटत होते किं, ह्यात नकुलाचा वध होतो कीं, काय, परंतु, मोठ्या शिताफीने नकुल त्याच्या तावडीतून निसटतो, दोन रथांच्या मधून तो तेथून निघून जातो. संधी साधून नकुल त्या हत्तीची सोंड तलवाराने छाटतो. तो हत्ती मोठ्यांने किंकाळ्या मारत युद्धभूमीतून दूर जातो. त्याच्या बरोबर सुरथासुद्धा बाहेर फेकला जातो. त्यानंतर नकुल थोडी विश्रांती घेतो भिमाच्या रथात बसून व नंतर पुन्हा लढण्यासाठी निघतो. भिम कोटीकाख्य लढण्यासाठी त्याच्या जवळ येत आहे असे हेरतो तेव्हां नालाच्या आकाराचा बाण तो त्याच्या सारथ्यावर फेकतो व त्यामुळें कोटीकाख्यचा सारथी मरून पडतो. कोटीकाख्याला ते समजत नाही कीं त्याचा रथ आता सारथ्याशिवाय आहे, तो रथ त्या परिस्थितीत नियंत्रणा बाहेर जातो. भिम त्याच्यावर हल्ला करतो व त्याचा वध करतो. सौवीराचे सगळे बारा मुलगे अर्जुन त्याच्या बाणाने ठार मारतो. त्यानंतर एक एक करून तो धनंजय शिवीचे, त्रिगर्तचे, सैंधवाचे सगळे शूरवीर मारून टाकतो. त्या रणभूमीत अनेक डोकी धडावेगळी पडलेली होती, त्याच बरोबर डोक्याशिवाय अनेक देह धारातीर्थी पडलेले होते. आकाशांतून गिधाडांच्या घिरट्या सुरू झाल्या होत्या. रानातील कोल्हे, लांडगे, तरस असें हिंस्र प्राणी तेथे जमू लागतात. जयद्रथाला समजते कीं त्याचे कित्येक आप्त त्या लढाईत मारले गेले आहेत, तो चमकतो. तो तेथून पळूंन जाण्याचा विचार करतो. तो त्या अंधाराचा फायदा घेऊन आल्या वाटेने पळून जाण्याचा प्रयत्न करतो. युधिष्ठीर द्रौपदीला धरतो त्यावेळी धौम्य तेथे येतात. भिम उरलेल्या शत्रूसैन्याची कत्तल करण्यात गुंतलेला असतो कारण त्याला तो अपमान सहन झालेला नसतो. अर्जुन भिमाला

सांगतो ज्याच्या चुकीमुळें हा अनर्थ झाला तो पळून गेला आहे आता ह्या निरपराध सैनिकांना मारणे धर्माला धरून होणार नाही. ते पाप ठरेल म्हणून तो नरसंहार आता थांबव. हे सैनिक आपले अपराधी नाहीत म्हणून त्यांना मारणे क्षत्रियाला शोभणारे ठरत नाही.

वैशंपायन पुढे सांगतात, भिमाला ते अर्जुनाचे पटते व तो युधिष्ठीराला विचारतो, "बहुतेक शत्रूचे सैनिक मारले गेले आहेत व उरलेले पळून गेले आहेत आपण द्रौपदीला घेऊन आपल्या आश्रमात जाणे योग्य होईल कां? त्यानंतर आपल्याला तिचे सांत्वन करावे लागणार आहे". पुढे तो बोलतो, "तो सिंधचा मूर्ख राजा, त्याच्या इच्छेसाठी पुन्हा द्रौपदीला त्रास देण्यासाठी येणार नाही असें समजणे योग्य होणार नाही". त्यावर युधिष्ठीर त्याला उत्तर देतो, "माझ्या प्रिय भावा, तुला माहीत आहे कीं, तुझी चुलत बहिण दुःशला जयद्रथाची पत्नी आहे तेव्हां त्याचा वध करणे आपल्याला शोभणार नाही. काकी गांधारीला काय सांगणार मी"? त्याला मारणे हा ह्यावर बदला घेण्याचा मार्ग नाही.

वैशंपायन सांगत असतात, युधिष्ठीराचे ते ऐकून द्रौपदीला उत्साह आला. ती भिमाला आणि अर्जुनाला बोलते, जर तुम्हाला माझी जरातरी पर्वा असेल तर, त्या नीचाचा वध करणे तुमच्यासाठी अगत्याचे आहे. तो मेल्याशिवाय माझ्या जीवाला शांती मिळणार नाही. तिचे ते बोलणे युधिष्ठीराला आव्हान देण्यासारखेच होते. अशा पापी, नीच माणसाला एक राजा म्हणवून घेण्याचा अधिकार नाही. त्या संधव कुळाचा तो नीचात्मा मेलाच पाहिजे. जो पापी पुरूष तुमच्या बायकोला तिच्या असहायतेचा फायदा घेऊन बळजबरीने खेचून नेतो तो जरी क्षमेची आराधना करेल तरी तो मेलाच पाहिजे. ते तिचे क्रोधाने बोलणे त्या दोघा भावांना पटते व ते जयद्रथाच्या शोधात निघतात. युधिष्ठीर मात्र द्रौपदीला व धौम्यांना घेऊन नकुल व सहदेवा बरोबर त्यांच्या आश्रमात जातो. ते त्याच्या आश्रमात शिरतात ते पहातात कीं, ऋषी मार्कंडेय त्यांच्या शिष्य गणांना घेऊन तेथे आधीच उपस्थित होते. तेथे उपस्थित असलेले ब्राह्मण द्रौपदीवर आलेल्या प्रसंगामुळे फार चिंतीत झालेले होते. युधिष्ठीर मात्र संयमाने त्यांच्यात आपल्या दोन भावांसह जाऊन बसतात. द्रौपदीला पळवणार्यांचा पराभव करून ते परत आलेले पाहून तो ब्रह्मवृंद आनंदीत होतो.

तेथे भिम व धनंजय शत्रूचा पाठलाग करत जात असतात. त्यांचा अदाज असतो कीं, जयद्रथ चांगला दोन कोस इतका पुढे गेलेला आहे. अर्जुन त्याच्या दैवी आयुधाच्या मदतीने तितक्या अंतरावर असलेल्या जयद्रथाच्या रथाचे दोन घोडे मारून टाकतो. त्यासाठी तो खास मंतरलेले बाण वापरतो, जे लक्ष्याचा वेध घेण्यासाठी असतात. घोडे मेल्यामुळें जयद्रथ कावराबावरा झालेला तेथे असतांना पांडव द्वय तेथे पोहोचतात. आपले दोनही घोडे मेल्यामुळें तो एका विचित्र परिस्थितीत तेथे उभा त्यांना दिसतो. धनंजयाला येतांना तो पहातो व अंधाराचा फायदा घेऊन तो त्या वनात कोठेतरी पळून जातो. ज्या मार्गाने तो त्या अरण्यात आला होता त्याच मार्गाने तो तेथून पळून जाण्याचा प्रयत्न करत असतो. घाबरलेला जयद्रथ अर्जुन पहातो. त्याला जोरांने ओरडून तो बोलतो, "अरे तुला थोडीतरी शरम आहे कां? एका असहाय व तुझ्या पत्नीची नातलग असलेल्या बाईला तू अशारितीने पळवून नेण्याचा प्रयत्न करतोसच कसा"? असा पळून जाऊ नकोस आम्ही तुला असें सोडणार नाही म्हणून बर्या बोलांने मागे वळ". "अशारितीने मी तुला पळून जाऊ देणार नाही. त्या रणात तुझ्या योद्ध्यांना तसेंच आमच्या ताब्यात सोडून जातोस कसा"? तो तसे बोलत असतांना सिंधचा राजा मागे वळत नाही व तसांच पुढे पळत रहातो. भिम त्याच्यावर झडप घालून त्याला पकडतो व तो त्याला कंठस्नान देणार होता परंतु, धनंजय त्याला तसें करू देत नाही.

अशारितीने द्रौपदी हरण पर्वाचा नववा भाग संपला.

# द्रौपदी हरण पर्व

## भाग दहावा

वैशंपायन पुढे सांगत असतात, त्या दोन भावांना त्याच्या जवळ येतांना पाहिल्यावर जयद्रथ पळू लागतो. भिमापुढे तो फार जाऊ शकत नाही. वृकोदर त्याला त्याच्या झिंज्या पकडून उचलतो व जोरांने जमिनीवर आदळतो. त्या मारामुळें तो बेशुद्ध होतो. जसा तो शुद्धीवर येतो, तो कण्हू लागतो. तो उठण्याचा प्रयत्न करतो. ते पाहून भिम त्याच्या डोक्यावर लाथ मारतो. तो पुन्हा खाली कोसळतो. त्यानंतर भिम त्याच्या छाताडावर त्याचा गुडघा दाबण्यास सुरूवात करतो. त्यामुळें तो मेला असता. त्या दाबामुळें जयद्रथ पुन्हा बेहोष होतो. त्यावेळी अर्जुन भिमाला थांबवतो व त्याला आठवण करून देतो कीं आपण युधिष्ठीराच्या आज्ञेत रहावयाचे आहे. हा राजा त्यांच्या चुलत बहिणीचा नवरा आहे व म्हणून त्याला एकवेळ जीवनदान द्यावे असें त्यांने सांगितल्याचे तो त्याला सांगतो. भिम त्यानंतर त्याचा गुडघा जयद्रथाच्या छाताडावरून काढतो. जयद्रथ तसांच निपचित पडलेला असतो. भिम धनंजयाला आठवण करून देतो कीं, त्यांने द्रौपदीला आश्वासन दिले आहे कीं, तो जयद्रथाला ठार मारून तिच्यावर झालेल्या अन्यायाचा सूड उगवेल. त्याचे काय? अर्जुन त्याला शांत करत सांगतो कीं, द्रौपदीला तो समजावून घेईल, ती त्याची जबाबदारी असेल. भिमाला त्याच्या मोठ्या भावाचा कचखाऊपणा अजिबात आवडत नाही. तो संतापाने बोलतो, "आपला भाऊ नेहमीच दुर्जनांना त्याच्या भेकडपणाने मदत करत असतो. तो नेहमीच त्याचे मोठा असल्याचा गैरफायदा घेत मला अडवत असतो. त्यात तू त्याला मदत करत असतोस, तुम्ही दोघे स्वताला काय माझ्यापेक्षा जास्त शहाणे समजता काय? ह्यावेळी ते मी सहन करणार नाही. त्याने माझ्या पत्नीचा घोर अपमान केला आहे, त्याबद्दल मी त्याला शासन करणार. चांगुलपणाचा जर दुर्जन फायदा उठवत असतील तर तो चांगुलपणा सुद्धा दुर्गूण ठरतो हे नितीशास्त्राचे तत्त्व तुम्ही दोघे नेहमी नजर अंदाज करत असता. आमच्या मोठ्या भावाला सत्पात्र आणि अपात्र ह्यातील फरक कधीच समजत नाही असें वाटते. त्याच्या चांगुलपणाला सद्गुण म्हणावयाचे कां दुर्गूण हे समजत नाही. पण मी आईला दिलेल्या वचनात आहे म्हणून हे

सगळे सहन करत असतो. आईला दिलेले वचन श्रेष्ठ कां पत्नीला दिलेले वचन श्रेष्ठ ह्याचा निर्णय घेण्यात मी आता असमर्थ ठरलो आहे. त्या संभ्रमात मी असतांना तू माझ्यावर दबाव आणत आहेस". त्यानंतर भिम त्याच्या कडील सुरा वापरून जयद्रथाचे लांब वाढलेले केस कापून टाकतो. त्यावेळी जयद्रथ कांही बोलत नाही. त्यानंतर भिम जयद्रथाला बोलतो, "जर अरे मूर्खा, तुला जीवंत राहावयाचे असेल तर मी काय सांगतो ते ऐक. भर सभेत सगळ्यांच्या पुढे तू जाहीर करशिल कीं, तू पांडवांचा दास आहेस. जर असे बोलण्याचे वचन देत असशिल तरच मी तुला आता सोडेन, बोल काय करणार आहेस? असें युद्धात हरलेल्यांने बोलण्याचा प्रघात आहे, तसें तुला करण्यास सांगत आहे". त्यावर जयद्रथ तसे बोलण्याचे मान्य करतो व बोलतो, "तसें मी बोलेन", जयद्रथ थरथर कापत होता. त्याचे अंग पूर्णतया चिखलाने माखलेले होते. त्यानंतर भिम व अर्जुन त्याला साखळदंडाने बांधून त्याच्या रथात घालतात. त्यानंतर ते त्याच्या आश्रमाकडे निघतात. त्यानंतर त्याला युधिष्ठीराच्या समोर आणले जाते, त्याला पाहून युधिष्ठीर स्मित करतो व त्याला कैदेतून मुक्त करतो. त्यावेळी भिम ओरडून बोलतो कीं, "त्याला सोडण्याचा अधिकार तुला कोणी दिला? हा वस्तुतः द्रौपदीचा अपराधी आहे, त्याला सोडण्याचा अधिकार फक्त आणि फक्त कृष्णेला आहे". तेथे द्रौपदी असते, तिला युधिष्ठीर विचारतो, "प्रिय कृष्णा, माझ्यामते काय उचित आहे ते सांगतो, नंतर तू ह्याच्या बाबत जो निर्णय घेशिल तो मान्य होईल. असें बोलल्यानंतर राजा सांगतो कीं, ह्याने जो गुन्हा केला आहे त्याबद्दल त्याला शिक्षा करण्याचा मुख्य अधिकार दुःशलाचा म्हणजे आपल्या बहिणीचा, त्याच्या बायकोचा आहे. जर आपण त्याला मारले तर तो तिच्यावर अन्याय होईल. त्याच प्रमाणे ह्या तोंडाने तो त्याच्या सासूला तोंड दाखवू शकणार नाही. तो जीवंत राहिला तरच ती शिक्षा त्याला भोगावी लागेल म्हणून तूर्त त्याला सोडणे शहाणपणाचे ठरते कारण जीवंतपणी त्याला त्याची पत्नी जगू देणार नाही ही खरी शिक्षा त्याला होईल ते माझ्यामते जास्त श्रेयस्कर ठरते. त्याशिवाय ह्याला शासन आपण करणार आहोतच जेव्हां हा त्याच्या साळ्यांच्या (मेहुण्यांच्या) बाजूने आपल्याशी त्या भविष्यात होणार्या युद्धात उभा रहाणार आहेच, तेव्हां वृकोदर त्याला ती शिक्षा करेल. शिक्षा त्याला होणारच आहे परंतु, थोड्या सवडीने ती देण्यात अनेक गोष्टी साध्य होणार आहेत. गुन्हेगार शिक्षे शिवाय

रहाणार नाही. परंतु, ती आत्ताच घाईने देण्याने अनेक इतर बाबी अपुर्या रहातात. म्हणून मी त्याला तूर्त सोडण्याचा आदेश दिला आहे. आता सांग तुला काय करावे ते". द्रौपदी सह सगळ्यांना तो युक्तीवाद योग्य वाटतो, तेथे असलेले ब्राह्मण त्याला अनुमोदन करतात व द्रौपदीला सुद्धा ते योग्य वाटते व म्हणून ती भिमाकडे त्याचे काय, ते पहाण्यासाठी सुचकपणे पहाते. वृकोदरालासुद्धा तो युक्तीवाद पटतो व नंतर तो कृष्णाला त्याचे अनुमोदन दर्शवतो. त्यानंतर द्रौपदी सांगते कीं, "आपण जे उचित समजता त्याप्रमाणे व्हावे". त्यानंतर जयद्रथ जेमतेम तेसुद्धा अर्जुनाच्या आधाराने उभा होता त्याच्याकडे पहात युधिष्ठीर त्याला सांगतो, "आज तू मुक्त झाला आहेस परंतु, अशा चुका तू पुन्हा करशिल तर तेव्हां तुला त्वरित ठार मारले जाईल. तुला तुझ्या मेव्हणीवर हात टाकतांना लाज कशी वाटली नाही. मेव्हणी बहिण असते हे तू कसा विसरलास. माझ्या भावांने ह्या गुन्ह्याची तुला आठवण रहावी म्हणून तुझे केस कापले आहेत जे क्षत्रियाची शान असते. आता तू आमचा दास झाला आहेस ह्याची जाणीव ठेवून पुढे काय करावयाचे ते ठरवं". तो पराजित राजा युधिष्ठीरापुढे नतमस्तक करून उभा रहातो. तेथे बसलेल्या मुनींनासुद्धा लवून नमस्कार करतो. "ह्यापुढे तरी तू चांगल्या सवयी ठेवशिल. परस्त्री मातेसमान असते असें सगळे कुलिन क्षत्रिय समजतात अशात तू जे केलेस त्यामुळे तू कुलिन क्षत्रिय राहीला नाहीस. खरेतर तू राजा बनण्याच्या योग्यतेचा नाहीस हे दाखवून दिले आहेस. ह्यापुढे तरी तू अशा वामकृत्यात मर्दानगी समजणे सोडून देशिल अशी मी अपेक्षा करतो" युधिष्ठीर बोलतो.

त्या प्रसंगानंतर पश्चात्तापाने व्यग्र झालेला तो राजा गंगा किनारी निघून जातो जेथे ती सपाट प्रदेशात प्रथम उतरते, तेथे त्रिनेत्रच्या उमाला प्रसन्न करण्यासाठी तपस्या करण्यास बसतो. तो त्याच्या राज्यात जातच नाही. तेथे तो घोर तप करत बसतो. त्याच्या तपस्येने प्रसंन्न झालेली उमादेवी त्याला माणसाच्या रुपात दर्शन देण्यास तयार होते. ती त्याने केलेली पुजा स्वीकारते व त्याने दिलेला प्रसाद भक्षण करते. ती त्याला एक आशिर्वाद देते.

वैशंपायन पुढे सांगतात, अरे राजा, तो कोणता वर तिने दिला ते समजण्यासारखे आहे. तो आशिर्वाद असा मांगतो कीं, मी युद्धात त्या पांचही पांडवांचा पराभव करू शकलो पाहिजे.

ते ऐकल्यावर शंभू त्याला सांगतात किं, तसा दुवा देता येत नाही. कारण ते नेहमी अजिंक्य असणार हे विधीलिखीत आहे. परंतु, तुला असा वर देता येईल कीं, तू त्यांना युद्धात अडवू शकशिल. त्याच्यातील धनंजय साक्षात नर देव आहे जो सदैव नारायणाबरोबर असणार हे विधीलिखीत आहे, ते बदलता येत नाही. गेल्या कल्पात त्याने बदरीक्षेत्री घोर तपस्या केलेली आहे. मी स्वतः त्याला माझी दैवी आयुध दिली आहेत. इंद्राकडून त्याला वज्र मिळाले आहे. त्याच्या बरोबर साक्षात विष्णू असतात. जो विश्वाचा तारण कर्ता आहे. ह्या कल्पाच्या अंती वडवानलाचे रुप घेऊन तो विष्णू सगळे जग जाळून टाकणार आहे. त्यानंतर वायुदेवाच्या मदतीने तो आकाशातून पाऊस पाडू लागेल. त्यानंतर पुन्हा नवीन सृष्टी उत्पन्न तो करेल. त्यामध्ये राक्षस, यक्ष, पिशाच्च, नांग, माणूस, इतर पशु व पक्षी आणि मत्स्य आदि सगळे चराचर असतील. ते सगळे एक मार्कंडेय ऋषी पहात असतील. जयद्रथ मध्येच विचारतो, कृपया मला आपण त्या नव्या सृष्टीबद्दल आणखीन सांगा. तेव्हां शंभू सांगू लागतात, दुसर्या एके वेळी, सर्वश्रेष्ठ भगवान, जगातील चांगुलपणा वाचवण्यासाठी अवतार घेतात, त्या अवतारात ते केसरीचे मुख व देह मात्र मानवाचा अशा रुपात असतात. दैत्य म्हणजे दितीचा मुलगा, हिरण्य कश्यपु, त्याला पाहून रागावला त्याचे डोळे लाल झाले होते, तो काळ्या ढगासारखा भयंकर दिसत होता. त्याच्या हातात त्रिशूळ होते. तो भगवान विष्णूच्या त्या अवतारावर चालून गेला. त्याबरोबर नरसिंहाच्या त्या अवताराने आकाशात उडी मारली व त्या दैत्यावर तुटून पडला. त्याने त्याच्या पंजाच्या तीक्ष्ण धारदार नखांने त्याचे उर फाडून टाकले. जनसामान्यांच्या भल्यासाठी त्याने ते केले होते. त्यानंतर विष्णू पुनः अदितीच्या पोटी जन्म घेतो ते काश्यप मुनी म्हणून. हजारो वर्षाच्या शेवटी तो आणखीन एक अवतार जन्म घेतो. तो पावसातील ढगां सारखा दिसणारा बुटका अवतार होता. त्याच्या हातात ब्रह्मचारी धरतात तसा दांडा होता. एका हातात पाण्याचा कलश होता. त्याचे केस कुरळे होते. त्या केसाच्या जटा झाल्या होत्या. देहावर व्रतबंधाचे जान्हवे होते. त्याचा बांधा कणखर होता. तो तेजाने चमकत होता. अशा स्वरुपात तो वामन अवतार, बलीराजाच्या यज्ञाला उपस्थित होतो. बलीने ब्रह्माच्या समाधानासाठी तो यज्ञ आरंभिलेला होता. त्या बुटक्या ब्रह्मणाला पाहून त्याचे मोठ्या आनंदाने स्वागत करतो तो बलीराजा. बलीराजा त्याला विचारतो, "आपले

येणे झाले त्याचा मला फार संतोष होत आहे तरी आपल्याला मी काय दान करावे ते सांगा". बलीराजाच्या दानशूरतेची मोठी ख्याती होती. ब्राह्मण जे मागेल ते देण्याची त्याची तर्हा होती त्यामुळेंच तो सगळ्या ऋषीवर्गात मोठा प्रसिद्ध होता. त्याचा राज्य कारभार सुद्धा देवांना लाजवेल असा निर्दोष होता, तरी तो दितीचा मुलगा असल्यामुळें त्याच्या पुण्यप्रभावाचा इतर वाईट दैत्य गैरफायदा उठवण्याची भिती देवांना होती. म्हणून त्याचा बंदोबस्त करण्याची आवश्यकता होती. हे सगळे लक्षात घेऊन वामन अवतारातील विष्णू त्याला बोलतात, "तथास्तु, मला फक्त माझी तीन पावले इतकी जागा तुझ्या साम्राज्यातील तू देशिल कां"? बली त्याच्या दानशूर स्वभावाप्रमाणें त्याला मान्यता देतो. त्याबरोबर वामन अवतारातील विष्णू त्याचा आकार वाढवतो तो इतका कीं, त्याच्या पहिल्या पावलात स्वर्ग, दुसर्या पावलात पृथ्वी आणि तिसर्या पावलात पाताल तो घेतो. म्हणजे बलीचे सगळे साम्राज्य तो त्या तीन पावलात सामावतो. बली त्याच्या शब्दाचा खरा होता. तो त्याच्या सगळ्या साम्राज्यावर पाणी सोडतो. त्यानंतर बली वामनाला विचारतो, "माझे राज्य आता तुझे झाले आहे तेव्हां त्यात मी कोठे रहावे ते सांगावे". त्यावर सदानंद त्याला सांगतो, "अरे तू मला जिंकले आहेस म्हणून तू पाताळात रहाशिल परंतु, तुझी सेवा करण्यासाठी मी स्वतः तुझा द्वारपाल अशा रुपात तेथे सदैव हजर असेन. तू पाताळात अशासाठी किं, तुझा अहंकार अजून निमाला नाही. नाहीतर तू स्वर्गात गेला असतास. विष्णू ते सगळे इंद्राला अर्पण करतो. त्यासाठी विष्णूच्या त्या अवताराला वामनावतार असें म्हणतात. त्याच प्रमाणें त्या तिनही लोकांना वैष्णव असें समजले जाऊ लागले. ते वाईटाच्या नियंत्रणाचे व चांगल्याच्या संवर्धनाचे कार्य तो विष्णू सदैव करत असतो व त्या करतांच आता त्याने यदू कुळात कृष्णाच्या रुपात जन्म घेतला आहे. त्यात हे दोघे ऋषी नर आणि नारायण आहेत. त्यातील नर कुंतीच्या पोटी अर्जुनाच्या रुपात अवतरला आहे व नारायण कृष्णाच्या रुपात द्वारकेला आहे. त्यांना कोणी मारू शकत नाही पण बाकीचे चार पांडव तू जर एका दिवसात मारू शकलास तर ते शक्य होईल पण जर तुला ते एका दिवसांत मारणे जमले नाही तर त्यातील फक्त एकच कोणी तू मारू शकशिल कारण ते सामान्य माणसे नाहीत ते दैवी अवतार आले आहेत असुरांचा नाश करण्यासाठी जे दुर्योधनाच्या बरोबर असतील. अरे हे सगळे आधीच

ठरलेले आहे. त्यात मी बदल करू शकणार नाही. ते तुला कबूल असेल तर तो वर मी तुला देण्यास तयार आहे". जयद्रथ ते मान्य करतो.

वैशंपायन पुढे सांगतात. ते महादेवाचे ऐकल्यावर तो राजा ते मान्य करतो. त्यानंतर महादेव उमा आणि त्यांचे बुटके गण तेथून अंतर्धान पावतात. तो वर घेऊन जयद्रथ त्याच्या ठिकाणी निघून जातो.

पांडव त्यांच्या कम्यक वनातील आश्रमात शांतपणे राहू लागतात.

अशारितीने द्रौपदी हरण पर्वाचा दहावा भाग संपला.

# द्रौपदी हरण पर्व

## भाग अकरावा

जनमेजय त्यांना विचारतो, द्रौपदीवर झालेल्या अन्याया नंतर ते पांडव पुढे काय करतात. वैशंपायन सांगतात, द्रौपदीला घरी आणल्यावर राजा त्याच्या मुनी मित्रांबरोबर बैठकीच्या जागी बसलेला असतो. तेव्हां ते ब्रह्मण त्या अतिप्रसंगाबद्दल चर्चा करत असतात. त्यांच्यात महान ऋषी मार्कंडेयसुद्धा असतात. युधिष्ठीर त्यांना बोलतो, "अहो धन्य ऋषी, देवांत व ऋषींमध्ये तुमचे भूत व भविष्यातील घटनांचे ज्ञान सर्वात जास्त असे सगळे जाणतात. मला त्या गोष्टींबद्दल कांही शंका आहेत तरी त्यांच्या समाधानासाठी मी आपल्याला विचारू इच्छितो. त्यांचे समाधान आपण कराल तर मोठी कृपा होईल". पुढे तो विचारतो, "द्रौपदी यज्ञाच्या कुंडातून अवतरली आहे हे सगळे जाणतात . तिचा जन्म योनीतून झालेला नाही. ती भाग्यवान आहे व ती राजा पंडुची सून आहे, मला वाटते कीं, काळ व माणसाचे भाग्य त्याच्या पूर्वजन्माच्या कर्मयोगानुसार ठरत असते, त्यात जे घडणार ते घडणारच असें समजले जाते. असें असतांना तिच्यावर असा अतिप्रसंग कसा गुदरला"? "तसेंच इतरांच्या बाबतसुद्धा असें आढळते कीं, त्याच्यावर चोरीचा खोटा आळ घेतला जातो, द्रुपदाच्या कन्येने कधी कोणत्याही प्रकारची आगळीक केल्याचे ज्ञात नाही, किंवा असें कृत्य केले नाही कीं, त्याच्या बदल्यात तिला कांहीं सजा व्हावी. उलटपक्षी ती नेहमी पवित्र कार्यच करत आली आहे, एकाद्या उच्च कोटीच्या ब्राह्मणासारखे तिचे सगळे वर्तन असते, असें सगळे चांगले असतांना त्या मूर्ख जयद्रथाला तिला पळवून नेण्याची बुद्धी झाली त्या मागे काय स्पष्टीकरण देता येईल. त्या नीच माणसाचे सैन्य मारले गेले व त्याचे केस कापले गेले आहेत. त्याला जबरी मार सुद्धा बसला आहे. त्याच्या ताब्यातून आम्ही तिला सोडवले, असें सगळे झाले तरी, ह्या एकंदर प्रकारामुळें आमची जी नालास्ती होत आहे कीं, आम्ही तिला एकटे ठेवून बेजबाबदारपणे वर्तन केले ती झालीच. एक गोष्ट खरी कीं, हे जंगलातील जीवन दुःखमय आहे. जंगलात राहून आम्ही त्या वनातील पशु रहिवाशांचे वध करत असतो कारण, आम्हाला जगावयाचे असते. आम्हाला

हे जे भोगावे लागत आहे तेसुद्धा राजकर्त्यांच्या पापबुद्धीमुळें होत आहे. मला सांगा, अहो ऋषी, ह्या जगात आमच्यापेक्षा जास्त दुर्दैवी कोणी असेल कां"?

अशारितीने द्रौपदी हरण पर्वाचा अकरावा भाग संपला.

# द्रौपदी हरण पर्व

## भाग बारावा (मार्कंडेय रामायण अथवा सीता हरण आख्यान सुरू)

मार्कंडेय ऋषी सांगू लागतात, तुला माहित आहे कीं, प्राचीन काळी रामालासुद्धा अशा प्रसंगाला तोंड द्यावा लागले होते. त्याचा कांहीं दोष नसतांना केवळ वचन बंधनाचा मान ठेवण्यासाठी तो व त्याच्या बरोबर त्याच्या पत्नीने व भावाने काय अरिष्ठांना झेलले ते आपण सगळे जाणत आहोत. राक्षसांचा राजा दशानन रावण कपट बुद्धीने पक्षीराज जटायुला फसवून रामाच्या सीतेला असेंच नेले होते. हे खरे कीं, रामाने सुग्रीवाच्या मदतीने सीतेला पुन्हा सोडवीन आणले परंतु, त्यात किती मानहानी त्या अबलेची झाली ते सर्वश्रृत आहे. त्यासाठी सुग्रीवाच्या सैन्याने समुद्रावर एक पुल बांधला व लंकेत बाणांचा वर्षाव करून रावणाला हरवले.

युधिष्ठीर त्यांना विनंती करतो कीं, "त्या रामाची सगळी कथा आम्हाला तुमच्या मुखातून ऐकावयाची आहे. तो कोणत्या कुळांत जन्मला, त्याचे गुण काय होते ते सांगा. तसेंच रावण कोण होता? त्याने रामाच्या पत्नीला कां पळवले? रावण कोणत्या कुळात जन्मला होता. रामाशी त्याचे असें काय वैर होते कीं त्यांने असे करावे? आम्हाला त्या नरश्रेष्ठ रामाची कथा आपल्या मुखातून ऐकावयाची आहे. आपण ह्या विश्वाचे प्रत्यक्षदर्शी साक्षीदार म्हणून स्वयंभूने सांगितले आहे म्हणजे आपण ते सगळे प्रत्यक्ष पाहिले आहे. तेव्हां ते जसे पाहिले तसे आम्हाला सांगावे व आम्हाला उपकृत करावे".

मार्कंडेय सांगू लागतात, तुला ती सगळी कथा मी सांगतो, ती नीटपणे लक्ष देऊन ऐक. ती कशी घडली तशीच मी तुला आता सांगणार आहे. त्या प्रसंगांतून रामाला व सीतेला किती यातना भोगाव्या लागल्या ते सगळे मी तुला सविस्तरपणे सांगणार आहे. फार पूर्वी एक राजा होऊन गेला. त्याचे नांव होते अज. तो ईक्ष्वाकु घराण्यातील होता. त्याला दशरथ नांवाचा एक मुलगा होता. तो वेदशास्त्र संपन्न होता. तो पवित्र जीवन व्यतीत करत होता. दशरथाला चार पुत्र होते. तेसुद्धा चांगले सुविद्य होते. त्यांची नांवे होती, पहिला राम, त्यानंतर क्रमानें लक्ष्मण, शत्रुघ्न आणि भरत. रामाची आई होती कौशल्या व भरताची आई होती कैकेयी. लक्ष्मण व शत्रुघ्न दशरथाच्या तिसर्या पत्नीची सुमित्राची लेकरं होती.

त्याच काळी विदेहचा राजा होता जनक. त्याला एक कन्या होती तिचे नांव होते सीता. तश्त्रीने स्वतः तिला उत्पन्न केले होते. त्याची इच्छा होती कीं, रामाचा विवाह सीतेशी व्हावा. ही राम व सीतेची जन्माची माहीती मी तुला थोडक्यात सांगितली. आता मी तुला रावणाच्या जन्माची कथा सांगतो. ह्या सृष्टीला उत्पन्न करणारा साक्षात ब्रह्मा प्रजापती रावणाचा आजोबा होता. त्याच्या तपोसामर्थ्याचे काय वर्णन करावे. त्या प्राचीन काळी ऋषी पुलस्त्य नांवाच्या ऋषीला एक मुलगा होता. त्याचे नांव होते वैश्रावण. तो गाईपासून उत्पन्न झाला होता. तो वैश्रावण त्याच्या पित्याला सोडून त्याच्या आजोबाकडे रहावयास गेला होता. प्रजापती त्याच्यावर प्रसन्न झाले होते व त्यांनी त्याला अमरत्वाचा वर दिला होता. त्यामुळें नाराज झालेल्या बापाने दुसरा पुत्र स्वताच्या शरीरातून जन्माला घातला. त्याचे नांव विश्राव असें होते. विश्राव म्हणजे दुसरा पुलस्त्यच होता. त्याला वैश्रावणाचा सूड उगवावयाचा होता. परंतु, वैश्रावणाला ब्रह्माने आधीच सगळ्या विश्वाच्या संपत्तीचा मुख्य नेमले होते व त्याला अमरत्व सुद्धा दिले होते. त्याशिवाय एक दिशा त्याच्या ताब्यात दिली होती. त्याची इशानदेवाची चांगली दोस्ती होती व त्याला एक मुलगा होता त्याचे नांव होते नलकुबेर. त्याशिवाय त्याला त्यांने लंकेचे राज्य सुद्धा दिले होते. त्या लंकेचे संरक्षण राक्षस करत असतं. त्याशिवाय. एक उडणारा रथ ज्याला पुष्पक विमान म्हणत ते दिले होते. प्रजापतीच्या इच्छेनुसार यक्षाचे कारभारसुद्धा त्याच्या कडेच होते. हे जे सगळे दिले होते त्यामुळें पुलस्त्याच्या विश्राव अवताराला वैश्रावणावर राग होता.

अशारितीने द्रौपदी हरण पर्वाचा बारावा भाग संपला.

# द्रौपदी हरण पर्व

## भाग तेरावा

मार्कंडेय सांगत असतात, पुलस्त्य ऋषीचा तो मुलगा विश्राव, जो पुलस्त्याचाच भाग होता, त्याच्या मोठ्या भावाच्या श्रीमंतीचा लोभ करू लागतो. त्याला वैश्रावणाचा द्वेष वाटत असतो. वैश्रावणाला जाणीव असते कीं, विश्राव त्याचा द्वेष करत आहे. तो कुबेर जो राक्षसांचा राजा होता, त्या विश्रावाला खूष करण्याचे हरएक प्रयत्न करत असतो. कुबेर ज्याचे वाहन आहे माणूस (माणसाच्या मानगुटीवर तो बसला आहे असा अर्थ होतो), लंकेत रहात असतो, त्याच्या भावाला विश्रावाला, मदत करण्यासाठी तीन राक्षशिणींची नेमणूक करतो. त्या राक्षशिणींची नांवे अशी होती, पुष्पोत्कता, ऐका आणि मालिनी. त्या नाचगाण्यात प्रवीण होत्या. त्या प्रामाणिकपणे त्यांच्या धन्याची विश्रावाची सेवा करत होत्या. स्त्रीसुलभ प्रवृत्ती त्या तिघींत होती व त्यामुळें, त्या तिघी एकमेकीचा द्वेष करत असतं. विश्राव ऋषीची सेवा करण्यात त्यांची चुरस लागत होती. तो ऋषी त्यांच्या सेवा तत्परतेवर संतुष्ट झाला व त्यांना कांही वर पाहिजे कां असे त्यांने विचारले. त्यांच्या सगळ्यांच्या इच्छे नुसार त्यानी त्या प्रत्येकीला एक मुलगा दिला. पुष्पोत्कताला कुंभकर्ण आणि रावण झाले. मालिनीला बिभीषण झाला, आणि ऐकाला जुळें झाले त्यांची नांवे खरा आणि शुर्पणखा. त्या सगळ्यात बिभीषण फार देखणा होता. तो पवित्र प्रवृत्तीचा होता. तो धार्मिक कार्यात त्याचा समय व्यतीत करत असें. त्या पांचात मोठा रावण होता. त्याला दहा तोंड होती. म्हणून त्याला दशानन असें म्हणतं. तोसुद्धा व्रतस्थ जीवन जगणारा होता. त्याने तपोबळावर मोठी सिद्धी प्राप्त केलेली असते. कुंभकर्ण लढण्यात प्रवीण होता. मायावी सिद्धीत तो अव्वल होता. खरा धनुर्विद्येत प्रवीण होता. तो ब्राह्मणांचा द्वेष्टा होता. तो फक्त मांसाहार करत असें. शुर्पंणखा तपस्या करणार्यांना सतावण्यात आनंद मानत असें. त्यांच्या तपस्या भंग करण्यात तिला मजा वाटत असें. त्यासाठी ती विविध रुप घेऊन त्यांना भेटत असें. ती विश्रावाची एकुलती एक मुलगी व सगळ्या भावंडांची लाडकी होती. मोठा भाऊ रावणाचे तिच्यावर विशेष प्रेम होते. ते सगळे वेदाचा अभ्यास केलेले होते. त्याशिवाय मायावी सिद्धीत प्रवीण होते. त्यांच्या पित्याबरोबर ते गंधमादन पर्वतावर

रहात असतं. तेथे ते त्यांच्या चुलत भावाला वैश्रावणाला, मोठ्या वैभवात रहात असणारा व माणसांच्या खांद्यावरून जातांना पहात असतं. ते त्यांना अजिबात आवडत नसें. म्हणून त्याला इलाज करण्यासाठी ते मोठी तपस्या आरंभतात. त्या तपस्येत ते जरी यशस्वी ठरत होते, परंतु, ती मत्सर दोषातून उत्पन्न झालेली प्रेरणा असल्यामुळें त्या तपस्येला देवांच्या विशुद्ध तपस्येची सर नव्हती, तरी ती तपस्या असल्यामुळे तिच्यापासून कांहीं फळ त्यांना मिळणार होते हे निश्चित होते. परिणाम स्वरुप ते ब्रह्मदेवाला प्रसन्न करतात. त्यांच्यातील दशानन जो फक्त वायू प्राशन करून तपस्या करत होता व त्याच्या भोवती चौफेर अग्नी चेतवलेले होते, त्यात तो एका पायावर उभा राहून तशी तपस्या करत होता. तसा तो दशानन दहा हजार वर्षे तप करत होता. कुंभकर्ण शिरसासनाच्या पावित्रात मिताहारी राहून तपस्या करत होता. तो सत्त्वशिलतेचे नियम काटेकोरपणे आचरणात ठेवत होता. तो देखणा बिभीषण केवळ शाकाहार करत असें व ध्यान साधना करत असें. खरा व शुर्पणखा, मजेत फिरत असतं. त्यांचे काम त्यांच्या भावांवर लक्ष ठेवून त्यांना कांहीं हवे नको ते पहाण्याचे असें. अशारितीने हजार वर्षाच्या तपस्येनंतर मोठा भाऊ त्याचे दहाही डोकी स्वतः कापतो व अग्नीदेवाला अर्पण करतो. त्या तशा अघोरी तपस्येमुळें ते ब्रह्मदेवाला प्रसंन्न करतात. ब्रह्मदेव त्या प्रत्येकाला वर देण्याचे बोलतात. ब्रह्मदेव त्यांना उद्देशून सांगतात, मी तुम्हा सगळ्यांवर प्रसन्न झालो आहे, आता तपस्या करण्याचे कारण उरलेले नाही कारण, मी तुम्हाला आशिर्वाद देणार आहे. तुम्हाला काय पाहिजे ते सांगा. फक्त अमरत्व सोडून कांहींही मांगा. तुझे शीर अग्नीला दिले आहे ती पुन्हा तुझ्या वर पहिल्याप्रमाणे तुला हवी तेव्हां येतील. तुझे शरीर कुरूप होणार नाही व तू तुला हवे ते रुप धारण करू शकशिल. त्या प्रकारे तू तुझ्या शत्रूचा पराभव करू शकशिल. ते आश्वासक बोलणे ऐकल्यावर रावण ब्रह्मदेवाला बोलतो कीं, "मी कधीच गंधर्वांच्या हाती हरलेलो नाही किंवा, किन्नर, यक्ष, राक्षस किंवा नाग ह्यांच्या हातीसुद्धा, आणि इतर प्रजातींच्या कडूनही मला पराभव होण्याचा संभव नाही". ते ऐकल्यावर ब्रह्मदेव त्याला सांगतो, "तू ज्यांचा उल्लेख केलास त्याशिवाय ज्यांचा तू उल्लेख केला नाहीस अशा माणसांकडूनही तुला हार मानावी लागणार नाही. त्यांपासून तुला धोका नाही. असा मी तुला आशिर्वाद देत आहे".

मार्कंडेय पुढे सांगतात, असें बोलून झाल्यामुळें दशानन फार खूष झालेला असतो. तो नरमांस भक्षक राक्षस, माणसांच्या बद्दल जास्तच बेपर्वा होतो. त्यानंतर ब्रह्मदेव कुंभकर्णाला विचारतात , त्याला काय पाहिजे? कुंभकर्णाची बुद्धी अस्पष्ट असते तो मांगतो कीं, त्याला फारकाळ रहाणारी निद्रा मिळावी. त्यावर ब्रह्मदेव तथास्तु म्हणतात. त्यानंतर ब्रह्मदेव बिभीषणाला विचारतात, त्याला काय पाहिजे? तो मांगतो, कीं, त्याला कोणत्याही अगदी विपरित परिस्थितीतसुद्धा पाप करण्याची इच्छा होऊ नये. माझे अज्ञान नाहीसे व्हावे व मला ज्ञान प्राप्त व्हावे. त्याचे ते मागणे ऐकून ब्रह्मदेव फार खूष होतात व त्याला बोलतात कीं, "तू जरी राक्षस कुळात जन्मलेला असलास तरी तू देवांसारखाच असल्यामुळे त्याला अमरत्वाचे दान करतो".

मार्कंडेय पुढे सांगतात कीं, त्यानंतर रावण कुबेराला (वैश्रावणाला) युद्धात हरवतो व लंकेचे राज्य ताब्यात घेतो. त्यानंतर कुबेर लंका सोडतो व त्याच्या यक्ष, गंधर्व, किन्नर, राक्षस अशा सोबत्यासह गंधमादन पर्वतात जातो व तेथेच रहातो. रावण त्याच्या कडून जबरदस्तीने पुष्पक विमान काढून घेतो. त्यावर रागावून कुबेर रावणाला शाप देतो कीं, तो कधीही त्या विमानातून प्रवास करू शकणार नाही. जो तुला ठार मारेल तो त्यातून प्रवास करेल. तू माझा विनाकारण अपमान केला आहेस म्हणून तुझा नाश होईल व त्यानंतर तुझा भाऊ बिभीषण लंकेश्वर होईल. पवित्र प्रवृत्तीचा बिभीषण सद्मार्गाने जाणारा, त्या रावणाच्या मृत्यूनंतर कुबेराचा लंकेत वारसदार होतो. कुबेर त्याला यक्ष आणि राक्षसांचा मुख्य नेमतो. त्या विरुद्ध इतर अपप्रवृत्तीचे राक्षस रावणाला त्यांचा राजा समजतात. ते सगळे एकत्र येतात. रावण त्याच्या मायावी सिद्धीने कोणाचेही रुप घेऊ शकत असल्याने व त्याची शक्ती खूप जास्त असल्याने व तसेंच तो हवेत उडू शकत असल्याने तो त्याच्या साथीदाराबरोबर देवांवर व चांगल्या दैत्यांवर चढाई करू लागतो. त्यांची लूटमार करू लागतो. त्याचे एका भयंकर राक्षसात रुपांतर झालेले असते. त्याच्या त्या धुमाकुळीमुळें देवांत घबराट पसरली होती.

अशारितीने द्रौपदी हरण पर्वाचा तेरावा भाग संपला.

# द्रौपदी हरण पर्व

## भाग चौदावा

मार्कंडेय सांगत असतात, ते रावणाचे वागणे आवरण्यासाठी सगळे ब्रह्मर्षी, सिद्ध, देवर्षी, हव्याहव इत्यादी ब्रह्मदेवाला भेटतात व सांगतात कीं, रावणाला आपण जो अभयतेचा दुवा दिला आहे त्यामुळें तो बेबंध झाला आहे. त्याला कोणी अटकाव करू शकत नाही. अग्नी बोलतो, "विश्रावाचा तो शक्तिमान मुलगा ज्याला दहा तोंडं आहेत, त्याला कोणीही मारू शकत नाही केवळ आपल्या आशिर्वादामुळें हे होत आहे. त्याच्या ह्या अशा वागण्यामुळें पृथ्वीवरील जनता प्रचंड दाबाखाली हल्ली जगत आहे. त्यावर कांहीं उपाय करावा लागेल. आपल्या खेरीज कोणीही आम्हाला त्याच्या पासून संरक्षण देऊ शकणार नाही".

ब्रह्मदेव त्यांचे ऐकल्यावर त्यांना उद्देशून बोलतो, "अहो अग्नी, माझ्या कृपेमुळे त्याला देव आणि असुर जिंकू शकणार नाहीत हे खरे आहे. त्याचा विचार करून मी आधीच एक व्यवस्था तयार केली आहे, ती अशी, त्याप्रमाणें केले कीं, त्याचा मृत्यू निश्चित होईल व तुमची चिंता दूर होईल". पुढे तो प्रजापती सांगतो, "त्यासाठी साक्षात विष्णू त्या कामगिरीसाठी जातील".

त्यानंतर मार्कंडेय पुढे सांगतात, ब्रह्मदेव त्या सगळ्या देवांच्या व इतर लोकांच्या समक्ष इंद्राला बोलावतात आणि त्याला सांगतात, पृथ्वीवर जे कोणी दैवी लोक उतरलेले आहेत, त्याना असा प्राणी उत्पन्न करावयाला सांगा जो कोणत्याही एका प्रजातीत गणला जात नाही. जो माकड आणि अस्वल अशा मिश्र कोटीचा असेल. तो विष्णूला त्याच्या कामात मदत करील. तो महाशक्तीमान असेल व कोणत्याही रुपात काम करू शकेल, त्याशिवाय इतर दैवी लोक इतर रुप घेऊन त्याला मदत करतील". ते ऐकल्यावर सगळे दैवी लोक जसें देव, गंधर्व, दानव, यक्ष इत्यादी जमले व त्या पर्यायाबद्दल आपापसात चर्चा करू लागतात. ते ठरवतात कोणी कोणते रुप घ्यावे वगैरे. त्यावेळी ब्रह्मदेव एका गंधर्वाला बोलावतात, त्याचे नांव असते दुंदुभी. त्याला सांगतात, "तू पृथ्वीवर जाऊन सगळी तयारी करशिल". दुंदुभी त्याबरोबर पृथ्वीवर येतो व एका कुबड असलेल्या दासीचे रुप घेतो तिचे नांव असते मंथरा. त्याप्रमाणे सगळे दैवी लोक शक्र (इंद्र) धरून वानर कुळांत

जन्म घेऊ लागतात कारण तो वंश माकड व अस्वल ह्यांच्या मधला असल्याने त्यापासून रावणाला ब्रह्मदेवाच्या आशिर्वादाने संरक्षण नव्हते. तो वंश विलक्षण शक्तिमान होता व त्याची ताकद अवर्णनीय अशी प्रचंड होती. ते माणसा सारखेच बुद्धीमान होते व त्याच्या सगळ्या गोष्टी माणसा प्रमाणेच होत्या पण ते मानव नव्हते. त्यांच्या हालचाली वारा असावा तशा वेगवान होत्या. त्यातील कांहीं कोठेही वस्ती करून होते तर त्यांच्यातील कांहीं वनात रहाणे पसंत करत असतं (वा–नर शब्दाचा अर्थ होतो माणसासारखा). विष्णूला मदत करण्यासाठी ब्रह्मांने शंभूला विनंती केली कारण रावण विश्रावाच्या रुपातील पुलस्त्य ऋषीचा मुलगा व शंकराचा निस्सीम भक्त होता, त्याला मारण्यासाठी कोणी दुसरा उपयोगाचा नव्हता. म्हणून शंभू स्वतः त्यासाठी तयार झाले. ते मारुतीच्या अवतारात पृथ्वीवर जाऊन रामाच्या दासाची भूमिका करत रावणाचा वध करण्यात रामाला म्हणजे विष्णूला मदत करण्यास तयार झाले. एकट्या विष्णूला मानव अवतारात ते करणे शक्य नव्हते कारण रावणाला कोणी माणूस मारू शकणार नव्हता. सगळी तयारी झाली होती व मंथरा तिला दिलेले काम करण्यासाठी पृथ्वीवर अवतरली, तिचे काम होते भेद करणे. त्यासाठी ती भांडणे लावण्याच्या उद्देशाने दशरथ राजाच्या राणीवशात दासी म्हणून काम करू लागते.

अशारितीने द्रौपदी हरण पर्वाचा चौदावा भाग संपला.

# द्रौपदी हरण पर्व
## भाग पंधरावा

युधिष्ठीर मार्कंडेयांना विचारतो, "अहो महामुनी, रामाचा जन्म कसा झाला ते आपण सांगितले आहे परंतु, त्याला राज्याबाहेर कां काढले त्याबद्दल आणखीन सांगाल तर बरे होईल. दशरथाचे दोन पुत्र मिथिलेची राजकन्या सीतेबरोबर वनवासात कां गेले ते आम्हाला सांगावे".

मार्कंडेय सांगतात, दशरथ राजा मोठा पवित्र प्रवृत्तीचा होता. तो मोठा धार्मिक व्रतवैकल्ये करणारा होता. त्याला तीन मुलं झाली तेव्हां तो फार आनंदात होता. त्याची तिनही मुलं यथावकाश मोठी झाली. ते त्यांचे वेदाचे शिक्षण पूर्ण करतात. त्याशिवाय वेदातील गुप्त गोष्टींचा (त्याला खिल म्हणतात) सुद्धा ते चांगला अभ्यास करतात. रिवाजानुसार ब्रह्मचर्य व्रताचे यथास्थित पालन केल्यानंतर ते विवाह करतात. ते सगळे विना व्यत्यय पार पडल्यामुळें राजा दशरथ फार खूष असतो. आनंदी स्वभावाचा राम त्याच्या पित्याचा कंठमणी झाला होता. त्याच्या गोड स्वभावामुळें तो त्याच्या राज्यात सगळ्यांचा आवडता राजपुत्र झाला होता. राम त्यांच्यात सर्वात ज्येष्ठ होता. यथावकाश दशरथ वृद्ध झाल्यामुळें तो संन्यासाश्रमात जाण्याचा विचार करत होता. राजा त्याच्या प्रधानांच्या सल्ल्याने रामाला उत्तराधिकारी म्हणून नेमण्याचे ठरते. त्यामुळें राजा फार आनंदात असतो. रामाची भावंडंसुद्धा आनंदात असतात. रामाला गादीवर बसलेले पाहून दशरथाला व त्याच्या आईला, कौसल्याला फार संतोष झाला होता. सडपातळ बांधा असलेला ज्याचे हात अजानुबाहू होते, ज्याचे नेत्र रक्तवर्णी होते, केस कुरळे होते, त्याची चाल डोलणार्या हत्तीसारखी होती. ज्याच्याकडे बघितले कीं, साक्षात इंद्र असा तो दिसत होता. दृष्ट लागावी असा तो व त्याची पत्नी ह्यांचा जोडा त्या दरबारात शोभत होता. त्याचे शहाणपण ब्रह्मदेवासारखे होते, अर्थात् तो साक्षात विष्णूचा अंशावतार होता. त्यामुळे हे असे सगळं असणे अपेक्षित होते. तो व्रतस्थ होता, त्याचे भोगेंद्रीयांवर संपूर्ण नियंत्रण होते. त्याचे रुप असे होते कीं, त्याचे वैरीसुद्धा त्याचा आदर करत होते. राम सज्जनांचा कैवारी व दुर्जनांचा विध्वंसक होता. त्याची मति अशी होती कीं, तो कधी गोंधळून जात नसे. योग्य

वेळी योग्य निर्णय घेण्याची त्याची क्षमता वाखाणण्यासारखी होती. राजा दशरथ त्याच्या ब्राह्मणांना सांगतो, "आज पुष्य नक्षत्राची युती होत आहे व ती एक दिवसापुरती आहे त्या शुभ मुहूर्तावर मी माझ्या रामाला गादीवर बसल्याचे जाहिर करणार आहे. त्या विधीसाठी तयारीला लागावे". तो राजाचा आदेश आल्यावर सगळे मंत्री त्या विधीच्या तयारीला लागतात.

त्या सुमारास, मंथरा जो खरेतर दुंदुभी गंधर्व होता, दसरथाच्या दुसर्या पत्नीची दासी म्हणून तेथे काम करत होती. ती तिच्या राणीला, कैकेयीला बोलते, "राणी सरकार, आपले भाग्य फुटके निघाले, कारण ज्या मुहूर्तावर हा सोहळा आयोजित केला आहे त्या वेळी जर तो संपन्न झाला तर आपल्याला एक सर्प दंश करेल आणि त्यामुळें मरून जाल. कौसल्या खरोखरच मोठी भाग्याची आहे, कारण, त्या विधीनंतर तिचा पुत्र राजा होणार व आपला पुत्र त्याचा प्रधान होणार. त्यामुळें तुमची किंमत वाड्यात काय रहाणार मला समजत नाही. एका प्रधानाची आई म्हणून तुमच्याकडे सगळे पहाणार आहेत हे मला बरोबर वाटत नाही". मंथरेचे ते विषारी बोलणे ऐकल्यावर कैकेयी हलक्या कानाची होती ती चिडते. ती तिचे सगळे दागिने अंगावर घालते व फणकारत तिच्या पतिकडे तो एकटाच आहे असें पाहून जाते. फार लाडात आल्याचे सोंग घेत कैकेयी दशरथाला आठवण करून देते कीं, त्याने कधीही तिच्या इच्छांचा अव्हेर केलेला नाही. त्याप्रमाणे तो आजसुद्धा तिच्या इच्छेचा अव्हेर करणार नाही. ती त्याला सांगते, "तुम्हाला आठवत असेल कीं, बर्याच वर्षापूर्वी तुम्ही मला एक वचन दिले होते, जेव्हां मी तुमचे एक अवघड काम करून दिले होते. आज मी त्या वचनाची पूर्तता आपण करावी हे सांगण्यासाठी आपल्याला आग्रह करणार आहे. जर आपण आपला शब्द ठेवला नाही तर आपल्याला वचनभंगाचे पाप लागेल". ती असें त्याला बोलते. राजा मोठ्या खूषीत तिला सांगतो कीं, "तुला काय पाहिजे ते तिने न डगमगता सांगावे. माझ्याकडे ब्रह्मणांना देऊन उरलेली संपत्ती आहे त्यातील किती तुला पाहिजे ते सांग. कोणाचा वध व्हावा असें तुला वाटते कां, की ज्याला फाशी दिली आहे त्याला मी सोडून द्यावे असें तुला वाटते कां, बोल तुला काय पाहिजे, आज मी फार खूष आहे. मी ह्या प्रदेशाचा राजा, चारही वर्णांचा अधिपती आहे, तुला काय कमी आहे येथे कीं, तू कांहीं माझ्याकडे मांगावेस. चटकन सांग तुझी मांग काय आहे".

राजाचे ते बोलणे ऐकल्यावर कैकेयी समजते कीं राजा पुरता तिच्या कह्यात आला आहे, ती राजाला बोलते, "माझी इच्छा आहे कीं, माझा मुलगा भरत तुमचा उत्तराधिकारी व्हावा आणि रामाने तपस्या करण्यासाठी व अरण्यात असलेल्या राक्षसांचा बिमोड करण्यासाठी जावे. आणि ते काम तो चौदा वर्षे करील. तेथे तो संन्याशासारखे जीवन जगेल, कातड्याचे वस्त्र नेसेल. त्याच्या बरोबर त्याची पत्नीसुद्धा जाईल". ते तिचे बोलणे ऐकून प्रथम राजाला खरेच वाटले नाही व तो समजतो कीं, आपली प्रिय भार्या गंमत करत आहे. परंतु, ती गंमत करत नाही हे जसे त्याच्या ध्यानात येते तो राजा खिन्न होतो. तरी तो कैकेयीला सांगतो किं, ह्यात त्याच्या पेक्षा रामाचा भाग जास्त असल्यामुळें जर राम त्यासाठी तयार असेल तर त्याची त्याला हरकत नसावी. दशरथ समजत असतो कीं, राम त्यासाठी तयार होणार नाही व त्यामुळें ते होणार नाही. म्हणून तो रामाला बोलावतो व विचारतो कीं, त्याचे काय म्हणणे आहे. राम आज्ञाधारक पुत्र असतो, तो बोलतो राज्याच्या गांदीवर मी बसलो काय अथवा माझा भाऊ बसला काय, राज्य कारभार उत्तम चालणारच आहे मग मी कैकेयी मातेची तशी इच्छा असेल तर त्याप्रमाणे जाण्यास तयार आहे. परंतु, तो पुढे बोलतो, ह्यात माझी पत्नी येते, तरी तिला जर आक्षेप असेल तर ते शक्य होणार नाही. राजा सीतेला बोलावतो व विचारतो, ती म्हणते, जर माझे पती जाणार असतील तर मी त्यांच्या सह जाणार आहे. त्यावर रामाचा सावत्र भाऊ लक्ष्मण म्हणतो कीं, तोसुद्धा रामाबरोबर जाणार आहे म्हणजे कैकेयीच्या मतानुसार भरतास विनदिक्कत राज्यकारभार करता येईल. अशारितीने ते तिघे वनवासात फेकले जातात कैकेयीच्या इच्छेसाठी. त्यामुळें व्यथीत अंतःकरण झालेला राजा दशरथ अनंतात विलीन होतो. त्यानंतर भरत गादीवर बसतो व कैकेयीची ती इच्छा पूर्ण होते. अशारितीने आपले इप्सित पूर्ण झाले म्हणून खूषीत असलेली कैकेयी भरताला जवळ बोलावते व सांगते, "माझ्या मुलां आता हे सगळे राज्य तुझ्या एकट्याचे आहे, त्यात तुला कोणी वाटेकरी नाही. तेथे मजेत राज्य कर". ते ऐकून तिचा मुलगा तिला म्हणतो, "माझे आई, तू एक अतिशय घाणेरडा खेळ खेळली आहेस. माझ्या बापाचा तू एकापरिने खून केला आहेस. मी तुझा धिक्कार करतो. तुझ्या कोत्या बुद्धीची मला लाज वाटते. केवळ ह्या नश्वर संपत्तीसाठी तू माझ्या मोठ्या भावाला व त्याच्या बरोबर माझ्या वहिनीला आणि त्या बरोबर माझा प्रिय

बंधू लक्ष्मण अशा सगळ्यांना वनात धाडून मोठा अपराध केला आहेस. तुझ्या ह्या कृत्यामुळें सगळे ब्राह्मण आपल्याला तूच्छ समजू लागले आहेत. मला त्यांना तोंड दाखवण्याचीसुद्धा लाज वाटते. त्यांना वाटते, मी तुला तसे करावयाला सांगितले, त्यांचे तोंड मी कसे बंद करू"? असें बोलून तो तरूण राजपुत्र ओक्साबोक्शी रडू लागतो. ते त्याचे वागणे पाहून तेथे जमलेले दरबारी समजून चुकतात कीं ही खेळी कैकेयीने तिच्या अक्कलेने केली आहे व त्यात राजपुत्र भरताचा कांहीं संबंध नाही.

तो त्याच्या आईला सांगतो, "मी माझ्या पित्यासम ज्येष्ठ भावाला व माझ्या वहिनी आणि लक्ष्मणाला परत आणण्या साठी जाणार आहे. ते बोलल्यावर भरत त्याच्या तिनही मातांना, कौसल्या, कैकेयी व सुमित्रा, त्यांच्या रथात घेऊन रामाचा शोध घेण्यासाठी निघतो. त्याच्या मनात दुःख भरलेले होते, त्याला रामाला दाखवावयाचे होते कीं, ह्यात त्याची कांहीं हात नाही. त्याच्या बरोबर त्याचा धाकटा बंधू शत्रुघ्न असतो. ते रथ एका रांगेत निघतात. त्यांच्या बरोबर ऋषी वसिष्ठ आणि वामदेव होते. त्याशिवाय शेकडो ब्राह्मण होते. अशी ती यात्रा रामाचा शोध घेण्यासाठी निघते. ती यात्रा पहाण्यासाठी त्या नगरातील सगळे आबालवृद्ध घराबाहेर येऊन उभे रहातात. रामाला परत आणण्यासाठी ते जात आहेत हे समजल्यावर राज्यात उलट सुलट चर्चेला उधाण येते.

त्यावेळी राम चित्रकुटच्या वनात रहात होता. भरत त्याला भेटतो व सगळा प्रकार त्याला सांगतो व समजावतो कीं, त्याने परत राज्यात यावे व गादी सांभाळावी. परंतु, एकवचनी राम त्याची समजूत काढतो व त्याला त्याचा उत्तराधिकारी असें सगळ्यांच्या समक्ष नेमतो व रामाचा अधिकारी म्हणून त्यांने राज्या कारभार करावा अशी त्याला आज्ञा देतो. राजपुत्र भरत रामाच्या पादुका त्याच्या कडे मांगतो व त्या घेऊन ते सगळे पुन्हा राजधानीकडे निघतात. भरत त्यानंतर नंदीग्राम येते राहुन राज्याचा कारभार रामाचा सेवक ह्या अर्थाने करत असतो. लोकांचा त्या त्याच्या वनवासात जाण्याला प्रचंड विरोध असतो व ते त्याचे अयोध्येचे प्रजाजन पुन्हा त्याला विनवण्या करण्यासाठी येतील ह्या भयांने तो सीता आणि लक्ष्मण आणखीन खोल घनदाट अरण्यात शिरतात. तो सरभंगा आश्रमात जातो व तेथे पुजा करून तो पुढे आणखीन दाट असलेल्या दंडकारण्यात शिरतो. रामाला गुरूगृही वनात रहाण्याची सवय असल्यामुळें ते त्याला व लक्ष्मणाला विशेष अवघड नव्हते परंतु,

सीतेला ते सगळे नवीन होते पण पतिव्रता सीता ते सगळे आनंदाने स्वीकारत असते. दंडकारण्यात तो गोदावरी नदीच्या किनारी रहू लागतो. तेथे त्याला अनेक ऋषींचे आश्रम आढळतात व त्यांच्या सानिध्यात ते तिघे आपला काळ घालवत असतात. तेथे रावणाचा भाऊ खरा व बहिण शुर्पणखा तेथील ऋषींना वारंवार त्रास देत असतात असें समजते. ती राक्षशिण त्या काळी जनस्थान नांवाच्या ठिकाणी रहात होती. तेथे ऋषींच्या संरक्षणार्थ राम व लक्ष्मण कित्येक हजारानीं राक्षस ठार मारतात. त्यात खरा आणि दुःशन सुद्धा मारले जातात. अशारितीने तो ते जंगल राक्षसांपासून मुक्त करतो. त्या मारामार्यात रावणाच्या लाडक्या बहिणाचे नांक कांपले जाते. त्यामुळें रांगावून ती तिच्या मोठ्या भावाकडे, रावणाकडे, तक्रार करण्यासाठी लंकेला रवाना होते. लंकेत ती तिचे कापलेले नाक दशाननाला दाखवते. त्याच्या पाया पडते व सांगते कीं, तू जर माझा सच्चा भाऊ असशिल तर माझ्या कापलेल्या नाकाचा वचपा काढशिल. ते तिचे रडणे पाहून रावण संतापतो. तो त्यात त्याचा अपमान समजतो. चवताळून तो उठतो. त्यानंतर एकांतात तो आपल्या बहिणीचा तो काय प्रकार आहे ते विचारतो. तो राक्षस दशानन त्याच्या बहिणीला शब्द देतो कीं, "ज्यांने कोणी हे कृत्य केले तो त्याची किंमत मोजेल. माझ्या वाटेला जाणारा कोणीही असो, त्याला मी शांतपणे झोपू देणार नाही. त्यांने एका भयंकर सापाच्या माथ्यावर पाय टाकला आहे. सिंहाच्या तोंडात हात घालणारा हा कोण आहे"? असें बोलल्यानंतर त्याच्या सर्वांगातून आगीच्या ज्वाळा निघू लागतात. वणव्यात पेटलेले झाड कसे अंधारात धगधगतांना दिसते तसा तो दिसू लागला. त्यानंतर ती त्याची बहिण रामाच्या कारवायां दंडकारण्यात कशा आहेत व तो ऋषींना कशी मदत करतो व त्यांने कशाप्रकारे शेकडो राक्षस व त्यात त्याचा भाऊ खरा आणि दुःशनाला मारले ते सगळे सविस्तरपणे सांगते. ते सगळे ऐकल्यावर तो ठरवतो कीं, मरिचाला रामाला मारण्यासाठी तयार करावे. ते ठरवल्यानंतर तो त्याचा कारभार त्याच्या मंत्र्यांच्या हाती सोपवून वायुमार्गाने उडत त्रिकुट आणि काळ पर्वत ओलांडत दंडकारण्याकडे निघतो. वाटेत त्याला एक मोठा जलाशय दिसतो. त्यात सुसरी होत्या. समुद्र संपवून तो गोकर्णाकडे पोहोचतो. तेथे त्याचा प्रिय देव त्रिशंकूधारी रहात असतो. त्यानंतर तो त्याच्या जुन्या मित्राला मरिचाला भेटतो. तेथे तो पहातो कीं, त्याचा मित्र रामाला घाबरून स्वतःच

साधूच्या वेषात रहात असतो.

अशारितीने द्रौपदी हरण पर्वाचा पंधरावा भाग संपला.

# द्रोपदी हरण पर्व

## भाग सोळावा

मार्कंडेय पुढे सांगत असतात, रावणाला येतांना पाहून मरिच पुढे होतो. त्याचे आदरपूर्वकपणे स्वागत करतो. रावणाला फळं आणि कंदमुळांचा आहार देतो. रावण त्याच्याकडील आसनावर बसतो व थोडी विश्रांती घेतो. मरिच बोलण्यात पटाईत असतो तो रावणाच्या जवळ बसतो. रावण सुद्धा बोलण्यात कांहीं कमी नसतो ते दोघे बोलू लागतात. मरिच रावणाला विचारतो, अरे रावणा, "तुझ्या चेहर्याचा रंग असा उतरलेला दिसतो, असें काय झाले आहे कीं, तुला तुझी राजधानी सोडून येथे वनात यावे लागले"? "तुझी प्रजा पहिल्या सारखाच तुला मान देते नां? तू कोणत्या उद्देशाने असा अरण्यात आला आहेस? असें समज तुझा उद्देश संपन्न झाला आहे, कारण तु माझ्याकडे आला आहेस. ते कामं कितीही अवघड असले तरी ते आपण करून दाखवू". रावण ज्याच्या मनात अपमानाचा अग्नी धगधगत होता, मरिचाला थोडक्यात सगळे सांगतो. त्यासाठी काय उपाययोजना करावयाची त्याच्यावर चर्चा होते. ते सगळे समजल्यावर मरिच त्याला उत्तर देतो. "अरे दोस्ता ह्या रामाला चिडवून तू कांही साध्य करू शकणार नाहीस. त्याच्या शौर्याची व हिम्मतीची कल्पना तुला नाही. त्याचे बाण सहन करू शकेल असा कोणीही नाही. त्याचा बंधू सुद्धा मोठा शूरयोद्धा आहे त्याची पत्नी सीता जी जनक राजाची मानस कन्या आहे. ती मोठी पतिव्रता आहे. रामाच्या ह्या भागात येण्यामुळें मला हे साधूचे सोंग घेऊन रहावे लागत आहे. कारण तो ह्या भागातील साधूंना राक्षसांपासून संरक्षण देत असतो. त्यानेच तुझ्या भावाला खराला ठार मारले आणि त्याच्याशी झालेल्या लढाईत तुझ्या बहिणीचे नाक कापले गेले. खरंतर ती मरायचीच पण थोडक्यात बचावली तिच्या नाकावर निभावलं". ते ऐकल्यावर रावण रांगावून त्याला बोलतो, "हे बघ मला तुझा सल्ला नको आहे, परंतु, जर तू मला पाहिजे तसा वागला नाहीस तर मी तुला ह्या हातांना ठार मारीन". मरिच त्याला बोलतो असहायपणे कीं, "जर मरण अनिवार्य असेल तर ते तुझ्या हातून मिळणे मला जास्त चांगले वाटते". त्यानंतर तो रावणाला बोलतो, त्याला त्याच्या कडून कशाप्रकारची मदत पाहिजे ते सांगावे. दशानन त्याला सांगतो, "माझी अशी योजना

आहे कीं, तू एका सोनेरी शिंग असलेल्या सांबराचे रुप घेशिल ज्याची चामडी सुद्धा सोनेरी असेल. त्यानंतर तू त्या रामाच्या बायकोपुढे असा जाशिल कीं तिला तुझे आकर्षण वाटेल, तिला तुला पाळावयाची इच्छा झाली पाहिजे, ती तिच्या नवर्याला तुला पकडण्यासाठी तुझ्या मागे धाडेल. ते अशावेळी तू करावयाचे जेव्हां तिचा दीर लक्ष्मण सुद्धा तेथे नसेल. म्हणजे ती एकटी असेल. त्यानंतर मी कपटानी सीतेला पकडून घेऊन जाईन ते थेट माझ्या लंकेत. तेथे तिला मी अशा ठिकाणी लपवून ठेवीन कीं तेथे ती पतीविरहाने अन्नत्याग करून पतिव्रतेसारखी मरून जाईल. तेथे तो राम येऊ शकणार नाही बहुतेक, त्यामुळें पत्नीच्या हरवण्यामुळें खजिल झालेला तो योद्धा झूरून झूरून मरुन जाईल, अशा प्रकारे, माझ्या बहिणीच्या नाक कापण्याची ती शिक्षा त्याला झालीच पाहिजे". रावणाची ती योजना मरिच चांगलाच समजतो. तो ठरवतो कीं, राम त्याच्या मागे लागला कीं, तो त्याला त्याच्या कुटीपासून दूर घेऊन जाईल. त्या वेळांत रावण त्याच्या कपट कारस्थानाने सीतेला घेऊन जाईल व ते झाले कीं, रावण त्याला आकाशातून उडत असतांना सुचना करील कीं काम फत्ते झाले. ते झाले कीं, मरिच मध्येच कोठेतरी एकाद्या आडोशामागे गुप्त होईल. मरिच रावणाला त्याचे ते सांगतो व रावणाला तशी सुचना करावयास सांगतो. दशानन त्याला अनुमोदन देतो. दोघात ती योजना पक्की होते. तो म्हणतो कदाचित राम त्याला त्या आधीच पकडू शकला तर तुझी योजना अयशस्वी होईल व तू मला मारशिल म्हणून मी माझे अंत्यकर्म त्या आधीच उरकून घेतो कारण, तुझ्या नाहीतर रामाच्या अशा कोणाच्या तरी हातून माझा अंत होणार हे मला दिसत आहे. मोठ्या अडचणीना तोंड देत ते दोघे रामाच्या कुटीपर्यंत जातात. ते पहातात कीं, लक्ष्मण शिकार करण्यासाठी अरण्यात गेला आहे. सीता तेथे कुटी बाहेर फिरत आहे. ती परिस्थिती सुयोग्य आहे हे हेरून दशानन व मरिच त्यांच्या कारस्थाना प्रमाणे कारवाई करण्याचे ठरवतात. मरिच ठरल्या प्रमाणें लहानशा सुंदर दिसणार्या सोनेरी सांबराचे रुप घेतो. त्यानंतर तो त्या कुटीपुढे उभा रहातो तेथे चरण्याच्या अभिनिवेषाने रेंगाळत रहातो. असें कीं सीता त्याला पाहिलं. आणि नेमके तसेंच होते. सीतेला तो सुंदर दिसणारा सांबराचा बछडा फार आवडतो व ती त्याला चारा खाण्यासाठी देऊ लागते. आपला डाव फत्ते होतोय हे ते दोघे राक्षस समजतात. तितक्यात राम त्या कुटीतून बाहेर येतो. सीता

त्याला तो मायावी बछडा दाखवते आणि रावणाच्या इच्छेनुसार ते घडू लागते, सीतेला तो बछडा आवडतो व ती रामाला त्या बछड्याला जो आवारा बाहेर होता, त्यांच्या आवारात आणण्याचे सांगते. त्याप्रमाणे राम आवाराच्या कुंप्रणाला असलेल्या दारातून बाहेर येतो व त्या बछड्याला पकडणार एवढ्यात तो मरिच त्याच्या हातून निसटून रानात धुम ठोकतो. आता राम त्याला पकडण्यासाठी त्याच्या मागे धावतो. कांहीं अंतर धावल्यानंतर मरिच तेथे रामाची वाट पहात उभा रहातो, त्याला उभा पाहून राम त्याच्या मागे जातो. असें होत होत ते दोघे कुटीपासून फार दूर जातात. रावण ते नाटक झाडीत लपून पहात असतो. राम हाकेच्या अंतरापेक्षा जास्त लांब गेला आहे ते समजल्यावर दशानन एका संन्याशाच्या अभिनिवेषात त्या कुटीकडे जातो व तेथे रामाची व त्या बछड्याची वाट पहात उभ्या असलेल्या सीतेकडे भिक्षा मांगतो. त्या संन्याशाला पाहून सीता आत जाते व कांहीं फळं व कंदमुळ आणि कांहीं शिजवलेले मांस घेऊन येते व त्या संन्याशाच्या रुपात आलेल्या रावणाला त्याच्या झोळीत घालण्यासाठी त्याच्या झोळीत आपल्या ओटीतील तो शिधा टाकणार इतक्यात रावण त्याचे खरे दशाननी रुप धारण करतो. त्यामुळें सीता अचानक झालेल्या त्या प्रकारामुळें घाबरून जाते व ते भयंकर रुप पाहू तिला भोवळ येते. मृच्छा येऊन पडलेली ती रुपगर्विता जनक राजाची कन्या तो रावण पहात रहातो. त्यानंतर तो तिला उचलतो व उंच आकाशात भरारी मारतो. उंच गेलेला रावण मरिचाला दिसतो. त्याबरोबर तो समजतो कीं, त्यांची योजना यशस्वी झाली आहे. त्याबरोबर तो सांबराच्या रुपातील राक्षस त्याच्या सुक्ष्म रुपात जातो. त्यामुळें तो रामाला दिसेनासा होतो. राम बराच वेळ त्याला त्या गर्द झाडीत शोधण्याचा प्रयत्न करत रहातो पण व्यर्थ. अखेरीस तो परत फिरतो. वाटेत त्याला लक्ष्मण भेटतो. ते दोघे एकत्र कुटीत येतात ते पहातात कीं, फळं कंदमुळं आणि शिजलेले मांस इतस्थतः पडले आहे.

आकाशात उडालेला रावण सीतेला पहातो ते ती शुद्धीवर येत होती. परंतु, त्याला पुन्हा पाहून ती पुन्हा बेहोष होते. थोड्या वेळांनी ती पुरती जागृत होते व समजते कीं काय झाले आहे. आपले हरण झाले आहे ते समजल्यावर ती रावणाला सांगते, "अरे मूर्खा, मी विवाहीत पत्नी आहे व मी पतिव्रता आहे. मला स्पर्श करशिल तर तुझा नाश होईल म्हणून तू मला आत्ताच खाली ठेव". तेव्हा रावण तिला सांगतो, कीं, "मी लंकाधीश आहे. माझे

नांव रावण आहे. मला तुझ्यात कांहीही स्वारस्य नाही. त्याबद्दल ती निःसंशय रहावी". नंतर तो सांगतो की, "त्याच्या भावाचा वध तिच्या पतीने केला आहे तसेंच एका युद्धात तिच्या पतीने त्याच्या प्रिय भगिनीचे नांक कापले आहे. त्याचा बदला घेण्यासाठी तो तिला त्याच्या राजधानीकडे नेत आहे व तेथे तो तिला गुप्त ठिकाणी ठेवणार आहे. ज्या ठिकाणी तिचा पती कदापिही पोहोचू शकणार नाही". ते समजल्यावर सीतेला काय प्रकार आहे ते समजते. अतीव दुःखाने ती रडू लागते. पुढे तो दशानन तिला सांगतो कीं, "त्याला माहित आहे कीं, रामसुद्धा तिच्याप्रमाणे एकपत्नी पत्नीव्रती आहे. त्यामुळें तो तिच्या शोकांने मरून जाईल व तू माझ्या लंकेत मरून जाशिल असें मला वाटते, अशारितीने मी माझ्या भावाच्या वधाचा व बहिणीच्या नाक कापण्याचा सूड उगवणार आहे".

येथे राम व लक्ष्मण त्यांच्या कुटीच्या भोवती सीतेचा खूप शोध घेतात पण ती सांपडत नाही. मरिच राक्षस त्याच्या साधू वेषात तेथे येतो व पहात असतो राम व लक्ष्मण काय करत आहेत. रामाचा पत्नीशोक पाहून त्याला वाईट वाटते. परंतु रामाला समजणे आवश्यक होते कीं त्याच्या पत्नीला कोणी नेले म्हणून तो पुढे जाऊन रामाला काय झाले? असें विचारतो. राम त्याची पत्नी अचानक गायब झाली असे सांगतो. त्यावर तो राक्षस त्याला सांगतो कीं, त्याने थोड्या वेळे पूर्वी आकाशातून त्याच्या पत्नीला घेऊन जातांना पाहिले. तो बहुधा राक्षस राजा रावण असावा कारण, त्याची दहातोंडे स्पष्टपणे दिसत होती. पुढे तो मरिच रामाला सांगतो कीं, राम त्याच्या राक्षसांना मारण्याच्या कामामुळें रागावून रावण जो राक्षसांचा राजा आहे त्यांने हे केले असावे. म्हणून ह्यापुढे रामाने राक्षसांचा नाश करणे बंद करावे. राक्षसांच्या वाटेला जाणार्यांचे असेंच होते असें बोलून मरिच रामाच्या जखमांवर मीठ चोळतो. राम त्याला विचारतो, रावण सीतेला घेऊन कोठे जाऊ शकतो. त्यावर मरिच त्याला सांगतो, कीं, रावण तिला बहुधा लंकेत कोठेतरी कायम बंदीवासात ठेवणार आहे कारण तसेंच तो शत्रूच्या बायकांशी करतो. पुढे मरिच रामाला सल्ला देतो कीं, त्यांने आता त्याच्या बायकोचा विचार सोडून संन्यास घ्यावा त्याच्या सारखा संन्याशी होऊन मोक्षमार्गाकडे निघावे.

तेथे रावण सीतेचे पातिव्रत्य किती खरे आहे ते तपासण्यासाठी तिला बोलतो कीं, ती रावणाशी लग्न करण्यास तयार असेंल तर तो तिला कैदेत व ठेवता त्याच्या जनानखान्यात

ठेवेल. सीता ते ऐकून तिच्या कानांवर हात ठेवते  व बोलते कीं, "ती केवळ रामाचाच विचार करू शकते. अशा गोष्टी करशिल तर अरे रावणा तुझ्यावर आकाश कोसळून पडेल व त्यात तू चिरडून जाशिल. तसे जबरदस्तीने तू करण्याचा प्रयत्न केलास तर त्या आधी भूमी मला गिळंकृत करील. सगळे जग बदलेल पण मी रघूच्या कुळाच्या रामाशिवाय इतर कोणाचाही विचार करणे अशक्य आहे तसे करण्या पेक्षा तू मला तुझ्या कैदेत ठेव तेथे मी माझ्या रामाचा जप करत राहीन. मला विश्वास आहे कीं, तो एक दिवस मला घेण्यासाठी येईलच. तू समजतोस तसा माझा शूरवीर योद्धा पती हात गाळून बसणार्यांपैकी नाही". रावण सीतेला घेऊन जात असतांना तेथील एका पर्वताच्या शिखरावर बसलेला महापक्षी जटायू ते पहातो. त्याला सीतेचे ओरडणे ऐकू येते व तो हे सुद्धा ओळखतो कीं, ती सीता आहे व कोणीतरी तिला उचलून घेऊन जात आहे.

अशारितीने द्रौपदी हरण पर्वाचा सोळावा भाग संपला.

# द्रौपदी हरण पर्व

## भाग सतरावा

मार्कंडेय पुढे युधिष्ठीराला सांगतात, ते पाहिल्यावर जटायू जो गिधाड वंशाचा होता, त्याच्या संपती नांवाच्या मावसभावाबरोबर आणि त्याच्या बाप अर्जुनाबरोबर जे दशरथाचे मित्र होते, रावणाला सीतेला घेऊन जातांना पहातात. ते रागावतात व रावणावर जोरांनी चाल करून जातात. जटायू रावणाजवळ जाऊन बोलतो कीं, त्यांने सीतेला ताबडतोब सोडावे. ती आमच्या मित्राची दशरथाची स्नुषा आहे. आम्ही असतांना तू तिला असें कसे नेऊ शकतोस. त्यानंतर जटायू रावणाच्या अंगावर त्याच्या नखांनी वार करू लागतो ज्यामुळें त्याची सीतेवरील पकड ढिली होईल. तो रावणाच्या अंगावर अनेक ठिकाणी जखमा करतो. रावण तरी सीतेची पकड सोडत नाही. नंतर तो त्याच्या टोकदार चोंचीने त्याच्या अंगाला भोके पाडू लागतो. तरीसुद्धा रावण सीतेला सोडत नाही व मोठ्या वेगांने लंकेच्या दिशेने जात रहातो. रावणाचे अंग त्याच्या रक्तांने माखलेले असते. जसे रावण पहातो कीं, जटायू त्याच्या निर्धाराचा पक्का आहे व तो त्याचे हल्ला करणे बंद करणार नाही, रावण त्याची तलवार काढतो व जटायूची दोनही पंख छाटून टाकतो. त्यामुळें तो अजस्र पक्षी तोल जाऊन जमिनीवर येतो. त्याला मारल्यानंतर रावण उंच आकाशात झेपावतो व अतिशय उंचावरून तो सीतेला घेऊन लंकेच्या दिशेने जाऊ लागतो. वरून जातांना ती खाली असलेले ऋषींचे आश्रम पहाते. नद्या, सरोवरं, वनक्षी, असें सगळे ती पहात असते. ते पहाते तसे ती तिचे दागिने ज्यांच्यावर तिच्या पतीचे नांव कोरलेले होते खाली फेकून देऊ लागते. तिच्या जाण्याचा मार्ग त्यामुळें रामाला सापडेल अशी ती अपेक्षा करत असते. ती एका डोंगरावर उभे असलेले वानर लोक पहाते. ती त्यांच्या कडे जाईल अशाबेतांने तिचे एक वस्त्र फेकते. त्यावर रामाचे नांव होते. ते पिवळ्या रंगाचे कापड फडफडत त्या वानरांच्या अंगावर जाऊन पडते. वानर त्या राक्षसाला वेगांने दूर जातांना पहातात. लवकरच त्याची प्रिय राजधानी लंका त्याला दिसू लागते. तिच्या भोवती असलेल्या प्रचंड मोठ्या कोट भिंती त्याला जणू बोलावत होत्या. त्या नगरीची सगळी रचना विश्वकर्माने केलेली होती. एक काम आपण फत्ते केले त्याचे त्याला समाधान वाटत

असते. आपल्या प्रिय भगिनीच्या नाका कापण्याचा व भावाच्या मृत्यूचा तो सूड घेत असतो.

येथे राम लक्ष्मणाला सांगतो कीं, तो ज्या सांबरापाठी जात होता तो एक राक्षस होता हे त्याला तेव्हां समजले कीं, तो अधून मधून गायब होत होता. त्याचा अर्थ राक्षसांचा तो डाव होता कीं रामाला त्या सांबरापाठी जाण्यास पाडायचे व त्या दरम्यान सीतेला पळवावयाचे. त्या प्रकारे रामाचा बंदोबस्त करण्याचा राक्षसांच्या राजाचा, रावणाचा बेत असावा. मरिचाच्या बोलण्यामुळें त्याचा संशय जास्त निश्चित झाला. आपण दोघांना तिला एकटीला सोडून जायला नको होते. माझीच चूक पण मी तिच्या आग्रहाखातर त्या सोनेरी सांबरापाठी गेलो होतो. तिला ते सांबर पाळावयाचे होते. कोठे असेल सीता? त्याला तो प्रश्न सतावत होता. सीता हरणाचे दुःख त्याला आता सतावू लागले होते. तो स्वताला माफ करण्यास तयार नव्हता. सीतेचा शोध घेणे ह्याशिवाय दुसरा पर्याय नाही पण कोठून सुरूवात करावी ते त्याला लक्षात येईना. ज्या अरण्यात सर्वत्र राक्षसांचा संचार आहे त्या ठिकाणी आपण अशी चूक करावी ह्याचे त्याला नवल वाटत होते. तो लक्ष्मणाला विचारतो त्याच्या दुःखात कीं, "काय विदेहा जीवंत असेल कां"? शोधत फिरत ते अखेरीस एका ठिकाणी पोहोचतात तेथे ते पहातात, एक प्रचंड आकाराचे गिधाड मरणाच्या अवस्थेत पडलेले आहे. ते त्याला काकुत्स घराण्याचा राक्षस समजतात. ते दोघे त्याच्या जवळ जातात. राम त्याचे धनुष्य ताणून उभा असतो कीं, केव्हाही तो त्या गिधाडाला बाण मारील. पण ते गिधाड त्याना पाहून बोलते, "तुमचे भले हो, मी जटायू आहे, तुझ्या पित्याचा मित्र आहे. मी स्वतः गिधाडांचा राजा आहे. राम ते ऐकून त्याचे धनुष्य बाण खाली ठेवतो व त्याची आस्थेने चौकशी करू लागतो. त्याला दिसते कीं, त्या पक्षाची दोनही पंख कोणीतरी छाटलेली आहेत. जटायू त्यांना सांगतो सविस्तरपणे जे घडले. त्या माहितीमुळें रामाला विश्वास होतो कीं, त्याची पत्नी सीता रावणांनी कपट कारस्थान करून हरण केली आहे. ते सांगितल्यानंतर तो पक्षी त्याचा अखरेचा श्वास घेतो. रावण दक्षिणेच्या दिशेने त्याच्या लंकेकडे गेला आहे हे रामाला व लक्ष्मणाला समजते. त्यानंतर ते दोघे त्या जटायूचा अंत्यविधी उरकतात. रामाला सीतेच्या हरणाचे जास्त दुःख होते कारण तो त्या घटनेला स्वता जबाबदार असल्याचे समजत असतो. त्या दिशेने ते दोघे त्या निबीड

अरण्यातून जाऊ लागतात. त्यांना वाटेत अनेक ऋषींचे आश्रम दिसतात. राक्षसांनी त्यातील कांहीं आश्रम मोडल्याचे व त्यातील सामुग्री इतस्थतः फेकलेली असें पहात असतात. राक्षसांचा बंदोबस्त करणे किती आवश्यक आहे ते त्याला त्यातून समजत असते. सुमित्राचा मुलगा व राम त्या अरण्यात कोल्हे, हरणं ह्यांचे थवे सर्वत्र भटकत असलेले पाहातात. त्या वनातील हिस्रपशुंचे ओरडणे सर्वत्र ऐकू येत होते. जात असतांना त्यांना एक डोके नसलेला राक्षस दिसतो. तो काळ्या प्रचंड ढगांसारखा वाटतो. त्याला लांबलचक व जबरदस्त दोन हात असतात. त्याच्या छातीवर दोन डोळे होते. त्याचे तोंड त्याच्या बेंबीच्या जागी होते. ते सतत उघडत होते जणू कांहीं खावयाचे आहे. लक्ष्मणाला तो सहजपणे त्याच्या दोनही हातांने पकडतो. त्यामुळें तो सुमित्राचा मुलगा असहाय झाला, त्याला कांहींच करता येईना. रामाकडे पहात तो राक्षस लक्ष्मणाला त्याच्या बेंबाकडे असलेल्या तोंडाकडे नेऊ लागतो. लक्ष्मण रामाला बोलतो, "माझी हालत पहा कशी झाली आहे. प्रथम वडीलांचे मरण, त्यानंतर तुझे वनवासात जाणे ज्यात मी सामील झालो त्यानंतर सीतेचे हरण होणे व आता मला हा खाणार आहे. काय आहे माझे भाग्य? एका मागोमाग एक अरिष्ठ माझ्या मागे लागली आहेत. कदाचित मी तुला पुन्हा सीतेसह अयोध्येत जातांना पाहू शकणार नाही असे दिसते. तेथे राजगादीवर तुला बसलेला मी पाहू शकणार नाही, कारण हा बहुतेक मला खाऊन टाकणार असें वाटते. तुझ्यावर कुस गवताने राज्याभिषेकाचे पाणी शिपले जातांना मी पहू शकणार नाही. त्यानंतर तुझ्यावर उधळले जाणारे भाजलेला भात व काळ्या चण्याचे अक्षता मी पहाणार नाही असें वाटते, त्याचे मला वाईट वाटते". असें लक्ष्मण मोठ्या दुःखाने रामाला सांगत असतो. ते ऐकल्यावर राम लक्ष्मणाला धीर देण्यासाठी बोलतो कीं, "तो असतांना त्याला कोणीही कांहींही करू शकणार नाही. ते बोलत असतांना राम त्याच्या धारदार तलवारीने त्या राक्षसाचा एक हात कापून टाकतो. जणूकाय तो एक तीळाच्या रोपाचा दांडा असावा. ते पाहिल्यावर लक्ष्मण त्याच्या तलवारीने त्या राक्षसाचा दुसरा होतसुद्धा कापून टाकतो. त्यानंतर लक्ष्मण त्याच्या तलवारीने त्या राक्षसाच्या बरगड्यात वार करत रहातो ज्यामुळें तो प्रचंड राक्षस अखेरीस कोसळून पडतो आणि मरतो. ते दृष्य ते पहात असतांना त्या राक्षसाच्या अंगातून एक, आकाशातील सूर्यासारखे दिव्य तेज असलेला माणूस बाहेर

येतो. बोलण्यात पटाईत असलेला राम त्याला विचारतो, "तू कोण आहेस"? "मला तुझी माहिती सांग. असें कांही घडेल असे आम्हाला वाटले नव्हते. सगळेच मोठे विलक्षण घडत आहे". त्यावर तो माणूस रामाला सांगतो, "मी एक गंधर्व राजपुत्र आहे. माझे नांव आहे विश्ववसू, एका ब्राह्मणाच्या शापामुळे मला हे राक्षसी रुप धारण करावे लागले होते". पुढे तो रामाला सांगतो, "तुझी पत्नी रावण कपटाने त्याच्या लंकेला घेऊन गेला आहे. त्या पासून सुटका करण्यासाठी तू येथील वानर राजा सुग्रीवाची मदत घे. त्याच्याशी मैत्री करून ती मदत तुला मिळवता येईल. तेथे ऋष्यमुख पर्वताच्या जवळ एक पवित्र क्षेत्र आहे तेथे एक सरोवर आहे, त्याचे नांव आहे पंपा. त्यात हंस पक्षी आणि भरपूर कमळं तुला दिसतील. तेथे त्याच्या चार साथीदारांसोबत राजा सुग्रीव रहातो. त्याचा भाऊ वाली ह्यांने सुग्रीवाला कपटाने फसवून त्याचे राज्य ताब्यात घेतले आहे. तू त्याला भेट व तुझी दुर्दैवाची कथा त्याला सांग. तो तुला चांगली मदत करेल. तुला तुझ्या ह्या कामात त्या वानरांच्या मदतीमुळें यश येणार आहे. तुझी पत्नी तुला मिळणार आहे आणि तू पुनः तुझ्या राज्याचा राजा म्हणून जाणार आहेस". एवढे बोलून तो गंधर्व अंतर्धान पावतो. त्या सगळ्या प्रकारामुळें दोघेही भाऊ आश्चर्यचकीत झालेले एकमेकांची तोंडं पहात रहातात. नकळतपणे त्यांना पुढे काय करावयाचे ते समजलेले असते. त्याप्रमाणे ते त्या पंपा सरोवराकडे निघतात.

अशारितीने द्रौपदी हरण पर्वाचा सतरावा भाग संपला.

# द्रौपदी हरण पर्व

## भाग अठरावा

मार्कंडेय ऋषी पुढे सांगत असतात, सीतेच्या अपहरणामुळें बेचैन झालेला राम त्याच्या भावाबरोबर लवकरच त्या पंपा सरोवराकडे पोहोचतो. त्यात सुंदर कमळं होती व त्या गंधर्वाने सांगितल्या प्रमाणे हंस पक्षीसुद्धा होते. तो प्रदेश अतिशय विलोभनीय होता परंतु, दुःखात व्यग्र असलेले ते त्या सौंदर्याचा अनुभव घेण्यास असमर्थ होते. तेथील वारा तेथील वनस्पतीचे सुगंध सर्वदूर पसरवत होता त्यामुळें तो वारा आल्हाददायक होता. त्या सुगंधामुळे त्याला त्याची पत्नी आठवते कारण तिला असा सुगंध फार आवडत असें. पुनः तो त्याच्या दुःखात चूर होतो. त्याचे वरंवार दुःखात जाणे लक्ष्मणाला आवडत नाही व तो रामाला सांगतो कीं, "असें खेद करत राहून कांहींही साध्य होणार नाही. सुग्रीवाकडे असें जाता येणार नाही. तेव्हां हे दुःख करणे बंद करून आपण आपल्या ध्येयाचा विचार केला पाहिजे. आता आपल्याकडे निश्चित माहीती आहे तेव्हां रडत न बसता पुढच्या कारवाईची व्यवस्था करण्याकडे लक्ष दिले पाहिजे". रामाला आपले असें भावनांच्या आहारी जाणे चुकीचे आहे हे समजते. सीतेला त्याच्या कैदेतून सोडवण्यासाठी दंड, युक्ती आणि कपट अशा मार्गाने आपल्याला काम करावे लागणार आहे. लक्ष्मण पुढे रामाला बोलतो, "आता आपण सुग्रीवाला भेटणार आहोत तेथे रडत बसू नकोस". सुग्रीव त्या पहाडावरच आहे तेव्हां आपण तेथे गेलं पाहिजे. ते ऐकल्यावर राम स्वताला सावरतो व त्याच्या पौरुष्यात येतो. भावना सोडून तो विवेकांनी काम करण्याचे ठरवतो. त्यानंतर ते दोघे पंपा सरोवरात स्नान करतात. तेथे पितरांना अर्घ्य देतात. तेथे वनात वाढणार्या झाडांची फळं ते खातात. त्यानंतर ते त्या पहाडाच्या अगदी वरच्या शिखराकडे पहातात तेव्हां त्यांना पांच वानर तेथे बसलेले दिसतात. रामाला येतांना पाहून सुग्रीव त्याचा खास मदतनीस हनुमान त्याच्याकडे पाठवतो. ते सुग्रीवाला भेटतात तेथे रामाला सीतेचे वस्त्र जे त्यांना मिळाले होते ते दाखवतो. ते पाहून राम व लक्ष्मण ओळखतात कीं, ते तिचेच आहे. त्यावरून रावणाने तिला लंकेकडे नेले आहे हे सिद्ध होते. त्यानंतर रामाला प्रथम सुग्रीवाची नेमणूक वानरांच्या राजाच्या पदावर करावे लागणार असते तरच, त्याला त्या समाजाची मदत

होणार होती. सुग्रीवाचा प्रश्न त्यासाठी प्रथम सोडवावा लागणार होता. सुग्रीवाच्या भावांने त्याला फसवून त्याची गादी काबीज केली होती त्यासाठी त्या भावाचा म्हणजे वालीचा पराभव करणें हे आता मुख्य कार्य झाले होते. त्याकरतां राम सुग्रीवाला आश्वासन देतो कीं, तो वालीशी लढून त्याला पराभूत करून त्याच्या हातात असलेले वानरांचे राज्य पुन्हा सुग्रीवाकडे सुपूर्द करील. सुग्रीवाची राजधानी होती किश्कींदा. त्या दिशेने वालीबरोबर युद्ध करण्याच्या उद्देशाने ते निघतात. ते किश्किंदा मध्ये पोहोचतात. तेथे त्याच्या वाड्याजवळ गेल्यावर सुग्रीव जोरांने ओरडून त्याच्या भावाला लढण्याचे आव्हान देतो. त्याच्या ओरडण्याचा आवाज धबधब्यासारखा प्रचंड असतो. वालीला समजते कीं, राम सुग्रीवाच्यासाठी लढण्याकरता आला आहे. त्याला रामाशी लढणे बरोबर वाटत नाही म्हणून तो त्याच्या बायकोला पुढे करतो. त्याची बायको तारा पुढे येते. ती तिच्या पतीला सांगते सुग्रीवाला कोणी मदत करणारा मिळाला आहे. ती वालीला सांगते कीं, "तू अशा परिस्थितीत पुढे जाऊ नकोस". तिली वाली बोलतो, "तुला सगळ्या प्राण्यांचे आवाज समजतात तेव्हां तू पाहून मला सांग कोणाची मदत माझ्या भावाला मिळाली आहे"? वाली अंगावर सोन्याचा हार घातलेला असा बसूनच रहातो. तारा बाहेर डोकावून पहाते व तिला दिसते कीं त्याच्या बरोबर दशरथ पुत्र राम आलेला आहे. ज्याच्या तिरंदाजीची ख्याति तिनही जगात आहे. ते ती वालीला सांगते. पुढे ती सांगते कीं, त्याच्या बरोबर त्याचा भाऊ सुमित्रापुत्र लक्ष्मणसुद्धा उभा आहे. दोघेही शस्त्र सज्ज आहेत. कदाचित सुग्रीवाने त्याच्या बरोबर कांही प्रकारचा समझौता केला असावा. त्याशिवाय मैंद व द्विविंद सुद्धा आहेत. रामाच्या बाजूला सुग्रीवाचा मित्र हनुमान उभा आहे. ते सगळे फार शक्तिमान व हुशार आहेत. ते ताराचे बोलणे ऐकल्यावर तो घमेंडी वानर राजा तिच्या बोलण्याकडे दुर्लक्ष करत तिला उलट विचारतो, "काय तुझे माझ्या भावावर लक्ष लागले आहे काय"? नंतर तिला जोराने बाजूला ढकलून तो त्याच्या गुहेबाहेर येतो. तो मल्यावत पर्वताच्या बाजूला होता. "अरे माझ्या नामधारी भावा मी तुला कित्येकदा चीत केले आहे तरी आता पुन्हा कां आलास? गेल्यावेळी मी तुला जीवानिशी सोडून दिले कारण तू माझा भाऊ आहेस पण तुला अक्कल येत नाही असें वाटते आता ह्या कोणाला घेऊन कां आला आहेस"? मला वाटते तुला तुझा जीव प्यारा नाही म्हणूनच तू पुन्हा पुनः माझ्याशी लढायला येत

असतोस". ते ऐकल्यावर सुग्रीव त्याला बोलतो, तू माझे राज्य माझी बायको असें सगळे माझ्याकडून हिरावून घेतले आहेस आता मला जगण्याचा एकच महत्वाचा उद्देश उरलेला आहे. असें बोलून सुग्रीव वालीवर तुटून पडतो. त्यांच्यात छटापट सुरू होते. ती मारामारी अशी होती जणू साल आणि ताल वृक्ष एकमेकांशी झगडत आहेत असें ते दिसत होते. हवेत उंच उडी मारून ते एकमेकांवर पडत होते. ते दगड धोंडे उचलून मारत होते. त्यानंतर ते गुद्दा गुद्दी करू लागले. त्यानंतर ते एकमेकाशी भिडले. त्यांच्यातील कोण जिंकणार ते समजत नव्हते. त्यांच्यातील कोण वाली व कोण सुग्रीव हे समजणे अशक्य होते. त्यावेळी हनुमान सुग्रीवाच्या गळ्यात एक फुलांची माला घालतो. त्यामुळें तो वेगळा ओळखता येऊ लागला. एकाद्या भल्या मोठ्या डोंगरासारखा तो सुग्रीव भासू लागला होता. त्यानंतर रामाने वालीवर नेम धरला व बाण सोडला. तो बाण वालीच्या छातीत घुसला व त्यामुळें तो रक्त ओकू लागला. त्याला त्याच्या समोर राम व सुमित्राचा मुलगा दिसू लागले. वाली रामाच्या काकुत्श वंशाचा उद्धार करू लागला. त्यानंतर लवकरच तो मृत झाला. तारा तिचा वाली जमिनीवर मेलेली पाहते. वाली मारला गेल्यामुळें सुग्रीव किश्किंदा राज्याचा पुन्हा राजा होतो. त्याची बायको तारा पुन्हा त्याला मिळते. त्यानंतर राम व लक्ष्मण दोघे त्या मल्यावत पर्वतावर राहू लागतात. तेथे ते चार महिने रहातात.
त्या सुमारास लंकेमध्ये रावणांने सीतेला एका नंदनवनासारख्या सुंदर उद्यानात रहाण्यास ठेवलेले असते. त्या उद्यानात अशोकाची भरपूर झाडे होती म्हणून त्याला अशोक वन असें म्हणत होते. तेथील परिसर एकाद्या ऋषींच्या आश्रमासारखा वाटत होता. सीता तेथे फळं व कंदमुळं खाऊन रहात होती. तिने बैराग्या सारखे कपडे घातले होते. दिवसेंदिवस ती कृश होत होती. सीता रामाचा धावा करत होती, ती समजत होती कीं, तिचा पती तिला सोडवण्यासाठी एक न एक दिवस खात्रीने तेथे येईल व तिला सोडवून नेईल. त्याठिकाणी रावणांने राक्षस महिला तिच्यावर लक्ष ठेवण्यासाठी नेमलेल्या होत्या अशासाठी की सीता आत्मघात करणार नाही. बाकी सीता त्या उद्यानात मुक्तपणे फिरू शकत होती. त्या राक्षशिणींतील कांहींना दोन डोळे होते तर कांहींना तीन डोळे होते. कांहींना त्यांच्या डोक्यावर डोळे होते कांहींना लांब जिभा होत्या तर कांहींना अजिबात जिभा नव्हत्या. कांहींना तीन स्तन होते, कांहींना एकच होते. कांहींना एकच पाय होता. कांहींना त्यांच्या

माथ्यावर जाड केसाच्या जटा होत्या व एकच डोळा होता. त्या सगळ्या भयंकर दिसत होत्या. त्यांची सीतेवर कडक नजर होती. त्या पिशाच्च बायका सीतेशी नेहमी रागातच बोलत होत्या तिला सतत टोमणे मारत कीं तिच्या नवर्याने शुर्पणखाचे नाक कापले म्हणून तीला ही शिक्षा झालेली आहे. त्या राक्षस बायका तिला नेहमी फाडून खाऊन टाकण्याच्या धमक्या देत होत्या. ते ऐकल्यावर सीता त्यांना बोलत असें, "अहो बायकांने तुम्ही नुसती धमकी कां देता, मला खरोखरच कां खाऊन टाकत नाही"? मला जगण्याची इच्छा अजिबात नाही. सीता असें त्या राक्षस बायकांना पुन्हा पुन्हा बोलत असल्याने त्या बायका राजाकडे जातात व त्याला ते सांगतात. त्यानंतर राजा त्या घाबरवणार्या राक्षस बायकांना काढून एक व्यवस्थितपणे बोलणारी एक माणसासारखी दिसणारी त्रिजता नांवाची राक्षस बाई तिच्यावर नेमतो. ती सीतेशी व्यवस्थेतपणे बोलते परंतु, त्यामागे राजाचा उद्देश अपवित्र होता. ती सीतेचे मन वळवण्याचा प्रयत्न करत असते कीं, ती रामाला विसरेल व रावणाला तिचा धनी म्हणून स्वीकारेल. ती तिचे तारुण्य अशा खोट्या आशेत किती दिवस घालवणार आहे असा प्रश्न ती सीतेला विचारत असते. आता तुला तो राम कधीच दिसणार नाही मग त्याचा विचार तू सोडून द्यावयाला पाहिजे असें तिच्या डोक्यात सतत भरवले जात होते. तशा बोलण्याने ती राक्षशीण सीतेच्या मनाचा ठाव घेत असते. त्यानंतर तिला समजते कीं, सीतेला कोणत्याही परिस्थितीत रामाशिवाय कांहींही सुचत नाही तेव्हां, त्रिजता राक्षशीण सीतेला बोलते, "हे बघ सीता, रावणाचा एक प्रधान अविंध्य नावाचा राक्षस आहे. त्यांने माझी नेमणूक येथे केली आहे. तो रामाचे भले पहाणारा आहे. त्यांने मला तुझ्याशी बोलण्यासाठी पाठवले आहे. त्यांने सांगितले आहे कीं, सीतेला सांग कीं, तिचा पती राम व्यवस्थित आहे व त्याच्या बरोबर त्याचा भाऊ लक्ष्मण सुद्धा आहे. तुझ्या रामाने वानर राजा सुग्रीवांशी संधान केले आहे. तो तुला ह्यातून सोडवण्यासाठी तयारी करत आहे. आणखीन एक गोष्ट तिला सांगते कीं, रावणाची भिती बाळगू नकोस, कारण रावणावर सगळ्या जगांने बहिष्कार टाकला आहे. तसेंच नलकुबेराच्या शापामुळें तो कोणत्याही अप्रसन्न स्त्रीचा विनयभंग करू शकत नाही. तो शाप त्याला नलकुबेराने दिला होता जेव्हां रावणांने त्याच्या रंभा नावाच्या बायकोशी अतिप्रसंग करण्याचा प्रयत्न केला होता. तो फक्त तुला घाबरवण्याचा प्रयत्न करील पण तू तुझ्या धोरणापासून हटू नकोस.

ती पुढे सांगते कीं, तिला एक भयंकर स्वप्न पडले त्यात तुझ्या रामाने ह्या नीच प्रवृत्तीच्या राक्षसाचा वध केला असें मला दिसले. त्यामुळें पुलस्त्य घराण्याचा नाश झाला असें मला दिसले. तो रावण त्याच्या पापकारक कारवाया करत असतांना मी त्या स्वप्नात पाहिले. त्याची विवेकबुद्धी संपली आहे कारण तो देवांना आव्हानं देत आहे. माझ्या स्वप्नात त्याचा सर्वनाश होतांना मी पाहिले. माझ्या स्वप्नात मी पाहिले कीं, त्याच्या दहा तोंडासह मातीत लोळत आहे, त्याचे कपडे मलिन झाले आहेत. दुसर्या क्षणी तो गाढवांच्या रथातून जातांना पाहिला. त्याचे डोक्याचे केस कापलेले होते. मी कुंभकर्णाला पाहिला कीं , तो डोक्याचे केस कापलेला व गळ्यात लाल फुलाच्या माळा घातलेला असा दक्षिण दिशेकडे धावत असलेला पाहिला. मी बिभीषणाला पाहिला त्याच्या डोक्यावर छत्री होती, माथ्यावर पगडी होती, अंगात उंची वस्त्र होती, चंदन गंध लावलेले होते. तो स्वर्गाच्या शुभ्र पर्वताकडे जात होता. त्याचे चार साथीदारसुद्धा त्याच्या बरोबर तसेंच जात होते. ह्या दृष्यांचा अर्थ असा होतो सीता कीं, तू पुढे होणार्या समरातून सहीसलामत सुटणार आहे. तुझ्या रामाच्या बाणांनी सगळे जग, त्यातील समुद्र, झाकलेले असतील असें दिसत होते. मी लक्ष्मणाला सुद्धा रामाप्रमाणे बाणांचा वर्षाव करताना पाहिले. लक्ष्मण हाडांच्या ढीगावर चढून तेथून मध व दुधात शिजवलेला भात खांताना पाहिले मी. तो उत्तर दिशेकडे जात होता. तो रडत होता, त्याच्या सर्वांगाला रक्त लागलेले होते. त्याला शुभ्र रंगाचे वाघ संरक्षण देत होते असें मी पाहिले. ह्या स्वप्नांचा अर्थ लवकरच तुझी रावणाच्या कैदेतून सुटका होणार आहे. तुझे सुखाचे दिवस सुरू होणार आहेत. त्रिजताचे ते असें सगळे स्वप्न ऐकून सीतेच्या आशा वाढतात. ती त्याप्रमाणे विचार करू लागते. तेवढ्यात तेथे ते भयंकर पहारा देणार्या राक्षस बायका येतात. त्या सीतेला त्रिजतेबरोबर बसलेली पहातात.

अशारितीने द्रौपदी हरण पर्वाचा अठरावा भाग संपला.

# द्रौपदी हरण पर्व
## भाग एकोणीसावा

मार्कंडेय पुढे सांगत असतात, राम व लक्ष्मण त्यांचे काम करत असतांना लंकेत अशोकवनात सीता तिच्या कमी वस्त्रात रामाचा धावा करत बसलेली असतांना रावण त्याचे राजेशाही वस्त्र घालून तेथे सीतेला पटवण्याच्या उद्देशांने येतो. सीता तिच्या मनगटावर असलेले सौभाग्य सुत्र (त्या काळात विवाहीत स्त्री मनगटावर असें लालरंगाचे धागे बांधत असतं जसे, आज मंगलसुत्र विवाहीत बायका गळ्यात घालतात) पहात बसलेली असते. राक्षस, गंधर्व, यक्ष आणि कःपुरूषांना हरवणारा तो दानव राजा तिच्यापुढे लाळ घोटत उभा होता. त्यांने त्याची नऊ डोकी लपवली होती व फक्त एकच डोके दिसत होते. त्याच अंगावर अप्रतिम असें दाग दागिने होते. त्यात मौल्यवान रत्न होती. सीतेवर छाप मारण्यासाठी त्याने ते सगळे केले होते. सीतेची रामभक्ती किती थोर आहे ते त्याला अजमावयाचे होते. इंद्राच्या बागेतील कल्पवृक्षासारखा तो वाटत होता. त्याचे रुप पाहून सीता खूष होण्या ऐवजी घाबरून जाते. ती तिचे डोळे घट्ट मिटून घेते. शनी ग्रह असावा असा तो भयंकर दिसत होता. तिच्याकडे पहात तो दानव तिला बोलतो, "अहो श्रीमती, तू तुझ्या धन्यासाठी जरा जास्तच प्रेम दाखवत आहेस. आता थोडे माझ्याकडे पहा. माझ्या दास्यांना मी सांगणार आहे किं, त्या तुला नवरीसारख्या सजवणार आहेत. त्यानंतर तू जास्त सुंदर दिसशिल. माझ्या सगळ्या राण्यात मी तुला अव्वल ठरवीन. त्यातील कित्येक देवांच्या मुली आहेत मी पळवून आणलेल्या. त्यासुद्धा अशाच तुझ्याप्रमाणे वागत होत्या सुरूवातीला, पण आता त्या माझ्या कृपेमुळें फार संतुष्ट झालेल्या आहेत, माझी खात्री आहे, तुझे सुद्धा तसेच होईल. माझ्या आज्ञेत चौदाशे लक्ष पिशाच्च आहेत. त्याच्यापेक्षा दुप्पट संख्येने नरभक्षक राक्षस माझ्या आज्ञेचे पालन करत असतात, त्याच्या तिप्पट संख्येने यक्ष माझ्या आज्ञेचे पालन करतात. माझ्या राणीवशात अनेक गंधर्व कन्या, अप्सरा, जसे माझ्या भावाच्या सेवेत आहेत तशा माझ्या सेवेतसुद्धा आहेत. मी त्या पुलस्त्य घराण्यातील विश्रावाचा मोठा पुत्र आहे. मी ह्या सृष्टीचा पांचवा चालक आहे. माझ्याकडे सगळ्या सोयी सुविधा तुला मिळणार आहेत ज्या तुला तुझा

कमनशिबी नवरा कधीच देऊ शकणार नाही. ह्या खडतर वनात बसण्यापेक्षा माझ्या राणीवशात तू जास्त मजेत रहाशिल. तुला मी माझी पट्टराणी करणार आहे जशी दुसरी मंदोदरी". सीता ते ऐकत असतांना सारखी अश्रू ढाळत होती. तिचे अश्रू तिच्या स्तनांवर पडत होते. त्यामुळें ते उरोज ओलेचिंब झालेले होतो. रावण थांबतो व त्याची अपेक्षा असते कीं सीता कांही बोलेल. त्याप्रमाणे ती पतीव्रता त्याला उत्तर देते, "हा केवळ भाग्याचा परिणाम आहे. अहो राक्षसांचे अधिपती, आपल्याला वासनांत रमणे आवडते तसे सगळेच असतील असें जर तुम्हाला वाटत असेल तर ते चुकीचे आहे. कृपया तुम्ही तुमच्या मनातून माझा विचार काढून टाकावा कारण, ते कधीही होणार नाही. मी एक विवाहीत स्त्री आहे व माझे माझ्या पतीवर निस्सीम प्रेम आणि आदरभाव आहेत. माझे व माझ्या पतीचे नाते वासनांवर आधारित नाही, ते परस्पर सन्मानाच्या भावनांवर आधारित आहे. जेथे आदरभाव ज्या नात्यात असतो ते नाते कोठल्याही दुसर्या गोष्टींचा कधीही विचार करत नाहीत हे आपल्या सारख्या अनुभवी इसमाला चांगलेच माहीत असेल असे मी समजते. माझा आपल्याला कधीच लाभ होणार नाही. माझ्यावर जुलूम जबरदस्ती करून कांहींच साध्या होणार नाही. मी एकटी असहाय असले तरी त्याचा तुला उपयोग होणार नाही. अशा जबरदस्तीने मी तुझी कदापीही होणार नाही. बलात्कार केल्याने तुला फक्त पाप लाभेल. आपले पिता ब्रह्माचे चिरंजीव आहेत. ते स्वतः ब्राह्मण आहेत, मग आपण त्याच्या प्रमाणे पवित्र जीवन कां स्वीकारत नाही. असें पापमय जीवन जगण्याने अखेरीस आपले फक्त नुकसान होणार हे माहीत असूनही आपण असें कां वागत अहात? हे सगळे आपण करता कारण आपला अहंकार भ्रष्ट झाला आहे. हे विश्व कांहीं नियमांने बांधलेले आहे. ते नियम आपण जांणता म्हणून मी विचारते, त्या नियमांची पायमल्ली करण्याची तुम्हाला अशी दुर्बुद्धी कां होत आहे"? तुमचा भाऊ महादेवाचा स्नेही आहे व विश्वाच्या वास्तविक संपत्तीचा कर्ता आहे त्याच्याशी सुद्धा आपण मूर्खासारखे कां वागत असता त्याचे मला आश्चर्य वाटते. कशासाठी हे सगळे तुम्ही करत असता? तुम्हाल असे करतांना लाज कशी वाटत नाही". एवढे बोलल्यावर सीतेला तिचे अश्रू आवरणे अशक्य झाले ती रडू लागली. सीतेच्या त्या वक्तव्याने रावण समजून चुकला कीं सीता बधणार्यातली नाही. तो चिडून बोलतो, "अहो श्रीमती, मकर ज्याचे चिन्ह आहे त्या

देवाकडून माझा नाश होणार असेल तर ते होवो. परंतु, तुझ्या मर्जीशिवाय मी तुला कधीच मागणी घालणार नाही हे माझे तुला आश्वासन आहे असें समज. ज्या बाईला एक मानव प्रिय आहे जे आम्हा राक्षसांचे खाद्य आहे तशा बाईत मी लक्ष घालणे श्रेयस्कर नाही. असें बोलून तो राक्षसांचा राजा अंतर्धान पावतो. त्यानंतर सीता त्या प्रेमळ त्रिजताच्या सानिध्यात सुरक्षितपणे राहू लागते.

अशारितीने द्रौपदी हरण पर्वाचा एकोणीसावा भाग संपला.

# द्रौपदी हरण पर्व

## भाग विसावा

मार्कंडेय पुढे सांगतात, ते संकेत होत असतांना येथे मल्यावत पहाडावर सुग्रीवाच्या आदरतीथ्याचा अनुभव राम व लक्ष्मण घेत असतात. तेथील वातावरण त्याला आनंद देत होते. परंतु, जेव्हां त्याच्या मनात सीतेची आठवण येई तो बेचैन होऊन जात असें. एकदा रात्री आकाशाकडे पहात पडलेल्या रामाला सीतेची तीव्र आठवण येते. कारण सीतेला आवडणार्या सुगंधाने भरलेले वारे वाहू लागतात. राम तडक उठतो व लक्ष्मणाला बोलतो, "आपण येथे असें किती दिवस बसून काढणार आहोत? ज्याला आपण मदत केली व त्याचे राज्या त्याला मिळवून दिले तो कोठे गायब झाला आहे. आपण ह्या मल्यावत पहाडावर बसण्यासाठी आलेलो नाही. तो सुग्रीव काय करत आहे ते शोधले पाहिजे. कदाचित तो आपल्याला विसरला असावा कारण त्याचे काम झाले आहे. तो आपल्याशी कांहीं दगा फटका करणार नाहीं नां? अशी शंका माझ्या मनात येत आहे. त्यासाठी तू सुग्रीवाला जाऊन भेट आणि विचार, तो आपल्या कामाबद्दल काय करत आहे. त्याला सांग कीं, मी त्याच्या ह्या दिरंगाई करण्याच्या बद्दल त्याच्यावर नाराज आहे".

लक्ष्मण ताबडतोब निघतो व किश्किंदा नगरीत जातो. त्याचे तेथे स्वागत होते. तो सुग्रीवाला भेटतो. त्याला रामाची नाराजी सांगतो. सुग्रीव त्याला सांगतो कीं, चारही दिशांना त्यांने त्याचे हुशार हस्तक पाठवले आहेत ते सगळे परत येण्यास निदान एक महिन्याचा अवधी लागणार, तो पर्यंत आपल्याला पुढची कारवाई करता येणार नाही म्हणून वेळ जात आहे. त्या हस्तकांतील दक्षिण दिशेला गेलेले सोडून बाकीचे परत आले आहेत परंतु, त्यांच्या माहितीप्रमाणे सीता त्या दिशांत नाही. फक्त दक्षिण दिशेचे हस्तक ज्यात माझा खास हनुमान गेला आहे त्याच्या समुहाबरोबर तो अजून आलेला नाही. त्याच्या येण्यानंतरच आपण कांहीं करू शकतो. असें निवेदन सुग्रीव लक्ष्मणाकडे करतो व ते रास्त असल्याने त्याचे समाधान होते. सुग्रीव लक्ष्मणाची चांगली बडदास्त ठेवतो. त्यानंतर तो रामाकडे जातो व सगळे व्यवस्थित आहे ते सांगतो.

थोड्याच दिवसात सुग्रीवाकडे हनुमानाचे हस्तक पोहोचतात व सांगतात कीं, हनुमान सीतेला भेटला आहे व त्यांचे बोलणेसुद्धा झाले आहे. ती वार्ता ऐकून लक्ष्मणाला आनंद होतो. ती बातमी रामाला सांगण्यासाठी ते सगळे रामाला भेटण्यासाठी मल्यावत पर्वताकडे जातात. दक्षिणेकडे गेलेले वानर परत आलेले असतात. ते सांगतात, ते वानर लंकेतील मधूबन उद्यानात जातात. त्या उद्यानाचे संरक्षण राक्षस सैन्य मोठ्या काळजीपूर्वकपणे करत असते. ते वानर रामाला तेथे काय पाहिले ते सांगतात. राम आशा करत असतो कीं, त्यांना सीतेचा सुगाव लागेल. तेवढ्यात स्वतः हनुमान तेथे उपस्थित होतो व काय झाले त्याचा वृतांत सांगतो. त्याच्या चेहर्यावरून रामाला समजते कीं खरोखरच त्यानी सीतेला पाहिलेले आहे. हनुमान रामाला, लक्ष्मणाला व सुग्रीवाला लवून नमस्कार करतो. राम हनुमानाला विचारतो, "काय मी तिला अयोध्येस घेऊन जाऊ शकेन? मला माझ्या शत्रूचा नाश करावयाचा आहे. त्यासाठी मला तुझी मदत पाहिजे. जोवर मी माझ्या पत्नीला जीवंत सुरक्षित अशी तेथे घेऊन जाऊ शकत नाही तोवर मी माझ्या राज्यात जाऊ शकत नाही". त्यानंतर हनुमान स्वतःला थोडा ताजातवाना करतो व नंतर सांगू लागतो,

"सगळा दक्षिणेकडचा भाग शोधल्यावर एका जंगलात एक गुहा सांपडते. त्यात आम्ही शिरतो. ती खूप खोल  व लांब पर्यंत आत गेलेली होती. त्यात आम्ही जात होतो. खूप कंटाळवाणा तो अनुभव होता. किती योजने चालत होतो समजले नाही. त्या गुहेत दाट झाडी होती. अंधार होता. तेथे किडे पाखरे होती त्यांचा आम्हाला खूप त्रास झाला. तरी आम्ही आत जातच होतो. अखेरीस आम्ही त्या गुहेच्या दुसर्या तोंडाकडे पोहोचतो. तेथे आम्ही बाहेर आल्यावर आम्हाला मोठा विस्तीर्ण समुद्र दिसतो. त्या ठिकाणी आम्हाला एक सुंदर महाल दिसतो. त्याच्या सोनेरी घुमटावर सूर्याचे किरण चमकत होते. तो महाल मायासुरांनी बनवलेला होता. तेथे आम्हाला एक संन्याशीण भेटली. तिचे नांव प्रभावती होते. तिच्या मुद्रेवरील वैराग्याचे तेज पाहून आम्ही प्रसन्न झालो. तिने आम्हाला कांहीं खाण्यासाठी दिले. कांहीं पिण्यासाठी सुद्धा दिले. त्या ठिकाणी आम्हाला तीन डोंगर दिसले. शल्य, मलय आणि दार्दुर अशी त्यांची नांवं होती. आम्ही मलय पर्वतावर चढून गेलो. तेथून पलिकडे विशाल पसरलेला महासागर दिसला. ते पाहिल्यावर आम्हाला कळेना ह्यापुढे काय"? ह्यापुढे कसे जाणार? ह्या विचाराने व निराश मनाने आम्ही परत

फिरण्याचा निर्णय घेतला. कारण तेथे खाण्याची सुद्धा कांहीं सोय नव्हती. त्या विशाल समुद्रात भयंकर दिसणारे मोठे मोठे मांसे उड्या मारत फिरत होते. खाण्याची सोय नाही व परत फिरण्यासाठी आमच्यात आता ताकद उरलेली नव्हता म्हणून तेथेच मरावे लागणार असे आम्हाला वाटू लागले. तेथे दूरवर एक भलामोठा पक्षी बसलेला पाहिला त्याच्या जवळ गेलो तो विनताच्या मुला सारखा मोठा होता. तसेतर तो प्रचंड आकराचा पक्षी आम्हाला खाणार होता परंतु, आमच्या तोंडातून जटायुचा उल्लेख झालेला तो ऐकतो व त्याची चौकशी आमच्याकडे करतो. त्याला आम्ही विचारले कीं तो येथे कसा आला? त्याच्याशी बोलतांना असें समजले कीं, तो जटायुचा भाऊ संपती आहे. आम्ही जटायू मेल्याचे त्याला सांगितले. त्याला सांगितले जटायुला कोणी व कसे मारले. रावणांने त्याला मारले आहे ते समजल्यावर तो रावणांवर फार संतापतो. पुढे तो त्यांच्या गोष्टी सांगतो. "जटायु सीतेच्या पाठी गेला तसा मी सूर्याला पकडण्यासाठी त्याच्यावर झडप घातली, त्यावेळी माझी पिसं जळून जातात व तो उडेनासा होतो. तेव्हां पासून मी येथेच बसलेला आहे. नंतर जटायु त्याच्या पित्याकडे मुख्य जमिनीवर गेला असेल असें मला वाटत होते". त्यानंतर जटायु व संपतीची भेट झालेली नाही असें तो सांगतो. त्यानंतर तो राम कोण म्हणून विचारतो. त्याला समजते कीं राम त्यांच्या पित्याच्या मित्राचा मुलगा आहे तेव्हां त्याला आमच्याबद्दल विशेष कुतूहल उत्पन्न होते. त्यानंतर आम्ही त्याला सगळे सांगतो कीं, कसे रामाची बायको रावणांनी पळवली व त्याला विरोध जटायुने केला त्यामुळें त्याची हत्या रावणांने केली वगैरे, आणि आता आम्ही त्या सीतेचाच शोध घेण्यासाठी येथवर आलो आहोत असें सांगितले. त्याला आम्ही तेसुद्धा सांगतो कीं सध्या आम्ही फार भुकेले आहोत. सीतेचा शोध लागत नाही तोवर आम्ही परत जाऊ शकत नाही हेसुद्धा त्याला सांगितले. ते ऐकल्यावर संपती सांगतो कीं, तो रावणाला चांगला ओळखतो. त्याची राजधानी आहे लंका, ती ह्या समुद्राच्या पैलतीरी आहे. तेथे त्रिकुट नांवाचा डोंगर आहे त्याच्या पायथ्याशी ती वसलेली आहे. तो पुढे बोलतो कीं, सीता त्या ठिकाणी असलेल्या एकाद्या वनात ठेवलेली असेल. कारण रावण कितीही ताकदवान असला तरी तो त्याची पत्नी, मंदोदरीला घाबरतो. त्यामुळें तो सीतेला कांहीं करेल असे संभवत नाही. हनुमान पुढे सांगतो, ते समजल्यावर मी त्या पलिकडील किनार्याला जाण्यासाठी कांहीं व्यवस्था

आहे कां ते विचारले. तशी कांहीं सोय नसल्याचे समजल्यावर मी माझ्या पित्याचे वायूदेवाचे, स्मरण केले व आकाशात उडी घेतली आणि ते कित्येक योजनं असलेलं अंतर हवेतून माझ्या पित्याच्या आधारे पार केले व लंकेत उतरलो. तेथे उतरल्यावर अनेक राक्षस माझ्यावर तुटून पडले पण मी त्यांना मारले व बाजूला फेकून दिले. तेथे एका उपवनात कोणी स्त्री संन्याशा सारखे वस्त्र घातलेली मी पाहिली. तिचे केस विस्फारलेले होते जणू काय तिने वेणीफणी केलेली नव्हती. तिचे कपडे फार मळलेले होते परंतु तोंडावर तपस्येचे तेज दिसत होते. ती दुःखी कष्टी असल्याचे मी समजलो व त्यावरून अंदाज केला कीं, हिंच सीता असणार. त्या उपवनातील घनदाट झाडीत मी लपून बसलो होतो. तिच्या आवती भोवती राक्षसिणी फिरत होत्या परंतु, थोड्या वेळांनी त्या कोठेतरी निघून गेल्या व सीता एकटी आहे असे पाहून मी तिच्या जवळ गेलो. प्रथम ती मला राक्षस समजली पण मी तिला सांगितले कीं, मी तिच्या पतिचा निरोप घेऊन आलो आहे तेव्हां ती माझ्या कडे ज्या नजरेने पाहू लागली कीं, मला खात्री झाली कीं, हिंच सीता आहे. मी तिला सांगितले कीं, राम व तिचा दीर सुखरुप आहेत परंतु तुझा शोध घेत आहेत व त्यांना मदत करण्यासाठी आमच्या राजांने सुग्रीवाने मला पाठवले आहे. तुझा पती तुला सोडवण्यासाठी लवकरच येणार आहे तरी धीर न सोडता अशीच रहा. असें मी तिला सांगितले. मी वानर आहे राक्षस नाही. माझे नांव आहे हनुमान. माझे बोलणे ऐकल्यावर सीता थोडाकाळ शांतपणे कसला तरी विचार करत असलेली दिसली. त्यानंतर ती मला म्हणाली कीं, "अविंध्य नांवाच्या राक्षसाने जो रामाच्या बाजूचा आहे, मला तू येणार असें सांगितले आहे. आता मला खात्री पटली कीं कांहीतरी होत आहे, मला त्यात समाधान वाटते परंतु, तू आता येथून निघून जा कारण केव्हांही त्या राक्षस बायका येऊ शकतात. त्यानंतर तिने मला हा दागिना दिला व बोलली रामाची मी सारखी आठवण करत आहे व त्याची प्रतिक्षा करत आहे असा माझा निरोप त्यांना दे असें मला सांगितले. सीतेने मला सांगितले कीं, आमच्या दोघांची एक आठवण मी तुला सांगते म्हणजे, रामाला खात्री पटेल कीं आपण खरोखरच भेटलो आहोत. ती आठवण अशी कीं, सीतेला मंत्रविद्येची प्रचिती पहावयाची होती म्हणून, एकदा चित्रकुट पर्वतात एका कावळ्याला रामाने एक गवत मंत्राने भारून ते शस्त्रासारखे फेकले होते व तो कावळा मारला होता. त्यामुळें सीतेला मंत्रविद्येचे

सामर्थ्य समजते. सीता मला बोलते कीं हा प्रसंग फक्त आमच्या दोघांतील आहे व तो जर मी तुम्हाला सांगितला व हा दागिना दिला कीं आपली खात्री होईल कीं, मला सीताच भेटली होती". असें सांगून हनुमान तो दागिना रामाला देतो. पुढे हनुमान रामाला सांगतो, सीतामाई मला सांगत होत्या कीं त्यांच्या हट्टामुळें हे सगळे घडले आहे. जर त्यांनी त्या सोनेरी सांबराचा आग्रह धरला नसता तर आपण त्यांना सोडून गेला नसता व हे असें घडलेच नसते. त्यानंतर त्यांनी आपली फार स्तुती केली कीं, आपण त्यांच्या प्रत्येक आवडी पुरवण्याचा किती प्रयत्न करत होता, त्या सांगत होत्या. त्या ते सांगत असतांना त्या आठवणीत गुंतून कांहीवेळ गप्प होत होत्या. अशा बर्याच गोष्टी सीतामाई मला सांगत होत्या ज्या तुमच्या खाजगी जीवनाचा हिस्सा आहेत, त्या येथे सभेत सांगत नाही". पुढे हनुमान सांगतो, "आमचे बोलणे संपते, मी तिने दिलेला दागिना माझ्या कनवटीला लावतो, तेवढ्यात कांहीं राक्षस सैनिक येतात व मला पकडतात. मी त्यांना मला पकडू देतो कारण, मला आता आत जावयाचे असते. ते राक्षस मला रावणापुढे उभे करतात. रावण त्यांना सांगतो कीं, ह्या वानराच्या धोतराच्या लांब लोंबणार्या सोग्याला आग लावून द्या म्हणजे त्याला अक्कल येईल. रावण मला एक तुच्छ वानर म्हणून फारसे महत्व देण्यास तयार नसतो. त्याप्रमाणे ते माझ्या धोतराच्या शेपटी सारख्या लोंबणार्या सोग्याला आग लावतात. त्यानंतर ते माझ्यापासून दूर होतात. मी ते पाहून उंच उडी मारतो व तेथे असलेल्या लाकडाच्या घरांवर जाऊन बसतो. त्यामुळें त्या घराला आग लागते. कारण लंकेतील सगळी घरं लाकडाचीच आहेत. अशारितीने मी सगळ्या लंकेला आग लावली. ते करत असतांना माझा सोगा लहान होत होता. तेव्हां मी एका तळ्यात उडी मारली व ती आग विझवली. सगळे राक्षस आगी विझवण्यात गुंतले होते पण तेथे पुरेसे पाणी नसल्यामुळे ते ती भरभर पसरणारी आग थांबवू शकत नव्हते. तेथून मी सीता जेथे कैदेत ठेवली होती तेथे जातो व सीतेला सांगतो कीं, मी सगळ्या लंकेला आग लावली आहे. सगळे राक्षस त्यांची पेटलेली घरं विझवण्यात गुंतले आहेत तेव्हां आपण माझ्या खांद्यावर बसा म्हणजे मी तुम्हाला आकाशातून रामाकडे पोहोचवतो. सीता ते ऐकून खूप हसते. आणि मला सांगते कीं, ती अशी येथून जाणार नाही. माझ्या पतीलाच त्यासाठी यावे लागेल. मी त्यांना परोपरीने सांगितले त्यात बराच अवधी लागेल. परंतु, त्या माझे ऐकत

नव्हत्या. तरी त्या माझे खूप कौतुक करत होत्या कीं मी फार हुशार आहे पण त्या माझ्या बरोबर येण्यास तयार नव्हत्या. जेव्हां मला खात्री झाली कीं, त्या तेव्हांच निघतील जेव्हां राम त्या राक्षसाला ठार मारून खर्या क्षत्रियाप्रमाणे त्यांची त्या कैदेतून सुटका करील. मी त्यानंतर पुनः माझ्या पित्याची आठवण केली व त्यांने मला हवेत उचलून येथवर आणून सोडले. मी जात असतांना सीतामाई माझ्याकडे कौतुकाने पहात होत्या. मला हात हलवून निरोप देत होत्या. ते मी कधीही विसरू शकणार नाही.

अशारितीने द्रौपदी हरण पर्वाचा विसावा भाग संपला.

# द्रौपदी हरण पर्व
## भाग एकविसावा

मार्कंडेय पुढे सांगत असतात, त्या पर्वताच्या शिखरावर राम व त्याचे वानर साथीदार सुग्रीवाच्या आदेशानुसार जमले होते. वालीचा सासरा, प्रसिद्ध वानर श्रेष्ठ सुशेना त्याच्या असंख्य वानर सेने बरोबर तेथे रामाला भेटण्यासाठी आले होते. त्याशिवाय गया व गवाक्ष्य त्यांची वानर सेना घेऊन रामाला मदत करण्यासाठी तयार झाले होते. गवाक्ष्य फारच भयंकर दिसत होता. वानरांत बुद्धीमान म्हणून नावाजलेले पनस त्यांची विशाल वानर सेना घेऊन रामाला मदत करण्यासाठी येण्यास तयार होते. महाबलशाली दधीमुख त्याची शक्तिशाली वानर सेना रामासाठी तयार ठेवतो. जांबुवनाने त्याची काळ्या अस्वलांची सेना तयार ठेवली होती. त्यांच्या भालप्रदेशी कुंकु म तिलक लावलेले होते. त्याशिवाय इतर बरेच प्राणी रामाला मदत करण्यासाठी उत्सुक होते. त्या जमावाने त्या परिसरात मोठा गोंधळ घातला होता. त्यातील कांहीं डोंगरा एवढे होते तर कांहीं रेड्यासारखे दिसत होते. रामाच्या सैन्यात माणसांपेक्षा इतर प्रजातीचे जीव जास्त होते, त्याचे कारण रावणाला तशांपासूनच मृत्यू संभव होता. तशा विविध प्रजातीच्या प्राण्यांमुळें हवेत धुरळा उडत होता. ते त्यांच्या प्रवृत्तीप्रमाणें तेथे जमून उड्या मारणे, धावणे असें बरेच कांही करत होते. त्या सगळ्यात वानरांचे सैन्य प्रमुख होते. ते सुग्रीवाच्या आज्ञेत होते. राम त्याचा मित्र सुग्रीवाच्या मदतीने एक सुमुहूर्त निवडतो कीं, ज्या दिवशी त्यांनी लंकेवर चढाई करावी. ते अफाट सैन्य एका रामासाठी सगळ्या जगाला नष्ट करण्यास तयार होते असे एकंदर दृष्य होते. त्या सेनेचे नेतृत्व वायुपुत्र हनुमानाकडे होते. त्या सैन्याच्या पाठी सुमित्रापुत्र लक्ष्मण होता. त्या वानरसेनेच्या मध्ये रघुकुल रत्न राम होता. त्याच्या अंगावर चामड्याचे चिलखत होते. त्या वानरांच्या हातात दगड गोटे, मोठ्या झाडांच्या फांद्या अशी शस्त्रं होती. त्यामुळें ते सैन्य दुरून पाहिले तर एकादे झाडांचे शेत चालले आहे असें वाटत होते. त्या सैन्याच्या विविध भागांचे नेतृत्व नल, नील, अंगद, कृथ, मैंद आणि द्वींद करत होते. त्यांचा प्रवास विविध प्रकारची वनस्पती असलेल्या अरण्यातून जात होता. तेथे त्यांना खाण्यासाठी भरपूर खाद्य होते. अशारितीने ते शेवटी त्या समुद्र किनार्यावर पोहोचले.

समुद्र किनारी पोहोचल्यावर तेथे ते तळ ठोकतात. तेथे दशरथाचा पुत्र त्या अफाट सेनेला सांगण्यासाठी उठतो. तो जे बोलतो ते त्या प्रसंगासाठी उचित होते. "हा समुद्र फार विशाल आहे. एवढे सगळे सैन्य पैलतीरी नेणे असंभव दिसते. त्यासाठी कोणती कारवाई करावे ते प्रथम आपल्याला ठरवावे लागेल". त्यावर त्यांच्यात काय करावे त्याबद्दल चर्चा सुरू झाली. कांहीं म्हणाले आम्ही तरून जाऊ, कांहीं त्यासाठी तयार नव्हते. ते बोलले आपण होड्याने जाऊ. कांहीं म्हणाले आपण तराफे वापरून जाऊ. ते सगळे ऐकल्यावर रामाने विचार केला कीं, हा समुद्र बराच लांब पसरलेला आहे कांहीं योजने पार करावे लागतील लंकेपर्यंत जाण्यासाठी, त्यासाठी एक अशी योजना शोधली पाहिजे कीं, ती सगळ्यांना उपयोगाची असेल. होड्यानी जाण्यासाठी आपल्याकडे पुरेशा होड्या नाहीत. त्या तयार करण्याचे साधन सामुग्री सुद्धा नाही. तेव्हां असे कांहीं योजले पाहिजे जे सर्वांना साजेसे असेल. होड्यांना शत्रू भोक पाडू शकेल कारण ते मायावी आहेत. म्हणून होड्या आणि तराफ हे अयोग्य ठरतात. शेवटी राम सांगतो, "मी सागराला विनंती करतो कीं, त्याने आम्हाला मदत करावी", त्यासाठी मी येथे ध्यान करत बसतो. नंतर तो व त्याचा भाऊ तेथे कुस गवतावर ध्यानासाठी बसतात. त्याने ध्यानाला सुरूवात केल्याबरोबर समुद्र तेथे अवतरतो व रामाला बोलतो, "अरे कौसल्यापुत्र, तुला काय पाहिजे ते सांग". तू माझा आप्त आहेस कारण आपण दोघे इक्ष्वाकू कुळातीलच आहोत".

राम त्याला बोलतो, "अहो नद्यांचे पती मला पैलतीरी जावयाचे आहे. माझ्या सैन्याला पलिकडे जाण्यासाठी मार्ग सांगा. मला लंकेतील रावणाचा नाश करावयाचा आहे. जर आपण मला मदत नाही केलीत तर मला माझ्या मंत्रानी तुला सुकवावे लागेल व मार्ग तयार करावा लागेल. त्यापेक्षा तू मदत केलीस तर ते जास्त योग्य होईल". असें बोलून राम व लक्ष्मण त्या वरुण देवाला नमस्कार करतात. वरुणदेव रामाला बोलतो, "मला माहीत आहे कीं, तुझे रावणाचे पारिपत्य करणे हे एक दैविक कार्य आहे परंतु, माझ्या कांहीं मर्यादा आहेत त्या तू समजून घे. मी तुझा मित्रच आहे". वरुणदेवाचे ते ऐकल्यावर रामाला समजते कीं, कोणत्याही प्रकारचा आतताईपणा करून चालणार नाही. पुढे समुद्र त्याला बोलतो, आता ऐक दशरथ पुत्रा, तुझ्या सैन्यात एक निष्णात यंत्रज्ञ (इंजिनीयर) आहे. त्याचे नांव आहे नल. तो त्वश्त्रीचा मुलगा आहे. जो मायासुरा सारखाच उत्तम कारागिर

आहे. तो कशाही वस्तु पासून गोष्टी घडवू शकतो. त्याला सांग कीं त्याने मंत्रून दगड, लाकूड असे जे पाण्यात टाकले जाईल ते मी उचलून धरीन. त्यातून एक साकव तयार होईल त्यावरून तुझे सैन्य बिनादिक्कत पैलतीरी जाऊ शकेल. तोंच फक्त असें काम करू शकतो तर त्याला तो साकव उभा करण्यास सांग. कितीही लांबवर जाणारा साकव, सेतू तो तयार करील. त्या सेतूला पुढे सगळे नलाचा सेतू म्हणून ओळखतील. जस जसें तो पाण्यात दगड टाकत होता तसतसे त्या खालील जमीन वर उचलली जात होती. अशारितीने एक सेतू तयार होतो.

त्यानंतर त्याप्रमाणें नल तो सेतू घडवतो व सागरातून बाहेर येतो. त्याचा आकार एकाद्या डोंगरासारखा होता. त्यावेळी रावणाचा भाऊ बिभीषण त्याच्या चार साथीदारांसह रामाला भेटण्यास येतो. राम त्याचे स्वागत करतो परंतु, सुग्रीवाचा विश्वास बसत नाही, तो समजतो कीं हा रावणाच्यासाठी हेरगिरी करण्यासाठी आला आहे. रामाचा मात्र त्याच्यावर भरवसा असतो व त्याचे राम चांगले स्वागत करतो. तेथे एक विधी होतो व त्यानुसार राम त्या रावणाच्या भावाला लंकेचा भावी अधिपती म्हणून मान्यता देतो. त्याशिवाय त्याला त्याचा सल्लागार म्हणून सुद्धा नेमतो. बिभीषण आता लक्ष्मणाचा सुद्धा मित्र होतो.

त्यानंतर रामाचे ते पशुसैन्य त्या सेतूवरून पलिकडे एका महिन्यात जाते. लंकेच्या द्वीपावर आल्यावर राम त्याच्या पशुसैन्यास लंकेत घुसून तेथे गोंधळ करण्यास सांगतो. ते पशुसैन्य लंकेच्या तटबंदी बाहेर येऊन ठेपते. त्यानंतर ते विविध पशुंचे सैन्य लंकेत गोंधळ घालण्यास सुरूवात करते. रावणाच्या राक्षस सैनिकांना अशा हल्ल्याची कल्पना नव्हती. ते कांहीं वेगळेच युद्ध होते. ती जनावरं, त्यात वानर, रेडे, अस्वलं आणि वृषभ असे भले मोठ्या आकाराचे सगळे प्राणी होते त्यांनी जी नासधूस करण्यास प्रारंभ केला तो आवरणे रावणाच्या सैन्यास केवळ अशक्य झाले होते. त्यात रावणाने त्याचे दोन हेर पाठवले होते त्यांची नांवे शुक व शरण, त्यांना बिभीषणाने पकडून दिले. त्यामुळे रावणाला समजत नव्हते अशा युद्धात कसे लढावयाचे? कारण अशा युद्धाची कल्पना आधीच्या युद्धनिती तज्ज्ञानी कधीही केली नव्हती. त्याच वेळी रामाची वानर सेना चहूबाजूनी लंकेच्या तटबंदीचा नाश करत होती. त्यांना रावणाला बाहेर काढावयाचे होते. म्हणजे राम व रावण

ह्यांच्यात द्वंद्व व्हावे असे योजलेले होते. त्यासाठी राम त्याचा मंत्री अंगद ह्याला रावणाच्या दरबारात बोलणी करण्यासाठी पाठवतो.

अशारितीने द्रौपदी हरण पर्वाचा एकविसावा भाग संपला.

# द्रौपदी हरण पर्व
## भाग बाविसावा

मार्कंडेय पुढे सांगतात, रावण त्या प्रकारच्या आक्रमणाची कल्पनासुद्धा करू शकत नव्हता. युद्धशास्त्रात अशाप्रकारच्या युद्धाचा साधा उल्लेख सुद्धा नव्हता. असें विलक्षण युद्ध होते ते, युधिष्ठीरा. त्या प्राण्यांनी लंकेतील खाद्य पदार्थांवर हल्ला केला होता. राम आणि लक्ष्मण तो सगळा प्रकार गमतीने पहात होते कारण त्यांनासुद्धा अशा लढाईची कल्पना नव्हती. सगळे अवचित घडत होते. रावणांने त्याच्या राज्यात युद्धशास्त्राच्या नियमांनुसार कित्येक आयुध योजलेली होती. त्यामुळें ते राज्य अजिंक्य रहाणार असें त्याला वाटत होते. माणसांचे हल्ले होतील असे गृहित धरून ते सगळे होते त्यात उंच तटबंदी होती. पहारे असलेले दरवाजे होते, त्या खाली चर केले होते असें कीं कोणी ते पार करून येणार नाही. त्या चरात नेहमी पाणी असे व त्यात हिंस्त्र मांसे, सुसरी असे खादाड प्राणी ठेवलेले होते. त्या तटबंदीवर खदीर लाकडेचे सूळे बसवलेले होते. दगड फेकण्याच्या गोफणी होत्या. आणि दगडाच्या राशीसुद्धा होत्या. पहार्यावर असलेल्या रखवालदारांकडे विषारी सापांनी भरलेल्या टोपल्या होत्या असे कीं, त्यातील सर्प ते येणार्या शत्रूवर फेकतील. त्याशिवाय नेहमीची हत्यारे जसे सोटे, गदा, शतघ्नी तोफा हेसुद्धा होते. त्याशिवाय हत्ती आणि घोडे त्यांच्या दिमतीस होते. असे सगळे असूनही त्या रानटी प्राण्यांनी लंकेची दुर्दशा केलेली होती. त्यामुळें बेजार झालेले रावणाचे सैन्य व त्यांचे सेनापती समजत नव्हते अशा हल्ल्याचे काय करावे. रामाने रावणासाठी एक संदेशक पाठवावा असें ठरले व त्याप्रमाणे अंगद ते काम करेल असें ठरले. अंगद लंकेत मुख्य खिंडी दरवाज्याने शिरला त्याला कोणी अडवले नाही तरी त्याच्या भोवती राक्षस सैनिक होते. अंगद दरबारात गेल्यावर तो रावणाला न लवता वंदन करतो, जसें एक संदेशक करतो. तेथे तो रावणाला रामाचा संदेश सांगतो. तो बोलतो, "मी रघूवंशाच्या राजाचा सेवक म्हणून आपल्याला भेटत आहे. माझा राजा कौसल राज्यावर राज्य करत असून त्याची ख्याती सर्वदूर पसरलेली आहे. त्यांनी आपल्याला प्रसंगानुरुप एक संदेश देण्यासाठी मला पाठवले आहे. आपण तो संदेश स्वीकारून त्याप्रमाणे आवश्यक कारवाई करावी अशी माझा राजा अपेक्षा करत आहे.

आतापर्यंत अनेक नगरे व गांवे आपल्या पापमय कारभारामुळें बरबाद झाली आहेत. त्यात भर म्हणून आणखीन एक महापाप तुम्ही केलेले आहे आमच्या राजाच्या पत्नीला पळवून. तिला जर निमुटपणे चांगल्या प्रकारे आमच्या हवाली केले नाही तर विनाकारण असंख्य निरपराध जीव मारले जाणार आहेत. त्यात बरेच राक्षस असतील जे तुम्हाला प्रिय आहेत. तुझ्या बळावर तू ह्याआधी अरण्यात रहाणार्या अनेक निरपराध ऋषींचा वध केला आहेस. त्याशिवाय बरेच राजे तू मारले आहेस. तू तुझी मर्यादा ओलांडून अनेक महिलांचे शाप घेतले आहेस. त्या सगळ्या गोष्टींच्या करता तुला शासन करण्याचे आमच्या राजाने निश्चित केले आहे. त्यासाठी माझ्या मंत्र्यांच्या सल्ल्याने आम्ही असा निर्णय घेतला आहे कीं आमचे राजे श्री राम तुला द्वंद्वाचे आव्हान देत आहेत. आमचे राजे तुला आव्हान देतात कीं, "अरे निशाचर असलेल्या राक्षसा, मी एक मनुष्य आहे तरी माझ्याशी लढण्याचे धाडस करून दाखवावे. नाहीतर सीता जी जनक राजाची कन्या आहे तिला अवैधपणे तू अटक करून ठेवले आहेस तिची सुटका करावी व तिला आमच्या हवाली करावे. जर ते तू केले नाहीस तर माझ्या राजाच्या बाणांचा तू शिकार होणार आहेस. जर तुला जगावयाचे असेल तर सीतेला मुक्त करण्याशिवाय तुझ्यासाठी दुसरा पर्याय नाही".

संदेशकाचे ते विधान रावणाला आवडले नाही. तो संतापून उठला. त्याबरोबर रावणाचे मनात काय आहे ते ओळखणारे चार राक्षस पुढे होतात व अंगदाला अटक करतात. जसें गिधाडं त्यांचे सावज पकडतात. त्या राक्षस सैनिकांनी अंगदाला जरी घट्ट पकडले होते तरी अंगदाची ताकद फार मोठी होती. तो त्यांना एक हिसडा मारतो व उंच उडी मारून तेथील एका उंच इमारतीच्या टपावर जाऊन बसतो. त्या हिसक्याने ते राक्षस सैनिक खाली जोरांने फेकले जातात. त्या उंचावरून तो खाली पडलेल्या राक्षसांची हालत पहातो व नंतर एका वाड्यावरून त्याच्या पलिकडल्या वाड्यावर असा उड्या मारत अंगद लंके बाहेर त्याची वाट पहात असलेल्या त्याच्या सोबत्यांना जाऊन मिळतो. तेथून ते सगळे कौसलच्या राजाला म्हणजे रामाला भेटतात. थोडी विश्रांती घेतल्यावर तो रामाला जे रावणाच्या दरबारात घडले ते सगळे सांगतो. राम अंगदाला विश्रांती घेण्याचा सल्ला देतो व पुढच्या कामाला लागतो. तो त्याचे वानर सोबती एकत्र बोलावतो व त्यांना सांगतो कीं, जर सगळ्या महाबली वानरांनी जोर केला तर लंकेच्या भोवती जी भिंत आहे ती फोडता

येईल. त्या कामात हनुमान त्याच्या पित्याला पुन्हा मदतीला बोलावतो व वायूदेव त्याला मदत करण्यासाठी आश्वासन देतो. त्या प्रमाणे त्या वानरांना वायूदेवाच्या मदतीने प्रचंड जोर करून ती भिंत पाडण्याचे ठरते. त्याच वेळी बिभीषण, लक्ष्मण आणि अस्वलांचा राजा असें त्यांच्या फौजा घेऊन लंकेच्या दक्षिणेकडील दरवाजा फोडतात. जो फोडणे अशक्य समजले जात होते. उत्तर आणि दक्षिण दिशांचे तट तुटल्यानंतर राम त्याच्या अगणित वानर फौजां घेऊन लंकेच्या आतल्या भागात घुसतो. त्यांच्या मदतीला प्रचंड आकाराची अस्वलांची फौज असते. अस्वलं त्यांच्या पुढच्या पायांनी जे मिळेल ते पकडून आपटून नासधूस करण्यास सुरूवात करतात. त्यांच्या प्रचंड आकारापुढे राक्षसांचे कांहीं चालत नव्हते. त्या धुमश्चक्रीमुळें जी माती हवेत उडत होती त्यामुळें सगळा परिसर अंधःकारमय झाला कारण त्या धूळीच्या वातावरणातून सूर्याचे किरण पृथ्वीवर येऊ शकत नव्हते. ती अस्वलं मोठ्याने किंचाळत होती जणू ते युद्धाच्या ललकार्या देत होते. लंकेत रहाणारे रहिवासी पहातात कीं, सर्वकडे वानरच वानर आणि अस्वलच अस्वल दिसत होती. त्यांच्या ओरडण्याने सगळा परिसर दुमदुमत होता. सगळीकडे मोडतोड होत होती आणि राक्षस त्यात कांही करू शकत नव्हते. रावण स्वतः संभ्रमात होता कारण अशा प्रकारच्या लढाईची त्याला माहिती नव्हती. मानव आणि राक्षस अशा लढाया त्याला माहित होत्या पण राक्षस आणि हिंस्त्रपशु अशी लढाई त्याला कधी झाल्याचे स्मरत नव्हते. अशा हल्ल्याला कसे परतवायचे ते रावणाच्या सेनानींना समजत नव्हते. राक्षस रहिवासी त्यांची बायका मुलं अवाक होऊन ते पहात होते. जर कांहीं केले नाही तर सगळी लंका धुळीला मिळेल असे दिसत होते. आधीच आधीच्या वानराने लंकेला आग लावली आहे त्यात हे आणखीन काय अरिष्ठ असा प्रश्न ते एकमेकांना विचारत होते. एवढ्या झपाट्याने ते होत होते कीं, काय करावे ते रावणाला समजत नव्हते. लंकेच्या रहिवाशांना समजत नव्हते कीं हे एक युद्ध आहे. त्यांना ती एक नैसर्गिक आपत्ती वाटत होती. परंतु, जसे वानरं त्यांच्या घराचे खांबे उखडून काढू लागले त्यांना लक्षात आले कीं हे एक प्रकारचे आक्रमण आहे. गोफणीने मारावयाचे दगड ते त्याच्या बलवान हातांने इतरत्र फेकून मोठी हानी करू लागले होते. त्यांना आटपणे शक्य नव्हते. सगळी लंका मोडून तोडून टाकली जात होती. शतघ्नी उचलून ते त्यातील चाका सकट फेकून देत होते. वानरं आकाराने प्रचंड

असल्याने त्यांना काबूत आणणे सोपे नव्हते. वानरं तेथे असलेले दगड उंच हवेत फेकत होते. ते दगड खाली येतांना जोरांने तटावर संरक्षण करण्यासाठी पहारा देणार्या रखवालदारांवर कोसळत होते. हजारांने ते तसे मरत होते. ते होत असतांना अनेक मायावी सिद्धी असलेले राक्षस त्याच्या तिरकमट्याने बाणांचा वर्षाव वानरांवर करू लागतात व त्या मारामुळें वानरं थोडी मागे वळतात. त्या जीवघेण्या मारा मुळें कांहीं वानरं कोसळून पडतात. दोनही बाजूंने हानि होत होती. आता त्याला खर्या युद्धाचे रुप आले होते. त्यानंतर वानरांची व राक्षसांची हातोहात लढाई सुरू झाली. ते एकमेकांचे केस पकडून त्यांना जमिनीवर आदळत होते. एकमेकांना नखांने ओरबाडत होते. ते दोघेही जोरजोराने ओरडून आपला राग व्यक्त करत होते. दोनही बाजूचे वीर मरून पडत होते तरी कोणीही हार मानायला तयार नव्हते. तेव्हां राम आणि लक्ष्मण त्याच्या मंतरलेल्या बाणांनी लंकेचे आकाश भरून टाकतात. त्या मारात असंख्य राक्षस मरून पडतात. लक्ष्मण त्याच्या भाल्याने नेम धरून राक्षसांचे सेनानी हेरून त्यांना टीपत होता. त्यामुळें राक्षसांना पुढील मार्गदर्शन होत नव्हते. त्या समरात राक्षसांचा पराभव झाल्याचे स्पष्ट झाल्यावर रामाने त्याच्या फौजांना आराम करण्यास सांगितले. त्या पहिल्या समरात रामाच्या फौजांनी लंकेच्या तटाच्या भिंती पूर्णपणे तोडून टाकल्या होत्या. त्यांमुळें ते संरक्षण आता राक्षसांना राहिले नव्हते आता रामाच्या बाणांच्या आवाक्यात सगळी लंका आली होती.

अशारितीने द्रौपदी हरण पर्वाचा बाविसावा भाग संपला.

# द्रौपदी हरण पर्व
## भाग तेविसावा

मार्कंडेय पुढे सांगतात, वानरांच्या फौजा आराम करत असतांना रावणाच्या बाजूने असलेले कांही छोटे राक्षस आणि पिशाच्च त्यांच्या मायावी सिद्धीच्या मदतीने वानरात घुसून त्यांना सतावण्यास सुरूवात करतात. त्यामध्ये परवण, पतन, जंभ, खार, क्रोधवस, परी, प्रारुज, अरुज, प्रघश आणि आणखीन कांही होते. ते अदृष्य असल्यामुळें वानरांना समजत नव्हते हे काय होत आहे. परंतु, बिभीषणाला त्या सगळ्या विद्या अवगत होत्या त्यांने त्या छोट्या राक्षसांना व पिशाच्चांना उघडे पाडले. ते दिसल्यावर वानरांनी त्यांचा फडशा पाडला. ते होत असतांना रावण त्याची खास योद्ध्यांची फौज घेऊन बाहेर आला. त्यात भयंकर दिसणारे राक्षस आणि पिशाच्च होते. रावणाला युद्ध शास्त्राचे उशनाने सांगितलेले नियम पाळून युद्ध करावयाचे असते. ते वानरांबरोबर शक्य नव्हते. त्यांने त्याच्या सैन्याची व्युह रचना केली होती त्या रचनेला त्यानी उशनाचेच नांव दिले होते. त्याशिवाय बृहस्पतीच्या नियमानुसार त्याचे सैन्य उभे होते. त्यानंतर रावण रामाला आव्हान देतो व त्यांच्यात द्वंद्व सुरू होते. त्याच वेळी लक्ष्मण इंद्रजिताशी, सुग्रीव विरुपाक्षाशी, बिभीषण प्रहस्ताशी, निखर्वत ताराशी, नल तुंडाशी, पनस प्रतुषाशी अशी द्वंद्व युद्धे सुरू होतात. लवकरच ती द्वंद्वे भयंकर रुप धारण करतात. देव आणि दानवांतील ते युद्ध कोणालाही घाबरवणारे होते. जुन्या काळातील अशा युद्धांची आठवण यावी असें ते होते. रावणांने लवकरच रामाला त्याच्या बाणांने घेरले होते. रामानेसुद्धा त्याच्या धारदार सुळे असलेल्या बाणांनी जबर जखमी केले होते. दुसरीकडे लक्ष्मणांने इंद्रजिताला त्याच्या कमजोर भागावर बाण मारून घायाळ केले होते. बिभीषणाने प्रहस्ताला मारावयाला सुरूवात केली. ते करतांना आपल्या नातेसंबंधाची ते दोघेही पर्वा करत नव्हते. त्या दोघांनी त्यांच्याकडील दैवी आयुधं वापरावयाला प्रारंभ केला होता. त्यामुळें तिनही जगातील चराचर चिंतेत पडली होती. रात्र झाल्यावर त्या काळातील रिवाजानुसार सगळे प्रतिस्पर्धी आराम करण्यासाठी जातात.

अशारितीने द्रौपदी हरण पर्व भाग तेविसावा संपला.

# द्रौपदी हरण पर्व

## भाग चोविसावा

मार्कंडेय पुढे सांगतात, दुसर्या दिवशी युद्ध पुन्हा सुरू झाले, प्रहस्त अचानक पुढे आला, त्याच्या हातातील गदा त्यांने जोरांने ओरडत बिभीषणाच्या पाठीत मारली. त्या फटक्याने दुसरा कोणी तात्काळ कोसळला असता परंतु, बिभीषणाला कांहींच झाले नाही. एकाद्या पहाडासारखा तो तसांच उभा होता. बिभीषण त्यानंतर एक धारदार पाते लावलेला भाला घेतो व तो मंतरून त्याच्या अंगावर फेकतो. त्यावर आकाशातील वीजेच्या वेगांने प्रहस्तचे डोके उडवतो. प्रहस्त एकाद्या प्रचंड वाढलेल्या वृक्षासारखा जमिनीवर कोसळतो. प्रहस्त कोसळल्याचे पाहून धुम्राक्ष ढगासारखा विशाल सुग्रीवावर चालून जातो. तो आणि त्याचे काळ्या ढगासारखे व ज्यांच्या आयाळी पसरलेल्या आहेत असे त्याचे सैनिक त्यां वानरावर चाल करून येत असल्याचे पाहून ते वानर घाबरून पळू लागतात. ते पाहून हनुमान तेथे उभा रहातो. त्याला आलेला पाहून वानरांच्या फौजांत त्वेष येतो व ते त्या राक्षसांवर तुटून पडतात. त्यानंतर एक धमासान युद्ध झाले. त्यावेळी राम आणि रावण एकमेकावर चाल करून जातात. त्या युद्धात इतके रक्त सांडले कीं, सगळी भूमी लालेलाल झाली होती. धुम्राक्ष सुग्रीवावर भाल्यांने मारा करत होता. त्यामुळें सुग्रीव थकल्यासारखा दिसू लागला ते पहाताच वायूपुत्र हनुमान धुम्राक्षाला धरतो. त्यांच्याच जुंपते. ती मारामारी पहाण्यासारखी होती. जणूकाय इंद्र आणि प्रल्हाद लढत आहेत. धुम्राक्ष त्याच्या गदेने मारत होता व हनुमान मोठी उपटलेली झाडे गदेच्या जागी वापरत होता. त्या मारामुळें धुम्राक्षाचा रथ व त्याचे घोडे सगळे मोडून जातात. त्यात तो रावणाचा महत्वाचा हस्तक मारला जातो. त्यामुळें वानरसेनेचा उत्साह वाढतो. हनुमानाने चढाई केल्यावर त्याच्या वानर साथीदारांचा जोर इतका वाढतो कीं राक्षस त्यांच्याशी लढू शकत नाहीत. ते लंकेच्या आतील भागात पळून जातात. अशा रितीने पळालेले राक्षस सैनिक रावणाला जाऊन सांगतात कीं युद्धाची दिशा रावणाच्या विरुद्ध झाली आहे. रावण एक दीर्घ श्वास घेतो व बोलतो कीं, आता कुंभकर्णाला उठवलेच पाहिजे. त्याप्रमाणें सगळे राक्षस कुंभकर्णाच्या काना जवळ वाद्यांचा आवाज करत रहातात ज्यामुळें तो जागा होतो.

कुंभकर्ण चांगला जागृत झाला आहे हे पाहिल्यावर रावण त्याला सांगतो कीं आता त्याची गरज आहे. कुंभकर्ण दशाननाला विचारतो, "काय कारणाने हे युद्ध होत आहे"? रावण सांगतो कीं त्याने रामाला अद्दल घडवण्यासाठी त्याची पत्नी सीता हिला पकडून ठेवले आहे व राम त्याच्या पशुसेनेने लंकेवर हल्ला करत आहे तिला मुक्त करण्यासाठी. त्या सेनेला आपले राक्षस सैन्य अडवू शकत नाही तर तुझी आता गरज आहे. कुंभकर्ण त्याचा विशाल देह घेऊन रणांगणावर येतो. तो पहातो कीं रामाच्या पशुसेनेने समुद्रावर एक लांब रुंद सेतू बनवला आहे व त्यावरून ते विविध प्रकारचे हिंस्त्र पशु लंकेत ओतल्यासारखे घुसत होते. सर्वदूर ते प्राणी गोंधळ घालत होते. नुकसान किती केले त्याची गणना नव्हती. त्याला रावण सांगतो कीं, "त्याचे श्रेष्ठ दर्जाचे लढवय्ये आतापर्यंत सगळे मारले गेले आहेत. प्रहस्त, धुम्राक्ष अशी सगळी नांवे तो सांगतो. त्यासाठी आता तुला उठवत आहे. असें रावण कुंभकर्णाला सांगतो . फक्त तूच आता रामाला मारू शकतोस. म्हणून तू तुझा लढण्याचा पोषाख घालून तयार हो. दुशनाचे दोन धाकटे भाऊ वज्रवेग आणि प्रोमथीन तुला मदत करतील". ते ऐकल्यावर परिस्थितीची कल्पना कुंभकर्णाला येते व तो लढण्यासाठी तयार होतो. रावण वज्रवेगाला व प्रोमथीनला पुढे काय करावयाचे त्याची पूर्ण कल्पना देतो. ते दोघे भाऊ आज्ञेचे पालन करण्यासाठी सज्ज होतात.

अशारितीने द्रौपदी हरण पर्वाचा तेविसावा भाग संपला.

# द्रौपदी हरण पर्व
## भाग चोविसावा

मार्कंडेय सांगत असतात, कुंभकर्ण लढण्यासाठी निघतो. त्याच्याबरोबर त्याचे साथीदार असतात. लवकरच तो, ती विजयी वानरसेना त्याच्या समोर उभी पहातो. तो प्रथम रामाला त्यात शोधण्याचा प्रयास करत असतो. त्याला तेथे सुमित्राचा मुलगा दिसतो. त्याच्या हातात धनुष्य बाण असतात. त्याला आलेला पहाताच ते वानर त्याच्या जवळ जाऊ लागतात. त्याला गराडा घालतात. त्यानंतर ती वानरं त्याला हातातील झाडांनी मारण्यास सुरूवात करतात. काही त्याच्या अगावर चढून त्याला नखांनी ओरबडण्यास सुरूवात करतात. त्यांच्यात युद्ध सुरू होते. लवकरच ते कुंभकर्णाला जेरीस आणतात. त्यांच्या लढण्याच्या तर्हा निराळ्या होत्या. परंतु, कुंभकर्ण त्याने फारसा विचलित झालेला नसतो तो उलट त्या वानरांच्या चाळ्यामुळें हसू लागतो. त्याचे ते हसणे सुद्धा विचित्र व सातमजली होते. त्यानंतर तो रावणाचा भाऊ त्या वानरांना पकडून खाऊ लागतो. त्याने त्यात कांही महत्वाचे वानर खाल्ले. त्यात चल, चंडचल, वज्रबाहू होते. त्यामुळें आता वानर घाबरून कुंभकर्णापासून दूर जाऊ लागले. ते मोठ मोठ्याने किंचाळू लागले. वानरांचे ते ओरडणे ऐकल्याने त्यांची राजा सुग्रीव त्यांच्या मदतीसाठी तेथे जातो. कुंभकर्णाच्या डोक्यावर साल वृक्षाचा फटका मारतो. परंतु, त्या फटक्याने कुंभकर्णामिध्यें कांहीं बदल होत नाही. त्यानंतर मात्र तो कुंभकर्ण त्याचे हात लांब करून सुग्रीवाला धरतो. जणूकाय आता तो त्याला खाणार असें वाटत होते. ते पाहून लक्ष्मण त्याच्या मदतीला जातो. त्याच्यावर जवळून तीक्ष्ण धार असलेल्या सोनेरी बाणांची वर्षाव करतो. ते धारदार बाण कुंभकर्णाच्या चिलखताला भेदून आत त्याच्या शरीरात घुसतात. कांहीं बाण त्याच्या अंगातून आरपार जातात व जमिनीत घुसतात. त्यामुळें तेथे कुंभकर्णाचे रक्त सांडते. कुंभकर्ण सुग्रीवाला टाकतो व लक्ष्मणाकडे त्याचा मोर्चा वळवतो. तेव्हां मोठ्या शिताफीने लक्ष्मण त्याचे वर केलेले हात छाटून टाकतो. परंतु. त्याचे दोन हात छाटल्यावर त्याला नवीन आणखीन हात तेथे येतात. लक्ष्मण ते नवीन आलेले हातसुद्धा त्वरित छाटत रहातो. त्याबरोबर कुंभकर्ण त्याचा आकार बदलू लागतो व ते भयंकर होत असते. जणू

काय त्याच्या आकार बदलण्याला कांहींच मर्यादा नव्हती. त्याला अनेक पाय फुटत असतात व लक्ष्मण तेसुद्धा छाटत असतो. कुंभकर्णाचे ते थांबत नाही असें पाहिल्यावर लक्ष्मण ब्रह्मास्त्र काढतो व ते कुंभकर्णावर फेकतो . त्याच्या आघाताने अखेरीस कुंभकर्णाचा देह जो एकाद्या प्रचंड वृक्षासारखा झाला होता कोसळतो. असुर राजा वृत्राची आठवण त्यावेळी ते युद्ध पहाणार्या ऋषींना झाली. कुंभकर्ण त्या ब्रह्मास्त्राने मेला. कुंभकर्ण मेल्याचे पाहून राक्षस सेना घाबरून इतस्ततः पळू लागली. राक्षस पळत आहेत हे पाहून दुशनाचा धाकटा भाऊ लक्ष्मणाच्या अंगावर चाल करून जातो. परंतु, त्याच्या पंख असलेल्या मंतरलेल्या बाणांने तो दोनही भाऊ वज्रवेगा व प्रोमथीन ह्यांच्यावर वार करतो, त्यांच्यात भीषण युद्ध होते. ते पहाणार्यांच्या अगावर शहारे उठत होते. अखेरीस लक्ष्मण त्यांना आवरतो. त्याच्या बाणांच्या वर्षावापुढे त्या दोघांचे कांहींच चालत नाही. ते युद्ध थोडाकाळ चालले. त्याप्रसंगी हनुमान एक मोठे टेकाड उचलतो व लक्ष्मणाच्या मदतीला धावतो. त्या टेकाड्याच्या फटक्याने वज्रवेगा मरतो. नल एक मोठा दगड उचलून चाल करून जातो. त्या दगडाखाली तो प्रोमथीनला चिरडून मारून टाकतो. अशारितीने रामाचे सैन्य व रावणाचे सैन्य ह्यात लढाई जारी होती. ते युद्धा त्यांच्या मृत्यूमुळें थांबेल असें वाटत होते परंतु प्रत्यक्षात उलट झाले. ते युद्ध आणखीन भडकले. त्या समरात वानर सेना व रावणाची राक्षससेना ह्यांची फार मोठी जीवित हानी होत होती, त्यात राक्षसांची हानी जास्त होती.

अशारितीने द्रौपदी हरण पर्वाचा चोविसावा भाग संपला.

# द्रौपदी हरण पर्व

## भाग पंचविसावा

मार्कंडेय पुढे सांगत असतात, रावणाला समजते कीं त्याचा भाऊ कुंभकर्ण युध्यात कामी आला, त्यावर तो राक्षस राजा त्याच्या मुलाला बोलावतो व सांगतो, "अरे शत्रूंचा नाश करणार्या माझ्या मुलां, आता तू जाऊन रामाचा वध करावयाचा आहेस. तुझ्यामुळें मी इंद्राला हरवू शकलो होतो म्हणून, तुझे नांव इंद्रजित आहे. तुझ्यात अदृष्य होण्याची सिद्धी आहे, म्हणून तू रामाला मारू शकशिल. तुझ्या आयुधांपुढे तो टिकणार नाहीत. तुझे साथी त्यांच्याबद्दल मी काय सांगू. जे प्रहस्ताला व कुंभकर्णाला जमले नाही ते आता तुला साध्य करावयाचे आहे. तुझ्या धारदार शस्त्रांनी तू माझ्या शत्रूचा नाश करणार आहेस. तसे करून तू माझ्या आनंदात भर घालणार आहेस असें मी समजतो. पूर्वी तू वसवाला पराभूत करून जसे साध्य केलेस तसे आता तुला पुन्हा करावयाचे आहे". त्या बोलण्याला आज्ञा मानून त्याचा मुलगा इंद्रजित म्हणाला, "जशी आपली आज्ञा". तो ताबडतोब त्याच्या रथात चढतो आणि युद्धभूमीकडे निघतो. युद्धभूमीवर तो स्वतःचे नांव जाहिर करतो मोठ्याने ओरडून. प्रथम तो लक्ष्मणाला द्वंद्वाचे आव्हान देतो. त्याबरोबर लक्ष्मण ते आव्हान स्वीकारतो व त्याच्याशी लढण्यासाठी त्याचे धनुष्य बाण घेऊन त्याच्या समोर जातो. आपल्या प्रतिस्पर्धकाच्या मनात भिती निर्माण करण्यासाठी लक्ष्मण त्याच्या धनुष्याचे दोर त्याच्या मनगटाला बसवलेल्या चामड्याच्या पट्ट्यावर मारत त्याचा आवाज काढतो, ज्यामुळें इंद्रजिताला भिती वाटावी. त्यानंतर जे द्वंद्व त्या दोघा योद्ध्यांत झाले त्याचे काय वर्णन करावे. दोघेही आपापल्या धनुर्विद्येतील कौशल्य पणाला लावून एकमेकाला पराभूत करण्याचा आटोकाट प्रयत्न करत होते. दोघेही दैविक आयुधांचा उपयोग करण्यात प्रवीण होते. ते द्वंद्व भयंकर होते. परंतु, लवकरच रावणाच्या मुलाला समजले कीं, तो लक्ष्मणाला बाद करू शकणार नाही, तो त्याची सगळी शक्ती पणाला लावतो. त्याप्रमाणे इंद्रजित लक्ष्मणावर विविध प्रकारचे भाले फेकून मारू लागतो. परंतु, लक्ष्मण त्याच्या बाणांनी त्या भाल्यांचे तुकडे करत होता. त्यामुळें त्यांचा कांहींही परिणाम त्याच्यावर होत नव्हता. ते द्वंद्व चालू असतांना वालीचा मुलगा अंगद एक भले मोठे साल वृक्षाचे झाड उपटून काढतो

व ते इंद्रजितावर फेकतो. त्या इंद्रजिताच्या डोक्याला लागते. त्या फटक्याने न डगमगता इंद्रजित त्याच्या तलवारीने अंगादावर वार करतो. परंतु, लक्ष्मण ती तलवार त्याच्या तलवारीने तोडून टाकतो. रावणाचा मुलगा तशांने माघार घेणार्यापैकी नव्हता, तो गदा उचलतो. त्या गदेच्या फटक्याने अंगदाला कांहींच होत नाही परंतु, तो एक साल वृक्षाचा जाडजूड आकाराचा बुंधा रावणाच्या मुलावर मारतो. त्या फटक्याने इंद्रजिताचा रथ व घोडे दोनही नाकाम होतात. तो रथातून उतरतो आणि त्याच्या मायावी सिद्धीने तो गायब होतो. राम त्यावेळी त्याच्या सैनिकांना मदत करण्यासाठी तेथे जातो परंतु, इंद्रजित त्याच्या बाणांने रामाला व लक्ष्मणाला मारत रहातो. कोठून बाण येत आहेत ते त्यांना समजत नव्हते. त्या बाणांच्या वर्षावामुळें राम व लक्ष्मण खूप जखमी होतात. परंतु, ते हटत नाहीत. वानरांच्या टोळ्या त्या न दिसणार्या रावणाच्या मुलाला शोधण्यासाठी आकाश पाताळ एक करतात. मोठ मोठे दगड ते फिकू लागतात असं कीं त्याच्या मार्यात तो येईल व मरेल पण तो त्यांना सापडत नव्हता. राक्षसांचा तो राजपुत्र आता आणखीनच मोठ्या प्रमाणात राम व लक्ष्मणावर बाणांचा भडीमार करू लागतो. अखेरीस त्या बाणांच्या मुळें ज्या जखमा झाल्या होत्या त्या सहन न झाल्यामुळें ते दोघे वीर मृच्छित होऊन जमिनीवर पडतात. जणूकाय सूर्य व चंद्र पडले आहेत.

अशारितीने द्रौपदी हरण पर्वाचा पंचविसावा भाग संपला.

## द्रौपदी हरण पर्व

## भाग सव्विसावा

मार्कंडेय पुढे सांग असतात, त्या दोघांना मृच्छित होऊन पडलेले पहाताच इंद्रजित पुन्हा दृष्य होतो व त्यांचे हात आणि पाय बाणांच्या जाळीने करकचून बांधतो. ती धनुर्विद्या त्याला आशिर्वादात मिळाली होती. ते असे दिसत होते जणूकाय दोन गरूड बाणांच्या पिंजर्यात अटक झाले आहेत. त्यांच्या भोवती सुग्रीवाचे वानर सैन्य उभे होते त्यांना कळत नव्हते आता काय करावयाचे. त्यात उभे होते शुशेना, मैंद, द्विंद, कुमुद, अंगद, हनुमान नील, तारा आणि नल. तेवढ्यात तेथे दुसरीकडील लढाई उरकून बिभीषण येतो. तो त्याच्या प्रज्ञा नांवाच्या आयुधाच्या मदतीने राम व लक्ष्मण ह्यांना शुद्धीवर आणतो. सुग्रीव त्यांच्या अंगात घुसलेले शर बाहेर काढतो. विशल्याचा (हि एक आयुर्वैदिक औषधी आहे, ती आजसुद्धा जखमा भरण्यासाठी बंगाल प्रांतात वापरतात) लेप त्या जखमांवर लावला जातो. त्यामुळें त्या जखमा लवकर बर्या होतात. त्याबरोबर मंत्रोत्च्चारण केले जातात. त्यामुळें ते शुद्धीवर येतात. जखमांना उतारा मिळाल्यावर ते दोघे वीर उठून बसतात. त्याचा थकवा आणि वेदना नाहीशा झाल्या होत्या. रामाला सुखरूप आहे हे पाहून बिभीषण त्याला बोलतो, "अहो शत्रुघ्न, गुह्यकांच्या राजाच्या आदेशानुसार एक गुह्यक (गुह्यक हे देव आणि गंधर्व ह्यांच्या मधल्या श्रेणीचे दैवी शक्ती असतात, ते शंकराचे पुजक असतात.) शुभ्र पर्वतीवरून (गंधमादन पर्वत) एक दिव्य जल घेऊन आलेले आहेत. ते साक्षात कुबेरांनी पाठवलेले आहे. ते जल आपण तसेच कोणीही डोळ्यांना लावले कीं सगळ्या अदृष्य गोष्टी तुम्ही पाहू शकाल. ते ऐकून राम व लक्ष्मण ते प्रथम स्वतःच्या डोळ्यांना लावतात व नंतर तो त्याच्या खास मदतनीसांना, जसे सुग्रीव, जंबुवन, हनुमान, अंगद, मैंद, द्विंद, नील, नल वगैरे सगळ्यांच्या डोळ्यांना लावण्यास देतो. त्यामुळे असा प्रकार करणे राक्षसांना ह्यापुढे शक्य होणार नाही. ते पाणी डोळ्यांना लावल्या बरोबर सगळे लपलेले राक्षस त्यांना दिसू लागतात.

मार्कंडेय पुढे सांगतात, अरे युधिष्ठीरा, त्या सगळ्याना ते लपलेले राक्षस दिसू लागल्यामुळें त्यांची लढण्याची क्षमता द्विगुणीत झाली. त्यासुमारास रावणाचा मुलगा त्याचा बापाला

त्याचे यश सांगण्यासाठी त्याच्याकडे गेला. ते सांगितल्यानंतर तुरंत तो त्याच्या रथात बसून पुन्हा रणांगणात येतो. बिभीषणाच्या सांगण्यानुसार लक्ष्मण त्या इंद्रजिताच्या जवळ जातो. इंद्रजित त्याचे दररोजचे धार्मिक विधी करत असतांना बिभीषणाच्या सांगण्यानुसार लक्ष्मण त्याच्यावर हल्ला करतो. त्या बरोबर इंद्रजितसुद्धा तसाच युद्धासाठी तयार होतो व त्यांचे युद्ध सुरू होते. ते युद्ध प्राचीन काळी होऊन गेलेल्या शक्र आणि प्रल्हादाच्या द्वंद्वाची आठवण करून देत होते. इंद्रजिताचा बाण लक्ष्मणाच्या वर्मावर बसतो. त्याप्रमाणे लक्ष्मणाचे बाणसुद्धा रावणाच्या मुलाला भेदतात. त्यामुळें संतापाच्या भरात इंद्रजित विषारी सापाचे बाण सुमित्राच्या मुलावर सोडतो. मार्कंडेय सांगत असतात, अरे युधिष्ठारा, ऐक पुढे काय झाले. लक्ष्मण ते डावलतो व रावणाच्या मुलांवर पंख असलेले मंतरलेले बाण सोडतो. त्याचा आघात इंद्रजिताला सहन होत नाही व तो कोसळतो. एका बाणाने त्याचा एक हात ज्यात त्यांने धनुष्य पकडले होते तो तुटतो. दुसर्या बाणांने त्याचा दुसरा हात तुटतो ज्यात त्यांने बाण धरलेले होते. तिसर्या बाणाने त्याचे शीर धडापासून वेगळे होते. ते छिन्नभिन्न झालेले इंद्रजिताचे शरीर पहावत नव्हते. त्यानंतर त्याच्या सारथ्याला मारतो. तसे झाल्यामुळें तो रथ, सारथी व इंद्रजिताशिवाय रावणाकडे जातो. रथात आपला मुलगा नाही हे पाहून तो जे समजावयाचे ते समजतो. तो दशानन मुलाच्या जाण्याने फार दुःखी होतो. ते पाहिल्यावर रावणाच्या मनात एक असुरी विचार येतो. तो ठरवतो कीं, तो ह्या युद्धाचे जे कारण आहे, जनकाची कन्या, तिलाच मारून टाकावे. तो विचार आल्याबरोबर तो त्याची समशेर घेऊन सीता जेथे होती त्या उपवानाकडे निघतो. रावणाचा एक मंत्री, अविंध्य, जो रामाला फितुर झाला होता तो ते पहातो व रावणाचा इरादा काय आहे ते समजतो. तो रावणाला बोलतो, "आपण क्षत्रिय अहात, आपण एका अशस्त्र स्त्रीला अशारितीने मारले तर महादेवाला ते रुचणार नाही, ह्याचा जरा विचार करावा. दुसरे असें कीं, तिच्या जीवनाचा खेळखंडोबा करून, ती आधीच आपण मारलेली आहे, आता देह मारण्याने काय साध्य होणार आहे? राम तुमचे राज्य नष्ट करणार आहे असे दिसते, तरी आपण रामालाच मारण्याचे कां नाहीं पहात? रामाला मारले म्हणजे ती सुद्धा मारल्यासारखेच होणार आहे तसेंच राम मारला गेला तर लंका तुमच्याकडे राहिल. तरी थोडे विवेकांने घ्या. सगळे देव त्याच्या बाजूने आहेत. आपण रामाशी लढण्यास कां

तयार होत नाही? इंद्राला आपण अनेक वेळा हरवले आहे". रावणाचा अहंकार चेतवण्याचे काम अविंध्यचा युक्तीवाद करतो व रावण रामाशी लढण्यास तयार होतो.

रावण त्याचा रथ तयार करण्याची आज्ञा देतो व लढण्याच्या तयारीला लागतो.

अशारितीने द्रौपदी हरण पर्वाचा सव्विसावा भाग संपला.

# द्रौपदी हरण पर्व

## भाग सत्ताविसावा

मार्कंडेय पुढे सांगतात, तो दशानन, इंद्रजिताच्या मृत्यूमुळें व्यथीत झालेला व तितकाच संतापलेला त्याच्या रत्नजडीत रथात बसतो. त्याच्याकडे विविध प्रकारची विध्वंसक आयुध होती. असा तयारीने तो रामावर चाल करून जातो. त्याआधी त्याला अनेक वानर योद्ध्यांशी लढावे लागते. त्यांना पराजित करत तो रामापर्यंत पोहोचतो. रावणाला वानरसेनेवर हल्ला करतांना मैंद आणि नील, नल व अंगद पहातात. त्यांबरोबर हनुमान, जंबुवंत रावणाला चौफेर घेरा घालून अडवतात. ते वानर आणि अस्वल सैनिक त्यांच्या हातात येईल त्या वृक्षाच्या मदतीने ते वृक्ष गदा आहेत अशाप्रकारे फिरवत रावणाच्या खास फौजेवर तुटून पडतात. रावणाच्या समक्ष त्याच्या खास सेनेचा ते पशुसैनिक चुराडा करतात. ते पाहून दशानान अधिक संतापतो. सरळ मार्गाने ते शक्य होणार नाही हे समजल्यावर रावण त्याची मायावी सिद्धी वापरण्याचे ठरवतो. त्या प्रमाणे रावण त्याच्या सारखे अनेक रावण (मायावी) तयार करतो व त्यांच्या मदतीने तो त्या पशु सैन्याशी लढू लागतो. त्या प्रकारामुळें राम व लक्ष्मण दोघेही गोंधळून जातात. त्यांना एकाच वेळी चहुबाजूला अनेक रावण दिसू लागतात. त्यातील नेमका खरा दशानन कोण हा प्रश्न उत्पन्न होतो. कितीतरी असें खोटे रावण त्या दोघांनी ठार मारले तरी नवीन रावण उत्पन्न होतच होते. त्या बरोबर रावण राम आणि लक्ष्मण ह्यांच्या सदृश्य अनेक खोटे राम आणि लक्ष्मण सुद्धा उत्पन्न करतो. ते सगळे पशुसैन्याशी लढत असतात. त्यामुळें वानर आणि अस्वल सेना गोंधळून जाते. ते पहाता राम लक्ष्मणाला सांगतो कीं प्रथम माझ्यासारख्या व तुझ्या सारख्या मायावी योद्ध्यांना तू मारून टाक. त्याप्रमाणे लक्ष्मण त्या खोट्या रामाला व लक्ष्मणांना ठार मारतो. त्यानंतर ते दोघे नकली रावणांचा फडशा पाडण्यास सुरूवात करतात. ते होत असतांना इंद्राचा सारथी मताली एका सूर्यासारख्या चमकणार्या रथातून रामाकडे येतो व इंद्राचा निरोप देतो. तो बोलतो, "अहो काकुतस्थ वंशाच्या राज्या, हा दैविक रथ शक्राने तुमच्यासाठी पाठवलेला आहे. ह्या रथातून इंद्राने असंख्य दानव आणि दैत्य मारले आहेत. म्हणून तुम्ही ह्या रथात या व मी तो चालवणार आहे. ह्यातून रावणाला

मारणे जास्त सोपे होईल. परंतु, त्या मायावी वातावरणात कोणाच्या बोलण्यावर विश्वास किती ठेवावयाचा ह्या संभ्रमात असलेला राम त्याच्या बोलण्याकडे दुर्लक्ष करतो. तेव्हां तेथे असलेले बिभीषण रामाला सांगतात कीं, हा खरा मताली, इंद्राचा सारथी आहे, त्याच्या बोलण्यावर विश्वास ठेवावयाला हरकत नाही. त्यानंतर राम त्या दिव्य रथात चढतो व रावणावर चालून जातो. ते दोघे एकमेकांवर चालून जातात, त्यावेळी फार मोठा हलकल्लोळ होतो. सगळी पृथ्वी हादरून निघते. स्वर्गातून ढोल नगारे वाचवले जाऊ लागतात. त्यांचा आवाज पृथ्वीवर येतो. त्यांच्या अटीतटीची लढाई सुरू होते. तशी लढाई आधी कधी झाल्याचे मला आठवत नाही, असें मार्कंडेय युधिष्ठीराला सांगतात. रावण एक भाला रामावर फेकतो ज्याचे वर्णन असें करतात कीं, तो इंद्राच्या वज्रासारखाच प्रभावी होता. त्याची ताकद ब्राह्मणाच्या शापा प्रमाणे होती. परंतु, राम त्याचे हवेमध्येच तुकडे करतो त्यामुळें, त्याचा परिणाम होत नाही. ते शस्त्र व्यर्थ जाते. ते पाहून रावणाला आता रामाची भिती वाटू लागते. त्यातून तो राक्षस लवकरच बाहेर येतो व त्याच्याकडील इतर आयुधांचा तो उपयोग करून लढाई चालू ठेवतो. त्यात अग्नीबाण, भाले, सुरूंग, कुर्हाडी, शतघ्नी वगैरे आयुध तो वापरत असतो. त्याच वेळी तो विविध मायावी दृष्य उत्पन्न करून रामाला घाबरवण्याचा प्रयत्न करत असतो ते वेगळे. त्या घाबरवणार्या मायावी दृष्यांमुळें वानरं बिचकत होती. त्यांच्या अंगावरील केस ताठ उभे रहात होते. ते सैरावैरा पळत होती. त्यावेळी काकुतस्थ वंशाच्या रामाने त्याच्या भात्यातून सोनेरी बाण काढून त्यावर ब्रह्मास्त्र मंत्र टाकून तो बाण रावणावर मारण्यास प्रारंभ केला. ते पाहून स्वर्गातील देव, गंधर्व आनंदाने उड्या मारू लागले. त्या ब्रह्मास्त्रामुळें त्यांचा राक्षस शत्रू निश्चितपणे मारला जाईल असें ते समजत होते. तो बाण राम रावणावर मारतो. त्याच्या फटक्यानें रावण त्याचा रथ व त्याबरोबर असलेला त्याचा सारथी सगळे आगीच्या भक्षस्थानी पडल्याचे दिसते. रावण मारला गेला असें ते सगळे स्वर्गीय देव समजतात व आनंद व्यक्त करू लागले होते. त्यात सगळे चरण, किन्नर, गंधर्व, देवांशी अनुकूल असणारे राक्षस, होते. सगळी पंचमहाभूते रावणापासून दूर झाली असे दिसले. रावणाच्या शरीराची वाफ झाली होती. त्यामुळें त्याची राखसुद्धा मिळण्यासारखी नव्हती.

अशारीतीने द्रौपदी हरण पर्वाचा सत्ताविसावा भाग संपला.

## द्रौपदी हरण पर्व भाग अठ्ठाविसावा

## मार्कंडेय रामायण अथवा सीता हरण आख्यान समाप्त

मार्कंडेय ऋषी सांगतात, रावणाचा वध अशारितीने केल्यानंतर राम व त्याचे सगळे सवंगडी आनंद साजरा करू लागले. रावणाचा वध केल्याबद्दल सगळे ऋषी, देव रामाची स्तुती करू लागतात. त्याला अनेक दुवा देऊ लागतात. ते पुन्हा पुन्हा "जय" असे बोलू लागतात. तो विजय व्यक्त करण्याचा रिवाज होता. रामावर स्वर्गातून कमळाच्या सुगंधी पाकळ्यांचा वर्षाव होऊ लागतो. अशारितीने रामाचे कौतुक केल्यावर ते सगळे आपापल्या ठिकाणी निघून जातात. आकाशात असें दिसत होते कीं, स्वर्गात मोठा उत्सव होत आहे. एका सोहळ्याने राम बिभीषणाला लंकेचा अधिपती म्हणून नेमतो. राम त्या लंकेच्या सभेत बसला आहे अशावेळी बिभीषण, अविंध्य आणि हनुमान सीतेला तेथे घेऊन येतात. त्यात बिभीषण पुढे असतो व सीता त्याच्या मागून चालत असते आणि अविंध्य व हनुमान तिच्या मागोमाग असें ते त्या सभेत रामापुढे येतात. त्यानंतर मोठ्या आदराने अविंध्य रामाला विनंती करतो कीं आपण आपल्या अर्धांगिनीचा पुन्हा स्वीकार करवा. तो बोलतो, "अहो काकुतस्थ कुळाचे राम, आपण आपल्या देवीसारख्या पत्नीचा जी जनक राजाची कन्या आहे स्वीकार करावा". ते ऐकल्यावर तो काकुतस्त वंशाचा राजा तिच्याकडे पहातो, सीतेच्या डोळ्यात आनंदाश्रू तो पहातो. तिचे केस विंचरलेले नव्हते, एकाद्या बैराग्या सारखी ती त्या जीर्ण मलिन वस्त्रात त्याच्यापुढे उभी होती. जणूकाय तिने मोठा अपराध केला आहे. त्याला तिच्याबद्दल प्रेमाचा उमाळा आला तरी एका राजाला जसे बोलावे लागते त्याप्रमाणे तो बोलतो, "अहो विदेह कन्या, आपण आता मुक्त अहात. आपल्याला जेथे जावयाचे आहे तेथे आपण जाऊ शकता. माझे कर्तव्य होते कीं मी आपल्याला मुक्त करावे व ते मी माझ्या मित्रांच्या सहाय्याने पूर्ण केले आहे. माझी पत्नी असल्यामुळें तुम्ही ह्या राक्षसांच्या कैदेत खितपत पडणे अप्रशस्थ होते. मी तुम्हाला त्रास देणार्या राक्षसांचे पारिपत्य केले आहे जसे आपल्याला अपेक्षित होते. जे मला माझ्या एका सेनापतीने, हनुमानाने सांगितले आहे. आपली ती इच्छा पूर्ण झाली आहे. परंतु, एका राजाला त्याची पत्नी जी कांहीकाळ शत्रूच्या ताब्यात राहिली आहे, पुन्हा पत्नी म्हणून

स्वीकारता येणार नाही कारण तसे प्रचलित नितीशास्त्र सांगते. आपण शुद्ध राहिला असाल अथवा नसाल, मी कोणत्याही शंकेला वाव देऊ शकत नाही. एका राजाच्या ह्या मर्यादाना आपण जाणता तेव्हां मला आपण समजून घ्यावे व आपल्याला इतरत्र जेथे जावयाचे असेल तेथे आपल्याला पोहोचवण्याचे काम मी माझ्या मंत्र्याकरवी करून देतो म्हणजे तेथे आपण सदैव सुरक्षित असाल". सीता ते ऐकून अवाक्क होते. तिच्या चेहर्यावरील लाली पार नाहीशी होते. ती गर्भगळीत होते. पुढे राम बोलतो, "आपण एकाद्या यज्ञात देण्यासाठी आणलेल्या लोण्याच्या गोळ्यासारख्या अहात ज्याला कदाचित कोणी कुत्रा चाटून गेला आहे. असे लोणी यज्ञात वापरता येत नाही तसेंच मी आपला स्वीकार करू शकत नाही". रामाचे ते कठोर बोलणे, ज्याची सीतेने कधीच अपेक्षा केली नव्हती, ऐकून ती अभागिनी खाली कोसळते. तिच्या सगळ्या रंगाचा बेरंग त्यामुळे झालेला होता. परंतु, राम ते बोलून निश्चल होता, त्याच्या चेहर्यावर कांहींच भावनां दिसत नव्हत्या. रामाचे ते उद्गार लक्ष्मणाला आवडत नाहीत. त्याला समजत नाही काय बोलावे. त्यावेळी आकाशातून चतुर्मुख ब्रह्मदेव रामाकडे उद्देशून बोलतात, त्यांच्या बरोबर शक्र, अग्नी, वायू, यम, वरुण हे सृष्टीचे कार्यकर्ते असे सगळे देव त्या ठिकाणी प्रकट होतात. त्यांबरोबर यक्षांचा राजा कुबेरसुद्धा तेथे अवतरतो. ते एकमुखाने सांगतात कीं, तुझी पत्नी शुद्ध आहे. तिचा अवमान करणे तुला शोभत नाही. त्यांच्या आवाजात सामील होतात ऋषी, त्यांच्या बरोबर रामाचे दिवंगत पिता दशरथ तेथे प्रकट होतात व त्याला विचार बदलण्याची आज्ञा करतात. आकाशातून गंधर्व उतरतात. त्यावेळी विदेहा, सीता, तिच्या पतिला बोलते, "मी तुला तुझ्या ह्या वागण्याबद्दल दोष देणार नाही. नितीशस्त्राच्या नियमांनुसार तुझे बोलणे मी मान्य करते. परंतु, ते नियम दोघांना सारखेच लागू असतात. वासनांचा प्रभाव सगळ्यांच्यावर होत असतो. तो निसर्गाचा स्वभाव आहे. जे माझ्या बद्दल आपण बोलता ते आपल्याला सुद्धा तितकेच लागू होत आहे. म्हणून जर आपल्याला वाटत असेल कीं मी भ्रष्ट झाली आहे तर आपण मला मारून टाकावे अशी माझी अंतिम इच्छा आहे. माझ्यातून ते पंचमहाभूत निघून जावेत. माझ्या सगळ्या जीवनात मी कधी कोणा पुरूषाचा विचार केलेला नाही. माझे कन्यादान आपल्याला केले आहे माझ्या पित्याने त्या प्रमाणेच मी आतापर्यंत राहिली आहे". सीतेच्या त्या बोलण्यानंतर आकाशवाणी झाली, ती ऐकल्यावर

सगळे वानर आणि अस्वलं आनंदीत झाली. तो वायूदेव रामाला हुकूम करतो कीं, ती त्याचीच पत्नी सदासर्वकाळ होती व आहे आणि पुढेसुद्धा असेल. सीता पवित्र आहे तिचा अव्हेर करून तू पाप करणार आहेस. म्हणून आता जास्त समय व्यर्थ न दवडता तुम्ही उभयता पुन्हा एकत्र येणेच सगळ्यांसाठी श्रेयस्कर ठरते. अशारितीने सृष्टीचे सगळे कार्यकर्ते, वायू, यम, अग्नी, इंद्र, वरूण त्यावर शिक्कामोर्तब करतात. ते बोलतात कीं, ते पांच प्रत्येक प्राणिमात्राच्या आत व बाहेर सदैव असतात व ते त्या प्राण्याचे सगळे कर्मभोग जाणत असतात (वायू, वरुण आणि अग्नी शरीरात असतात व इंद्र, यम बाहेर असतात). ते ग्वाही देतात की तुझी पत्नी पूर्णतया पवित्र आहे. ती एकाद्या राजर्षी सारखी तेथे रहात होती. रावणाचे तुझ्या बायकोला पळवून नेणे हे त्याच्या नाशाची व्यवस्था होती. कारण फक्त तूंच त्याचा नाश करू शकत होतास. म्हणून मिथीलाच्या राजकन्येला तुला स्वीकारावेच लागेल कारण, ते सुद्धा विधीलिखीत आहे. नलकुबेराच्या शापामुळें तो रावण कोणत्याची नाराज बाईला स्पर्श करू शकत नव्हता. जर तो तसे करील तर त्याच्या डोक्याचे शंभर तुकडे झाले असते. म्हणून तुझा संशय निराधार आहे. त्यासाठी तू सीतेला स्वीकारशिल. त्यानंतर रामाचे स्वर्गस्थ पिता दशरथ त्याला बोलतात, "मुला, तुझे कल्याण हो. मी तुला आदेश देतो कीं तू माझ्या सुनेला स्वीकारशिल. त्यातच आपल्या घराण्याचे भले आहे. त्यानंतर इंद्र व सांची जसें स्वर्गाचे राज्य पहातात तसें तू व सीता कौसलचे राज्य पहाणार अहात".

मार्कंडेय पुढे सांगतात, अशाप्रकारे पित्याचे ते बोलणे ऐकल्यावर राम त्या सगळ्या पितरांना लवून नमस्कार करतो व त्यांच्या आज्ञेचे पालन करण्याचे आश्वासन देतो. तो सगळ्या सभेला सांगतो कीं, त्याने सीतेचा पत्नी म्हणून स्वीकार केला आहे. त्यानंतर रितसरपणे सीता त्याच्या बाजूला येऊन बसते. त्यानंतर दशरथ त्याला सांगतात कीं, त्याचा वनवासाचा चौदा वर्षाचा काळखंड संपत आला आहे. म्हणून जमेल तितक्या लवकर त्यांने त्याच्या अयोध्येला प्रयाण करावे. त्यानंतर राम अविंध्यला एक आशिर्वाद देतो. त्यानंतर राम त्या पवित्र सदाचरणी राक्षस महिलेला जिचे नांव त्रिजता होते, भरपूर संपत्ती आणि सन्मान बहाल करतो. त्यानंतर ब्रह्मदेव आणि इंद्र आणि इतर दैविक शक्ती रामाला विचारतात कीं, "त्याला कोणता आशिर्वाद त्यांच्या कडून पाहिजे"? राम त्यांना

विनम्रपणे बोलतो कीं, "मला सदैव सद्बुद्धी द्यावी ज्यामुळें माझ्याकडून कधीही खोटे काम होणार नाही. माझ्या मनांत माझ्या शत्रूंबद्दलसुद्धा अनादराची वासना उत्पन्न होणार नाही इतके माझे मन शुद्ध रहावे, त्याशिवाय हे जे वानर व अस्वलं सैनिक युद्धात मेले त्यांना पुन्हा जीवंत करावे. ब्रह्मदेव ते सगळे खूषीने देतो. सगळे मेलेले वानर, अस्वलं व इतर पशु झोपेतून उठल्या सारखे हळू हळू उठून बसू लागतात. त्यानंतर सीता हनुमानाकडे पहात मोठ्या कौतुकांने त्याला आशिर्वाद देते, "जोवर रामाचे नांव ह्या दुनियेत अजरामर आहे तोवर तुला सुद्धा सगळे पुजतील. त्याशिवाय स्वर्गीय पदार्थ तुला सदैव माझ्या कृपेमुळें मिळत रहातील".

त्या समारोहा नंतर सगळे देव आपापल्या घरी निघून जातात. रामाचे सीतेशी झालेले मिलन पाहून शक्रचा सारथी मिताली अतिशय आनंदी होतो. तो सगळ्या मित्रांच्या समक्ष बोलतो, "अरे सामर्थ्यवान राजा, तुझ्या मुळें स्वर्गातील सगळे यक्ष, गंधर्व, ऋषी, असुर, पनंग, नाग, आणि पृथ्वीवरील माणसे मोठ्या अरिष्ठातून मुक्त झाली आहेत. म्हणून ते सगळे तुझ्यावर प्रसंन्न झाले आहेत. तुला कोणत्याही यज्ञात कधीही कोठलीही बाधा होणार नाही". असें बोलून तो त्याच्या दिव्य रथातून स्वर्गाकडे निघून जातो. रामसुद्धा आता लंकेचा निरोप घेण्याचे ठरवतो. त्याच्या बरोबर आलेले सगळे पशु त्याच्या बरोबर निघण्याची तयारी करतात. जाण्या आधी लंकेचा कारभार तो बिभीषणाच्या हवाली करतो व त्याला लंकेचा अधिपती म्हणून जाहिर करतो. बिभीषण रामाला रावणाच उडणारा पुष्पक रथ अर्पण करतो. राम त्यात सीतेसह बसून निघतो. तेथून तो त्याच्या किश्कींदा नगरी बाहेरील पहाडावरील निवासस्थानी येऊन पोहोचतो. तेथून तो त्याच्या सगळ्या वानर सेनेचा व अस्वल सेनेचा अंतिम निरोप घेतो. त्यावेळी राम त्या सगळ्यांना लंकेतून मिळालेली अमाप संपत्ती वाटून टाकतो. सगळे गेल्यानंतर राम त्याच्या खास सोबत्यां बरोबर म्हणजे बिभीषण, सुग्रीव, हनुमान, अंगद किश्कींदा नगरात येतात व तेथे तो अंगदाला त्याचा प्रतिनिधी म्हणून नेमतो. त्यानंतर तो व सीता त्या सगळ्या परिसरात फिरतात व राम तिला तेथे ते कसे रहात होते वगैरे गोष्टींची माहिती स्वतः सांगतो. त्यामध्ये त्याला लक्ष्मण मदत करतो. अशारितीने ते तिघे एकत्रपणे कांहीं काळ मजेत व्यतीत करतात. त्यानंतर ते पुष्पक रथाने अयोध्येकडे रवाना होतात. त्यावेळी त्यांच्या

बरोबर हनुमान असतो. कारण सुग्रीवाने रामाला हनुमान दान केलेला असतो. तेथे हनुमान रामाचा प्रतिनिधी ह्या नात्यांने अयोध्येत जातो व राम त्याच्या परिवारासह तेथे नगराच्या बाहेर आले असल्याचे सांगतो. तेथे तो पहातो कीं, रामाचा भाऊ जो राज्य कारभार करण्यासाठी नेमला होता तो संन्याशा सारखा रहात आहे व राजगादीवर त्यांने रामाच्या पादुका ठेवल्या आहेत, त्यावरून हनुमान भरताचा उद्देश समजतो व त्याला त्याचा भाऊ वनवास पूर्ण करून अयोध्ये बाहेर आला असल्याचे सांगतो. रामाचे स्वागत करण्यासाठी भरत, शत्रुघ्न असें सगळे तेथे निघतात. राम त्याच्या भावाला तशा बैराग्याच्या अवस्थेत पाहून व्यथित होतो. दोघे आलिंगन देतात. सीतेला पाहून त्या दोनही भावांना परमानंद झालेला असतो. त्यानंतर भरत त्याचे राज्य चालवण्याचे अधिकार रामाला देतो. तेथे ऋषी वसिष्ठ आणि वामदेव त्यांची प्रतिक्षा करत असतात ते भेटतात. रामाचा व सीतेची योग्य मुहूर्त पाहून राज्याभिषेक होतो. त्यानंतर राम त्याच्या परम मित्राचा सुग्रीवाला निरोप देतो. पुलस्त्य घराचा कुलदिपक बिभीषण कांहीं काल तेथे राहून त्याच्या लंकेला निघतो. त्या मित्रांचा निरोप देतांना रामाला गहीवरून येते. त्यावेळीच राम त्या पुष्पक रथाची पुजा करून ते विश्रावणाला परत करतो कारण ते त्याचेच होते. ते सगळे विधी संपन्न झाल्यानंतर कांही काळांनी राम व सीता एकत्रपणे गौतमी नदीच्या किनारी दहा अश्वयज्ञ करतात ज्याचे पौरोहित्य ऋषी वसिष्ठ स्वतः करतात. त्या प्रसंगी राम ब्राह्मणांना अनेक भेटी व दानं करतो. त्याच्या यज्ञात कोणताही व्यत्यय येत नाही कारण तसा आशिर्वाद त्याला देवतांनी दिला होता. त्यानंतर ते सगळे रघूवंशी तेथे मोठ्या आनंदात त्यांचे जीवन घालवतात.

अशारितीने द्रौपदी हरण पर्वाचा अठ्ठाविसावा भाग संपला.

**– मार्कंडेय रामायण अथवा सीता हरण आख्यान समाप्त –**

## द्रौपदी हरण पर्व

## भाग एकोणतिसावा

मार्कंडेय पुढे सांगतात. "अरे शूर योद्ध्या युधिष्ठीरा, अशारितीने प्राचीन काळी, सीतेचे हरण रावणाने केले होते व त्यामुळें त्याचा नाश झाला होता. तेसुद्धा अरण्यात रहातांनाच झाले होते. म्हणून तू सतत दुःख करत बसू नकोस. तू क्षत्रिय आहेस ह्याचे भान ठेवत जा. क्षत्रियांना असे दुःख करणे शोभत नाही. लढण्याची परंपरा असलेले सतत मार्ग शोधत असतात. रडत बसत नाहीत. ज्या मार्गाने तू जात आहेस त्याच मार्गाने इंद्र आणि असुरानासुद्धा जावे लागते. अशा प्रकारचे अरिष्ट त्यांच्यावर बेतल्यामुळेंच ते इंद्र, मरुताच्या मदतीने वृत्राचा नाश करतात. अदृष्य रहाणारी नमुची व लंबजिव्हा राक्षस त्यांने मारले होते. ज्यांने चांगले साथीदार जमवले आहेत तो कधीही अशा समरात यशस्वी होतो. असे कोणते शत्रू आहेत ज्याना तू घाबरावे जेव्हां तुझ्याकडे धनंजय आणि वृकोदर आहेत? त्याशिवाय माद्रीची मुलं आहेत. ते चौघे सगळे सैन्य मारू शकतात हे तू जाणत असतांना तुला असें रडत बसणे शोभत नाही. तू केव्हां तुझ्या दैववादी प्रवृत्तीतून बाहेर येणार? आताच तू पाहिलेस कीं, कृष्णाला त्या आततायी जयद्रथाच्या तावडीतून भिम व अर्जुन कसे लिलया घेऊन आले. त्या मानाने विदेहीला तशी कांहीं कोणाही माणसाची मदत नव्हती तरी तिची सुटका रामाने कशी केली ते आपण पाहिले. तसे पाहिले तर रामाचे मदतनीस पशु होते म्हणून मी तसे बोललो. माणसे नाही तर पशु त्यांने मदतीला घेतले ह्यांत त्याची कसब तू समजून घे, तो माणसे मदतीला नाहीत म्हणून अडून बसला नाही. जर निर्धार खंबीर असेल तर तो मार्ग काढतोच. राजा रडत बसला तर प्रजेने काय करावे"?

वैशंपायन पुढे सांगतात, अशारितीने युधिष्ठीराचे मार्कंडेय सांत्वन करतात. त्यानंतर युधिष्ठीर शांत होतो व मार्कंडेयांना पुढचा प्रश्न विचारतो.

– महाभारत खंड सोळावा समाप्त -

## भाषांतरकाराचा परिचय -

मी अशोक कोठारे, माझ्या वयाची ७६ वर्षे झाली आहेत. गेली कित्येक वर्षे मी विविध प्राचीन ग्रथांचा एक कुतुहल म्हणून अभ्यास करत असतो. त्या काळात मला समजले कीं, आपल्या प्राचीन शिक्षण पद्धतीत चार ग्रंथांचे महत्व होते. त्यात मनुस्मृती, महाभारत, रामायण आणि योगवासिष्ठ हे महत्वाचे होते. आपल्या पूर्वीच्या शिक्षण पद्धतीत ह्या ग्रंथांचे वाचन करण्याची प्रथा होती. नंतरच्या काळात इंग्रजांनी त्यांची शिक्षण पद्धती येथे रुजवली व आपली पाठशाळा पद्धती संपुष्टात आली. आपल्या शिक्षण पद्धतीत अक्षर ओळख, नितीशास्त्र, गणित एवढेच शिकवले जात. त्याशिवाय शिकतांना घोकंपट्टी करण्याचे महत्व होते. ते सगळे आता इतिहास जमा झालेले असले तरी त्याची उपयुक्तता नाकारता येणार नाही. म्हणून एक प्रयत्न मी करावयाचे ठरवले. मी एक अतिसामान्य अभ्यासक आहे तरी व्यासंग मोठा आहे. त्या प्रमाणे, मनुस्मृती प्रथम ई-साहित्यच्या माध्यामाने तुम्हाला दिली. त्याचे चांगले स्वागत झाले आहे. त्यामुळें माझा उत्साह वाढला आणि महाभारताचे, 'जसे आहे तसे', अशाप्रकारचे भाषांतर आता देत आहे. त्याचे साधारणपणे ४० खंड होणार आहेत. संपूर्ण महाभारत येण्यास बराच अवधी लागणार आहे. इतर मंडळी महाभारताचे भाषांतर करतांना त्याचा आकार आटोपशीर करण्यासाठी त्यातील शिकवणूकीचा भाग व्यर्थ समजून सोडून केवळ कथाभागाचेच भाषांतर करतात त्यामुळे एक शैक्षणिक पुस्तक म्हणून असें भाषांतर रहात नाही. मी सगळ्या नितीशास्त्र शिकवणार्या कथा जशाच्या तशा ठेवल्या आहेत. कांहीं जागी विषय समजणे सोपे व्हावे म्हणून मी टीपा दिल्या आहेत कांही कंसात दिल्या आहेत, कारण मला माहित आहे किं, ह्याचे वाचन करणारे मराठी भाषिक सामान्य आहेत. कोणी विद्वान वाचक असेल तर त्याला त्या टीपांची गरज वाटणार नाही.

आता थोडे माझ्याबद्दल लिहीत आहे. तसे पाहता अशा कामात कोणी संस्कृतचा प्राध्यापक असला पाहिजे असें कोणाला वाटेल मग मी एक इंजिनीअर कां हे काम करत आहे असा प्रश्न पडेल पण त्याचे उत्तर असें आहे किं, एवढे मोठे काम करण्यास कोणी

तयार होत नाही आणि ते सुद्धा फुकट करणारा विद्वान मला मिळाला नाही. ज्या कोणाला मी त्याचे महत्व सांगितले ते सगळे त्या कामासाठी भरपूर मानधन मागू लागले मग मी ठरवले आपणच ते करावे. गेली २५ वर्षे मी निवृत्त जीवन जगत आहे, बराच समय माझ्याकडे आहे मग आपणच हे करावे अशा विचारांने ते करावयास घेतले व प्रथम मनुस्मृती दिली आता महाभारत देण्याचा प्रयत्न चालू आहे. त्यासाठी दैवयोगांने ई-साहित्य सारख्या ध्येयवादी मंडळींची साथ मिळाल्यामुळें माझा उत्साह द्विगुणित झाला.

१९८५ पर्यंत मी माझा उद्योग करत होतो. कारखाना भाईदरला व रहाणार चेंबूरला त्यामुळें येण्याजाण्याची दगदग माझ्या प्रकृतीला झेपली नाही व मी हृदयाच्या झटक्याने आजारी झालो. त्यानंतर डॉक्टराच्या सल्ल्याने मी सगळे उद्योग बंद करून घरात बसलो. थोडी बचत केली होती त्याच्या जोरावर आज मी माझे साधे जीवन जगत आहे. पैशापाठी लागण्याचा स्वभाव माझा मुळातच नाही. सुरुवातीपासून वाचनाचा छंद होता त्यात कथा कादंबर्या वाचण्यात रस नव्हता. मी कांहीं माहिती देणारे ग्रंथच वाचत असें. त्यामुळें अनेक विषयांचा व्यासंग झाला त्यात ही चार पुस्तक पुढच्या पिढीस विशेष उपयुक्त ठरतील असे मला जाणवू लागले तेव्हा त्यांची भाषांतरे करण्याचे ठरवले. त्या व्यतिरीक्त माझे लिखाण शेती विषयांत बरेच आहे. कॉंटिनेंटलचे कै. रत्नाकर कुलकर्णी ह्यांनी आग्रहपूर्वक माझ्या कडून 'सेंद्रिय खत निर्मिती उद्योग', नांवाचे पुस्तक लिहून घेतले, मराठीतील हे पहिले खतविषयक पुस्तक आहे. त्याच्या चार आवृत्या झाल्या आहेत. बळिराजा मासिकाचे संपादक भोसले ह्यांच्या आग्रहामुळें त्यांच्या मासिकांत मी १९९२ ते २००५ पर्यंत शेतकर्यांना शेतीचे पद्धतशीर शिक्षण एका लेखमालेच्या द्वारा दिले आहे. त्यात ६५ लेख लिहीले. त्या शिवाय संपादक भोसल्यांच्या आग्रहामुळें निसर्गशेतीचे तंत्र शिकवणारा एक अभ्यासक्रम, 'व्यावहारिक निसर्गशेती अभ्यासक्रम' तयार करून तो स्वखर्चाने शेतकर्यांसाठी १९९४ साली उपलब्ध केला. त्यामुळें आपल्या महाराष्ट्रात निसर्गशेतीचा प्रचार झाला. आता ह्या उतारवयात जेव्हां शरीर साथ देण्यात कुचराई करू लागले आहे,

माझे सगळे लक्ष आपल्या हिंदू मान्यतांचा मराठी माणसाला परिचय करण्यावर आहे. त्यासाठी महाभारत, रामायण व योगवासिष्ठ ह्यांचे 'जसे आहे तसें' अनुवाद करण्यावर भर आहे. माझे ज्योतिष शास्त्राचे ज्ञान चांगले आहे. त्याप्रमाणे जर गोष्टी होणार असतील तर मी २०२० नंतर नसेन. त्यासाठी हे सगळे उपक्रम लवकरात लवकर उरकण्याचा मानस आहे.

आता कोणाला प्रश्न पडेल कीं, हा इंजिनियरींगचा माणूस शेतीवर कसें लिहीतो? त्या बद्दल थोडे लिहीतो. माझ्या कारखान्यात बहुतेक कामगार उरण, अलिबाग, वसईचे होते. शिक्षण बेताचे पण एकादे अवजार कसें वापरावयाचे ते शिकवले किं, ते त्यात लवकरच निष्णात होत होते. त्या मुलांना मी विचारले किं, ते एवढे हुशार असूनही शेती कां करत नाहीत? त्यांचे एकच उत्तर असें, मालक शेतीत भागत नाही. मग मी ठरवलें शेतीशास्त्राचा अभ्यास करावयाचा. अभ्यासाचाच छंद असल्यामुळें तो सुरु झाला. त्यात मला लवकरच समजले कीं, शेतीचा संबंध बॉटनी पेक्षा मायक्रोबायॉलॉजीशी जास्त आहे. मग मी त्या विषयाचा अभ्यास करून त्यात लवकरच पारंगत झालो. त्या अभ्यासाप्रमाणे मी कांहीं तंत्र विकसित केले व ते अजमावण्यास सुरुवात केली. त्यात अपेक्षेप्रमाणे परिणाम मिळू लागले त्याप्रमाणे एक शेतीतंत्र विकसित होत गेले. माझ्या कामगाराच्या शेतावर माझे प्रयोग होत होते, त्यात माझा पैसा लागत होता व त्यांचे कुटूंबिय काम करत होते. त्यावेळी मी चांगला तरुण होतो व उत्साहसुद्धा होता. माझ्या तंत्राने शेती उत्तम होते हे मी समजलो व ते सगळे तेथेच संपले. ते सगळे १९८२ ते १९८५ अशा सालात झाले होते. मीसुद्धा ते सगळे विसरून गेलो. परंतु, १९९२ साली मोठा दुष्काळ पडला होता महाराष्ट्रात त्यावेळी मी एक दृष्य टीव्हीवर पाहिले, त्यात एक ग्रामीण महिला एका खोल विहीरीत उतरून वाटीने पाणी काढून बालदीत भरत होती. त्यावेळी मला रहावले नाही व विचार केला, माझ्या ज्ञानाचा जर उपयोग होणार नसेल तर काय कामाचे ते ज्ञान. मी एक लेख लिहीला व दैनिक नवशक्तिला पाठवला. तो लेख त्यांनी प्रसिद्ध केला नाही. मग मी तो लेख बळीराजा

मासिकात पाठवला. त्यात तो छापून आला. तसे पहाता नवशक्तिनेसुद्धा तो प्रसिद्ध केला. त्यानंतर बळिराजाच्या वाचकांची प्रश्न विचारणा सुरु झाली व मी माझे शेतीचे ज्ञान त्यांना त्या मासिकात लेख लिहून देऊ लागलो. अशारितीने माझे शेतीत लिखाण भरपूर झाले. त्याबद्दल आधी लिहीले आहे.

आता थोडे माझ्या ब्लॉगपोस्ट बद्दल लिहीतो. हिंदूस्तानात २००८ साली इंटरनेटवर ब्लॉग सुरु झाले व मी त्यात माझे ब्लॉग सुरु केले. माझ्या ख्रिस्ती धर्माबद्दलच्या वादग्रस्त परंतु शास्त्रशुद्ध विवेचनामुळें पहिले ब्लॉग बंद झाले. माझे पूर्वी पांच ब्लॉग होते. त्यात मी अभ्यासांने जे संशोधन करून शोधून काढत असें, ते लिहीतो. त्यात अनेक विषयावरील माझे संशोधित साहित्य प्रसिद्ध करत असतो. त्यात ब्राह्मण धर्म, जैन धर्म, ख्रिस्ती धर्म, इस्लाम, अर्थ, न्याय, नितीशास्त्र, राजकारण अशा विषयांवर बरेच लिहीत असतो. ते तुम्ही वाचू शकता. एकच ब्लॉग मराठी आहे बाकीचे इंग्रजीत आहेत. सिलीकॉन मधील ब्लॉग इस्लाम बद्दलच्या माझ्या संशोधनाचे शास्त्रशुद्ध लिखाण आल्यानंतर बंद झाला आहे. गुगलवरील ब्लॉग मात्र जोरात चालू आहेत. माझे अशा विषयावरील विचार नाकारता येणार नाहीत असें सत्याला धरून असल्यामुळे जेव्हां मला कोणी विरोध करतो तेव्हां त्यांना मी नम्रपणे सांगतो, कृपया माझ्यावर अब्रुनुकसानीचा दावा करावा, ते झाले किं, ते लोक गप्प होतात. कारण, जर ते तसा दावा करतात तर त्यात तेंच हरण्याचा संभव जास्त असतो. एवढेच नाही तर त्यांच्या खोटेपणाचा जाहिर बभ्रा होईल ते त्यांना परवडण्यासारखे नसते. मी प्रचारकी थाटाचे लिखाण करत नाही. जे समजते ते विज्ञानाच्या आधाराने सिद्ध करूनच लिहीतो, आजच्या काळात असें लिखाण बर्याच गटांना आवडत नाही. बर्याच लोकांचे खूनसुद्धा झाले आहेत हे आपण जाणताच, म्हणून मी शक्यतर माझ्याबद्दल कांहीं लिहू इच्छित नाही. सत्यापेक्षा सोइस्करचा आज जमाना आहे. माझे जीवनातील अनुभव लिहीले तर ते एक वाचनीय पुस्तक होईल पण त्यात सर्व वादग्रस्त विषय पुढे येतील. मी मांडलेला कोणताही मुद्दा आजवर कोणालाही खोटा ठरवता आलेला नाही. जाता जाता,

जैन धर्माबद्दलचा वाद सांगतो एक उदाहरण म्हणून, १९०२ मध्यें सर जगदीशचंद्र बोस ह्यांनी वैज्ञानिक पुरावे देऊन जे सिद्धांत मांडले त्याचा पुरावा देऊन मी लिहीले कीं, हल्ली जो जैन धर्म प्रचारात आहे तो तीन हजार वर्षापूर्वीच्या अडाणीपणावर आधारित आहे, त्यातील सगळेंच विचार अज्ञानाधारीत म्हणून खोटे आहेत. एवढेच नाही तर व्यवहारिक जीवनात तो धर्म पाळणे केवळ अशक्य आहे. त्यामुळें जैन उखडले पण सुदैवाने ते खूनखराबा करणारे नसल्यामुळें वाचलो.

शेवटी माझ्या तब्यती बद्दल लिहीतो. मुळातच माझी प्रकृती तोळामासा असते त्यात २०१० साली बेस्टच्या बसने मला ५० फूट लांब फेकल्यामुळें पुरता जायबंद झालो होतो. मेंदूला आघात झाल्यामुळें माझी स्मरणशक्ती गेली होती. दोन बरगड्या तुटल्या होत्या. माझे शौंच व मुत्र ह्यांवर नियंत्रण राहिले नव्हते. दीड वर्ष तसेंच गेले. त्यावेळी माझे वय ६८ होते. केवळ दैव बलवत्तर म्हणून आज मी पूर्ववत झालो आहे तरी कोठल्याही वाहनाने प्रवास करण्यास परवानगी नाही. म्हणून मी कोठेही जात नाही. गेलेली स्मृति पुनः आली व आता सगळे बरे चालले आहे. त्या काळातील अनुभव विशेषकरून माझ्या ज्ञान साधनेचे, मोठे रोचक आहेत. तूर्तास एवढे पुरे.

ई-साहित्यच्या पदाधिकार्यांच्या आग्रहामुळें ही माझ्याबद्दली खरी माहिती सविस्तरपणे दिली आहे. जर शक्य असेल तर त्यातील मजकुरात बदल न करता तो प्रसिद्धीस घ्यावा.

अशोक कोठारे,

२३- २ -२०१८

ashokkothare@gmail.com ,

ashokkothare@yahoo.co.in

## ई साहित्य प्रतिष्ठान -

मराठी भाषा आता झेप घेण्याच्या मूड मध्ये आहे. रडणार्यांकडे लक्ष नका देऊ. मराठीत कधीच नव्हते इतके वाचक आहेत आता. पुर्वी पुस्तकाच्या एका आवृत्तीच्या हजार न हजार प्रती छापल्या जात. पांच हजार म्हणजे डोक्यावरून पाणी! आता ई पुस्तकांच्या जमान्यात एक एक पुस्तक पाच लाख वाचकांपर्यंत जात आहेत. वर्षाला अर्धा कोटी डाऊनलोड होतात. वाचक एकमेकांना परस्पर ऑर्डर करतात. व्हट्स अप, ई मेल, ऍप्प, ब्ल्यु टुथ, वेबसाईट, पेन्ड्राईव्ह, सिडी अशा असंख्य मार्गांनी पुस्तकं व्हायरल व्हायला लागली आहेत. सुसाट सुटल मराठीचं वारु. खेड्यापाड्यांच्या गल्लीबोळांपासून ते जगाच्या पाठीवरील प्रत्येक देशात. रॉकेटच्या वेगांने सुसाट सुटलेल्या मराठीच्या गाडीला आता कोणी थांबवू शकत नाही. या धूमधडक क्रांतीत साहभागी व्हा. आपल्या ओळखीच्या मराठी साक्षरांना यात ओढा. त्यांचे ई मेल पत्ते, व्हाट्सप नंबर आम्हाला पाठवा. तुम्ही कितीही वाचक आणा. ते शंभर आणतील आणि ते हजार आणतील. तुमच्या व्हाट्सप ग्रुपमधून याची जाहिरात करा. आपल्याला कुठली पुस्तकं वाचकांपर्यंत पोहोचवायची आहेत ते आपल्याला टिव्ही, पेपरची जाहिरात परवडत नाही. आमचे वाचक हेच आमचे जाहिरात एजंट. तेच आमची ताकद. मराठी भाषेची ताकद जगाला दाखवून देऊ.

ई साहित्यची पुस्तके www.esahity.com वरून डाऊनलोड करा.

esahity@gmail.com ला कळवून ई-मेलने मांगवा. किंवा 7710980841 हा नंबर सेव्ह करून ठेवा, या नंबरला तुमचे नांवाने Whatsapp करून पुस्तके whatsapp मार्गे मिळवा.

लिंक ई साहित्यचे app.https://play.google.com/store/apps/details?id=com.esahity.www.esahitybooks ह्या लिंकवर उपलब्ध आहेत. ते download करा. हे सर्व मोफत आहेत.

धन्यवाद